नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८
संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपूर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५५ * अंक १५९ * * नागपूर * मंगळवार, दिनांक ९ सप्टेंबर २०२५ | पुरवणीसह पाने ८ | किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रू. फक्त

## सिडको जमीन घोटाळा : एसआयटी स्थापन

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ८ :
आमदार रोहित पवार यांनी सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांच्यावर बिवलकर कुटुंबाला जमीन दिल्याचा गंभीर आरोप केला आहे. याबाबत त्यांनी पत्रकार परिषद घेत बँगभर पुरावे देखील दिले होते.

आता या प्रकरणी चौकशी करण्यासाठी एसआयटीची स्थापन करण्यात आली आहे. रोहित पवार यांनी याबाबत सोशल मीडियावर पोस्ट करत माहिती दिली. तसेच बिवलकर हे देश सोडून जाणार असल्याची शंका रोहित पवारांनी व्यक्त केली असून, त्याआधी बिवलकरांना अटक करण्याची मागणी केली आहे. सरकारी वनजमिनी बळकावल्याच्या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी राज्य सरकारने एसआयटी स्थापन करण्याचा निर्णय घेतल्याचे आमदार रोहित पवार यांनी सांगितले.

अग्रग्रलेख

## खरीखरी...

## नितीनजी तुम आगे बढो !

न्यायालयाने इथेनॉलच्या बाबतीत केंद्रीय मंत्री नितीनजी गडकरी यांच्या बाजूने कौल दिला. त्यामुळेच की काय नितीनजी गडकरी यांना आता विनाकारण बदनाम करणाऱ्या शत्रूंना चांगलीच चपराक बसली असावी. एखाद्या मंत्री जिथे हात लावतो तिथे सोने करतो. या गोष्टीमुळेच नितीनजी गडकरी सध्याच्या केंद्रीय मंत्रिमंडळात सर्वाधिक लोकप्रिय मंत्री आहेत. त्यांच्या हातात खाते आल्यावर प्रत्येक खात्यावर यशाची मोहर त्यांनी उमटवलेली आहे आणि विरोधकांना चिडीचूप केलेले आहे. या ठिकाणी एक गोष्ट अत्यंत स्पष्टपणे नमूद करणे गरजेचे आहे ते म्हणजे इथेनॉलच्या बाबतीत जो निर्णय घेतला गेला तो नितीनजी गडकरी यांचा नव्हता तर, त्यावेळच्या पेट्रोलियम आणि प्राकृतिक वायू मंत्रालयाचा होता. पेट्रोलमध्ये इथेनॉलचा वापर करण्याचे लक्ष 2030 सालामधले होते मात्र हे लक्ष 2025 सालीच पूर्ण करण्यात आले. नितीन गडकरी यांच्या पुत्राची एक कंपनी आहे ती कंपनी इथेनॉलचा व्यवसाय करते. खरंतर संपूर्ण देशभरात अशा जवळपास 200 कंपन्या आहेत. त्या सर्वच कंपन्यांनी चांगलाच नफा काढलेला आहे आणि वाढवलेला आहे. मग केवळ गडकरी पुत्रावर हल्ले करून विनाकारणच गडकरींना बदनाम करायचे होते की काय अशी शंका येते. नितीनजी 2013 सालामध्ये भारतीय जनता पक्षाचे अध्यक्ष असताना त्यांच्या विरुद्ध असेच बालंट आणले गेले. त्यावेळी अध्यक्ष असलेल्या गडकरी यांना पुन्हा अध्यक्ष करण्यात आले नाही आणि त्यांना विनाकारण मनस्ताप सोसावा लागला. आताही नेमके तेच होत आहे म्हणजेच काही चांगले होण्याच्या वेळी त्यांच्या बदनामीची प्रचंड मोठी मोहीम चालू करण्यात आली होती, आताही त्याच पद्धतीने चालू होत आहे. या मंडळींनी इथेनॉलमुळे गाडीचे अवरेज बरोबर मिळत नाही असा जावईशोध लावला होता, तोही खोटा निघाला. आता देशात अनेक लोकप्रिय आणि अप्रिय प्रकारच्या घटना घडत असून राजकीय वातावरण बेभरवशाचे झालेले आहे. या परिस्थितीतही गडकरी सर्व देशामध्ये लोकप्रिय आहेत, अगदी विरोधकांमध्ये सुद्धा त्यांचे चाहते आहेत. इतर कुणाबद्दल काय बोलले जाते हे सांगण्याची गरज नाही पण गडकरींच्या कामाबद्दल आणि त्यांच्या नवनवीन कल्पनांबद्दल तसेच शेती आणि शेतकरी यांच्यासाठीच्या त्यांच्या मनातल्या कळवळ्याबद्दल कुणालाही शंका नाही. सरकारी पैसा खर्च न करता प्रचंड मोठ्या प्रमाणात महामार्गाची निर्मिती केल्यानंतर गाड्यांचे जे इंधन वाचते त्यापेक्षा कितीतरी कमी टोल आकारणे त्यामध्ये गाडी धारकांचा नफा आहे की तोटा आहे, याचा विचार ज्याचा त्यांनीच करायला पाहिजे. त्यामुळेच या बदनामीच्या सर्व घटनाक्रमाच्या मागे कोण आहे आणि कोण नाही हे आम्हाला अजिबात ठाऊक नाही. पण हा एकच मंत्री इतका लोकप्रियता मिळवत आहे त्यामुळे जळणारी लॉबी त्यांच्याविरुद्ध अनेक खोट्या बाबी विनाकारण उभ्या करून दाबादाबी करण्याचा प्रयत्न करीत आहेत हे जवळपास सर्वांना समजू लागले आहे. गडकरी बहाद्दर आहेत आणि दिलदारही आहेत, असे अनेक बाण निष्प्रभ करण्याचे कसब आणि सामर्थ्य त्यांच्यामध्ये आहे. त्यामुळे अशा कितीही बाजारगप्पा सुरू असल्या तरीही भारतीय जनतेचा एकच नारा आहे तो म्हणजे, नितीनजी तुम आगे बढो! हम तुम्हारे साथ है.

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

# नेपाळ पेटले !

## निदर्शनात २० जणांचा मृत्यू : २०० हून अधिक जखमी



काठमांडूत कर्फ्यू
दिसताक्षणीच गोळीबाराचे आदेश
गृहमंत्र्यांचा राजीनामा
तीव्र आंदोलनानंतर सोशल मीडिया पुन्हा सुरू

■ वृत्तसंस्था, काठमांडू, दि. ८ :
नेपाळमध्ये सकाळपासून सुरू असलेल्या निदर्शनानंतर सोशल मीडिया पुन्हा सुरू करण्यात आला. या निदर्शनात आतापर्यंत २० जणांचा मृत्यू झाला आहे, तर २०० हून अधिक जण जखमी झाले आहेत. या निदर्शनाचे नेतृत्व जेन-झी म्हणजेच १८ ते ३० वयोगटातील तरुणांनी केले होते. सोशल मीडियावरील बंदी आणि सरकारी भ्रष्टाचाराविरुद्ध सोमवारी सकाळी १२ हजारांहून अधिक निदर्शक तरुण संसद भवनाच्या आवारात घुसले, त्यानंतर लष्कराने अनेक गोळीबार केला. नेपाळच्या इतिहासात संसदेत घुसखोरीची ही पहिलीच घटना आहे.

वृत्तानुसार, निदर्शकांनी संसदेच्या गेट क्रमांक १ आणि २ वर कब्जा केला होता. त्यानंतर संसद भवन, राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, पंतप्रधान निवासस्थाना जवळील भागात कर्फ्यू लागू करण्यात आला. काठमांडू प्रशासनाने तोडफोड करणाऱ्यांना दिसताच गोळीबार करण्याचे आदेश दिले आहेत.

३ सप्टेंबर रोजी नेपाळ सरकारने फेसबुक, इंस्टाग्राम, यूट्यूबसह २६ सोशल मीडिया साइट्सवर बंदी घालण्याचा निर्णय घेतला होता. या प्लॅटफॉर्मनी नेपाळच्या दळणवळण आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाकडे नोंदणी केलेली नव्हती. मंत्रालयाने २८ ऑगस्टपासून सात दिवसांची मुदत दिली होती, जी २ सप्टेंबर रोजी संपली.

वाढत्या निदर्शनांच्या पार्श्वभूमीवर, नेपाळने भारताच्या अनेक सीमावर्ती ठिकाणी सर्तकतेचा इशारा जारी केला आहे. तराई प्रदेशातील अनेक शहरांमध्ये निदर्शने पसरली आहेत आणि बदलाची मागणी करत निदर्शक रस्त्यावर उतरले आहेत.

## अनेकांना जेव्हा वाटले माझी राख होते आहे...
## तेव्हा मी भरारी घेतली

■ महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. ८ :



मी कधी फिनिक्स पक्षाप्रमाणे राखेतून भरारी घेतली नाही. पण अनेक वेळा लोकांना वाटले की माझी राख होते आहे, पण तेव्हा मी भरारी घेतली. ती भरारी का घेऊ शकलो तर त्याचे कारण आहे माझ्यातील सकारात्मकता. असे क्षण आले ते मी सकारात्मकतेने घेतले. आव्हानांचा सामना सकारात्मकतेने केला. कोणाचा द्वेष केला नाही. माणसे झुंजवली नाहीत म्हणून एकएक पाउल पुढे जात गेलो असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

मराठी पत्रकार संघाद्वारे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा श्री श्री रविशंकर यांच्या हस्ते पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. या कार्यक्रमात ते बोलत होते. लोकशाहीतील माध्यमे हे चौथे अंग आहे. लोकशाही सत्ता पथभ्रष्ट होऊ नये यासाठी अंकुश म्हणून माध्यमे काम करतात. पत्रकार आणि राजकारणी यांचे वेगळे नाते असते. प्रसंगी टिका करणारे, प्रसंगी संबंध ठेवणारे असे हे नाते आहे. अलिकडच्या पाच-सात वर्षांत राजकारणी आणि पत्रकार यांच्यासारखी गोष्टी आव्हानात्मक झाल्या आहेत.

पूर्वी पत्रकार कठोर टिका करायचे,नंतर त्या राजकारण्यांसोबत चहा देखील प्यायचे. आज मला भिती आहे की मला पुरस्कार देणा-या या पत्रकारांना बोलणार की सरकारच्या गटात गेले. हे मुख्यमंत्र्यांचे पत्रकार झाले. लोकशाहीत अशा प्रकारची भावना ठेवणे चूक आहे. पत्रकार आणि राजकारणी हे विरोधातील नाही तर लोकशाहीची चाके आहेत. दोन्ही चाकांनी एकमेकांसोबत चालायचे आहे. पत्रकारांनी टीका जरूर करावी पण आमचीही बाजू समजून घ्या असेही फडणवीस म्हणाले.

गुरुदेव श्री श्री रविशंकर यांच्या हस्ते मला पुरस्कार देण्यात आला. आर्ट ऑफ लिव्हिंगने महाराष्ट्रात जलसंधारण क्षेत्रात अतुलनीय काम केले आहे. योग असेल वा भारतीय संस्कृती असेल तिला जागतिक पातळीवर नेण्याचे काम त्यांनी केले आहे. भारतीय विचारांना जागतिक वारसा मिळवून दिला असेही मुख्यमंत्री म्हणाले.

## दोन दहशतवादी ठार

■ वृत्तसंस्था, कुलगाम, दि. ८ :
काश्मीरमधील कुलगाम येथे झालेल्या चकमकीत लष्कराने २ दहशतवाद्यांना ठार केले आहे. सोमवारी सकाळी गुड्डरच्या जंगलात दहशतवादी आणि सुरक्षा दलांमध्ये चकमक सुरू झाली. लष्कराने याला ऑपरेशन गुड्डर असे नाव दिले आहे. यादरम्यान एका जेसीओसह २ सैनिक जखमी झाले आहेत.

ठार झालेल्या दहशतवाद्यांपैकी एकाची ओळख पटली असून तो शोपियानचा रहिवासी आहे. तो लष्कर-ए-तोयबाशी संबंधित होता आणि सप्टेंबर २०२३ पासून सक्रिय होता. दहशतवाद्यांच्या उपस्थितीची माहिती मिळाल्यानंतर पोलिस, लष्करच्या ९आरआर आणि सीआरपीएफच्या संयुक्त पथकाने परिसरात शोध सुरू केला. जंगलात ३ हून अधिक लष्कर दहशतवादी लपले आहेत. दोन्ही बाजूंनी गोळीबार सुरू होता.

## पंजाबमधील दोन हजार गावे पाण्याखाली

राजस्थानातील आठ जिल्ह्यांमध्ये शाळा बंद

■ वृत्तसंस्था, चंदीगड/जयपूर, दि. ८ :
मुसळधार पावसामुळे राजस्थानातील अनेक भागात पूरस्थिती निर्माण झाली आहे. नद्या आणि ओढे दुथडी भरून वाहत असल्याने आज उदयपूर, सालुंबर, जालोर, डुंगरपूर, सिरोही, बारमेर, जैसलमेर आणि बालोत्रा या ८ जिल्ह्यांमध्ये शाळा बंद ठेवण्यात आल्या आहेत.

पंजाबमधील २३ जिल्ह्यांमधील सुमारे २ हजार गावे पुराच्या विळख्यात सापडली आहेत. त्यांची ३ लाख ८४ हजार लोकसंख्या बाधित झाली आहे. १२ जिल्ह्यांतील ४६ जणांना पूर आणि पावसात आपला जीव गमवावा लागला आहे. १२ दिवसांनंतर आज राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये शाळा आणि महाविद्यालये सुरू झालीत.

## आधार ओळखीचा पुरावा नागरिकत्वाचा नाही..

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. ८ :
सोमवारी, सर्वोच्च न्यायालयाने बिहारमध्ये एसआयआर (मतदार पडताळणी) विरोधात दाखल केलेल्या याचिकांवर सुनावणी केली. न्यायालयाने म्हटले की, आधार हा ओळखीचा पुरावा आहे, नागरिकत्वाचा नव्हे.

न्यायालयाने निवडणूक आयोगाला मतदार ओळखपत्रासाठी आधार हा १२ वा दस्तऐवज मानण्याचे आदेश दिले. सध्या, बिहार एसआयआरसाठी ११ विहित कागदपत्रे आहेत, जी मतदारांना त्यांच्या फॉर्मसोबत सादर करावी लागतात.

न्यायमूर्ती सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जयमाल्या बागची यांच्या खंडपीठाने असेही म्हटले की, जर आधार कार्डबाबत काही शंका असेल, तर आयोगाने त्याची चौकशी करावी. निवडणूक आयोगाने बेकायदेशीर स्थलांतरितांना मतदार यादीत समाविष्ट करावे, असे कोणालाही वाटत नाही. फक्त खऱ्या नागरिकांनाच मतदान करण्याची परवानगी असेल. बनावट कागदपत्रांच्या आधारे दावे करणाऱ्यांना मतदार यादीतून वगळले जाईल.

## चंद्रग्रहणात विसर्जन आणि रांगेतील भाविकांचा छळ

मच्छिमार समितीची मंडळाविरोधात सीएमकडे तक्रार

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ८ :
मुंबईतील प्रसिद्ध लालबागच्या राजाच्या यंदाच्या विसर्जन सोहळ्यावर मच्छिमार समुदायाने गंभीर आक्षेप घेतला आहे. लालबागच्या राजाचे विसर्जन तब्बल ३६ तासांनंतर झाल्यामुळे आणि चंद्रग्रहणाच्या वेळेत विसर्जन झाल्यामुळे मच्छिमार बांधवांनी नाराजी व्यक्त केली आहे. अखिल महाराष्ट्र मच्छिमार कृती समितीने लालबागचा राजा मंडळाच्या कार्यकारी समितीवर फौजदारी गुन्हे दाखल करण्याची मागणी केली आहे.

मच्छिमार समितीचे अध्यक्ष देवेंद्र तांडेल यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांना पत्र पाठवण्यात आले असून, या पत्राद्वारे मंडळाच्या कार्यकर्त्यांकडून भाविकांना मिळणाऱ्या वागणुकीबाबतही सरकारचे लक्ष केंद्रीत करण्यात आले आहे.

लालबागच्या राजाची वाढती लोकप्रियता आणि वाढते बाजारीकरण यामुळे भाविकांची अवहेलना होत असल्याचा आरोपही मच्छिमार समितीने केला आहे.



### विसर्जन मिरवणुकीत चोरट्यांचा धुमाकूळ : शेकडो फोन लंपास

यंदा लालबागच्या राजाच्या विसर्जन सोहळ्यात प्रचंड गर्दी झाली होती. या मिरवणुकीदरम्यान अनेक गणेशभक्तांचे फोन आणि सोन्याचे दागिने चोरीला गेल्याच्या घटना समोर आल्या आहेत. गर्दीचा फायदा घेत चोरांच्या टोळ्यांनी शेकडो मोबाईल आणि अनेक सोन्याच्या चेन लंपास केल्या आहेत. या प्रकरणी पोलिसांनी काही लोकांना ताब्यात घेतले आहे.

गिरगाव चौपाटीवर विसर्जनासाठी जमलेल्या भाविकांमधून शंभरहून अधिक मोबाईल चोरीला गेल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. याप्रकरणी काळाचौकी पोलिस ठाण्यात अनेक तक्रारी दाखल झाल्या असून आतापर्यंत चार जणांना अटक करण्यात आली आहे. त्यांच्या ताब्यातून चार फोन परत मिळाले आहेत. याशिवाय, सोनसाखळी चोरी प्रकरणात पोलिसांनी १२ जणांना ताब्यात घेतले असून, त्यांच्याकडून दोन सोन्याच्या चेन जप्त करण्यात आल्या आहेत.

## छगन भुजबळ देणार न्यायालयात आव्हान

■ महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. ८ :
महाराष्ट्रात पुन्हा एकदा मराठा आरक्षणाचा मुद्दा राजकीयदृष्ट्या गाजणार असल्याची चिन्हे दिसत आहेत.

राज्य सरकारने अलीकडेच मराठा आरक्षणासंदर्भात काढलेला शासकीय निर्णय (जीआर) मंत्री व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते छगन भुजबळ यांनी तीव्र शब्दांत विरोध केला आहे. भुजबळ यांनी स्पष्ट केले आहे की, हा निर्णय न्यायालयाच्या निकालाविरोधात आहे आणि त्यामुळे ते या जीआरला न्यायालयात आव्हान देणार आहेत. त्यासाठी कागदपत्रांची पडताळणी करण्यात येत आहे. त्यानंतर या निर्णया विरोधात न्यायालयात दाद मागण्यात येणार आहे. मात्र, मराठा आरक्षणाला स्थगिती देण्याापूर्वी मराठा समाजाची बाजू ऐकून घ्यावी, यासाठी मराठा समाजाच्या वतीने आधीच सर्वोच्च न्यायालयात कॅव्हेट दाखल करण्यात आली आहे.



मराठा आरक्षणाचा मुद्दा

भुजबळ यांनी सरकारच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करताना सांगितले की, आरक्षणाबाबत सर्वोच्च न्यायालयाचा स्पष्ट निकाल आहे. त्यामध्ये मराठा समाजाला वेगळे आरक्षण देणे संवैधानिक दृष्ट्या मान्य नाही, असे निकालात नमूद झाले आहे. अशा स्थितीत राज्य सरकारने पुन्हा एकदा नवीन जीआर काढून मराठा समाजाला आरक्षण देण्याचा निर्णय घेणे म्हणजे सरळसरळ न्यायालयाच्या आदेशाचे उल्लंघन आहे. यापूर्वीही छगन भुजबळ यांनी मराठा आरक्षणासंदर्भात आपली नाराजी अनेक वेळा सार्वजनिकरीत्या व्यक्त केली होती.

## मानेवर तलवार ठेवून जात प्रमाणपत्र काढता येत नाही

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ८ :
ओबीसी समाजातल्या ताटातले आरक्षण हे दुसऱ्यांच्या ताटात जाणार नाही, याची काळजी सरकारने घेतली आहे. मात्र, दुसरीकडे अधिकाऱ्यांच्या मानेवर तलवार ठेवून कोणालाही जात प्रमाणपत्र काढता येत नाही. त्यासाठी आवश्यक असलेली कागदपत्र जमा करावी लागतील. पुरावे द्यावे लागतील, अशा शब्दात मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सुनावले आहे. मनोज जरांगे यांनी १७ सप्टेंबरपर्यंत दिलेल्या इशाऱ्याला देखील त्यांनी प्रत्युत्तर दिले आहे.

बावनकुळे म्हणाले की, सरकार ओबीसींची काळजी घेत आहे. ओबीसीसाठी जे जे करणे शक्य आहे, ते सर्व निर्णय आपण घेत आहोत. या संदर्भात कॅबिनेट उपसमितीची बैठक १० तारखेला सकाळी ११ वाजता बोलावण्यात आली आहे. त्यामुळे ओबीसी आरक्षणासंदर्भात विजय वडेट्टीवार यांच्या मनात काही शंका असतील तर त्यांनी उपसमिती समोर मांडाव्यात. या बैठकीत त्यावर विचार केला जाईल. ओबीसींचे नुकसान होत असेल तर उपसमिती योग्य निर्णय घेईल.

### देवाभाऊंच्या जाहिराती वरुनही सुनावले

हे राज्य छत्रपती शिवाजी महाराजांना समर्पित असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या जाहिरातीमध्ये दिसत आहे. असे असताना विरोधकांच्या पोटात का गोळा उठला? असा प्रश्न बावनकुळे यांनी उपस्थित केला. एखाद्या व्यक्तीचे देवेंद्र फडणवीस यांच्यावर प्रेम असेल आणि त्याने प्रेमापोटी जाहिरात दिली असेल. राज्यातील १४ कोटी जनतेसाठी चांगले निर्णय फडणवीसांनी घेतले आहे. महाराष्ट्र विकसित होत आहे. अशा प्रेमापोटी त्यांनी स्वतःचे नाव दिले नसेल. तर त्याला काय फरक पडतो? मात्र त्या जाहिराती मधील भावना काही वेगळी आहे का? भावनेचा आदर केला पाहिजे, असेही बावनकुळे यांनी म्हटले आहे.

### ९० कोटींची राजकीय चिखलफेक



मेघा इंजिनिअरिंग या कंपनीचा कथितपणे ९० कोटींचा दंड माफ केल्याप्रकरणी राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे व आमदार रोहित पवार यांच्यात राजकीय चिखलफेक रंगली आहे. बावनकुळे यांनी या प्रकरणी रोहित पवारांनी पुरावा दाखवा अन्यथा राजकीय संन्यास घ्या असे आव्हान दिल्यानंतर पवारांनी थेट पुरावाच सादर केला. तसेच राजकीय संन्यास घेऊन नका किमान जनतेने विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे तरी द्या, असा टोला हाणला.


रोहित पवार यांनी काही दिवसांपूर्वी बावनकुळे यांच्यावर मेघा इंजिनिअरिंग कंपनीचा कोट्यवधी रुपयांचा दंड माफ केल्याचा आरोप केला होता. अवैध उत्खनन केले म्हणून परतूर तहसीलदारांनी ५५.९८ कोटी रुपये तर दुस-या एका प्रकरणात जालन्याच्या अतिरिक्त जिल्हाधिकारी यांनी ३८.७० कोटी असा एकूण ९४.६८ कोटी रुपये दंड थोठावला शिवाय आरोपी कंपनीचे साहित्य जप्त केले. या कंपनीने विभागीय आयुक्तांकडे अपील केले असता आयुक्तांनीही त्या कंपनीचे अपील फेटाळले. कंपनीने महसूल मंत्र्याकडे अपील केले आणि आपल्या महसूल मंत्र्यांनी संबंधित कंपनीला केवळ १% म्हणजेच १७ लाखाचा दंड भरण्यास सांगून कंपनीला मोकळे केले शिवाय त्यांचे जप्त केलेले साहित्य देखील परत देण्याचे आदेश दिले. त्यांच्या या ट्विटनंतर बावनकुळे यांनी रोहित पवारांना आरोप सिद्ध करा अन्यथा राजकीय संन्यास घ्या असे आव्हान दिले होते. त्यांच्या या ट्विटला रोहित पवारांनी लगेचच उत्तर दिले. ते म्हणाले, आदरणीय बावनकुळे साहेब, मी कधीच पुराव्याशिवाय बोलत नाही, असे म्हणत रोहित पवार यांनी पुरावाच सादर केला.




विजय आमच्या सर्व प्रिय सभासदांचा/भागधारकांचा......



आमच्या सर्व भागधारकांनी, सभासदांनी दिलेल्या सहकार्याबद्दल त्यांचे आभार व हार्दिक अभिनंदन....

प्रशिक ग्रामिण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या, कारंजा संचालक पदाकरीता निवडणूक-२०२५

विकास पॅनलचे नवनिर्वाचित संचालक गण


ॲड.रवि काशिनाथ रामटेके

आकाश भास्करराव कन्हे

आशिष माणिकलाल बंड

पांडूरंग मोतीरामजी भगत

ओंकार श्रीरामजी पाडेण

गुलाबराव चंपतराव साटोटे

कृष्णा विठ्ठलराव राऊत

प्रशांत नारायण काळे

मेघराज मधुकरराव जुमळे

सौ. सुनिता दिपक उके

डॉ.सौ.अनघा आनंद उकर्डे

प्रकाशक : दिलीप आगरकर, परिमल महाजन, महेश गुल्हाने
(संकलन : अंबिका प्रिंटर्स, कारंजा)

# निवडणुकीच्या अनुषंगाने आघाडीची तयारी

## काँग्रेस नेत्यांनी घेतली उद्धव ठाकरेंची भेट : विरोधी पक्षनेते पदावरही झाली चर्चा



■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ८: आगामी महानगरपालिकेच्या अनुषंगाने महाराष्ट्रात सर्वच राजकीय पक्षांनी आपली तयारी सुरू केली असल्याचे दिसत आहे. याच पार्श्वभूमीवर काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार, बाळासाहेब थोरात तसेच अमीन पटेल यांनी शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांची मातोश्रीवर जाऊन भेट घेतली. या बैठकीत आगामी निवडणुकींसंदर्भात तसेच विधान परिषद विरोधी पक्षनेते पदाच्या संदर्भातही चर्चा झाल्याचे वडेट्टीवार यांनी सांगितले.

उद्धव ठाकरे यांच्यासोबत बैठक झाल्यानंतर काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी बोलताना ते म्हणाले, आज अनेक विषयांवर चर्चा झाली. भविष्यात होणाऱ्या निवडणुका कशापद्धतीने होतील यावर चर्चा झाली. तसेच विधान परिषदेच्या विरोधी पक्षनेते पदावर देखील चर्चा झाली. शरद पवार आज दिल्लीत आहेत, ते मुंबईत आल्यावर आम्ही त्यांच्याशी चर्चा करणार आहोत. तसेच मुख्यमंत्र्यांची भेट घेऊन देखील विरोधी पक्षनेते पदावर चर्चा करणार आहोत.

**सतेज पाटलांच्या नावाची चर्चा**

शिवसेना ठाकरे गटाचे आमदार अंबादास दानवे यांचा विरोधी पक्षनेते पदाचा कार्यकाळ संपत आला असून त्यानुसार आता विरोधी पक्षनेते पदाची जबाबदारी कोणाकडे दिली जाणार याची चर्चा सुरू आहे. यात काँग्रेसचे नेते सतेज पाटील यांच्या देखील नावाची चर्चा सुरू आहे.

यावर विजय वडेट्टीवार म्हणाले की त्यांच्या देखील नावाची चर्चा सुरू आहे. संख्याबळानुसार आमच्याकडे आहेच ते विधान परिषदेत यावर काही दुमत नाही. दिल्लीतून आमच्या हायकमांडकडून जो निर्णय घेतला जाईल त्यानुसार पुढील दिशा ठरवली जाईल.

तसेच सध्या उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांच्यात जवळीक वाढली असून आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर युती करणार असल्याची चर्चा आहे. यावर बोलताना विजय वडेट्टीवार म्हणाले, त्यासंदर्भात देखील आमची चर्चा झाली आहे. तसेच यावर आम्ही हायकमांडसोबत देखील चर्चा करणार आहोत आणि त्यानंतर यावर आम्हाला अधिक भाष्य करता येईल, असे वडेट्टीवार म्हणाले.

मराठी भाषेच्या मुद्द्यावरून दोन्ही ठाकरे बंधू एकत्र आले आहेत. त्यांनी सोबत विजयी मेळावा देखील घेतला. त्यानंतर दोन्ही नेत्यांनी एकमेकांच्या घरी जाऊन भेटी पण घेतल्या आहेत. गणपतीच्या दर्शनासाठी उद्धव ठाकरे राज ठाकरे यांच्या शिवतीर्थ या निवासस्थानी गेले होते. तसेच आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर युती करणार का, यावर दोन्ही नेत्यांनी अद्याप स्पष्टता दिलेली नाही.

महाराष्ट्र विधान परिषदेतील विरोधी पक्षनेते पद रिक्त असून याबाबत निर्णय घ्यावा यासाठी विजय वडेट्टीवार आणि बाळासाहेब थोरात यांनी महाराष्ट्र विधान परिषदेचे सभापती राम शिंदे यांची भेट घेतली.

## डॉ. श्रीपाद अमृत डांगे स्मृती पुरस्कार मिलिंद रानडे यांना जाहीर



**मुंबई :** बँक ऑफ महाराष्ट्र एम्प्लॉईज युनियन,औरंगाबाद या ए.आय.बी. इ.ए. संघटनेच्या वतीने कामगार चळवळीत अमूल्य योगदान दिलेल्या व्यक्तीस कामगार चळवळीचे अर्ध्वयू श्रीपाद अमृत डांगे यांचे स्मरणार्थ 1999 सालापासून पुरस्कार दिला जातो. या वर्षी छत्रपती संभाजी नगर येथे संघटनेच्या संपन्न होत असलेल्या संघटनेच्या अधिवेशनात या पुरस्कारासाठी निवड समितीने मुंबई कचरा वाहतूक या अत्यंत दुर्लक्षित क्षेत्रातील कामगारांसाठी प्रदीर्घ कायदेशीर न्यायालयीन संघर्ष करून त्यांना सेवेत कायम करण्यात यशस्वी झाले अशा मिलिंद रानडे यांची निवड केल्याची घोषणा संघटनेचे अध्यक्ष देविदास तुळजापूरकर आणि जनरल सेक्रेटरी धनंजय कुलकर्णी यांनी केली.

कचरा वाहतूक गाडीवरच घ्यावे लागणारे जेवण, प्रत्येक फेरीवरच ठरलेली मिळकत, पिण्यासाठी सुद्धा पाण्याची सोय नाही,कामाच्या ठिकाणी गमबुट किंवा हातमोजे पुरवठा नसल्याने निर्माण होणारे त्वचा आणि श्वसनाशी होणारे घातक दुर्धर आजार, कामाहून परतीच्या वेळी कपडे आणि शरीर यामुळे होणारी दुर्गंधी म्हणून सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेतून प्रवास नाही अशा यम यातना मधून जगावे लागणारे जीवन अशा कामगारांशी संवाद साधून, महत्प्रयासातून त्यांची संघटना बांधणे आणि तो सर्वोच्च न्यायालया पर्यंत वीस वर्षाहून चिवटपणे लढण्याचे कार्य रानडे यांनी केले आहे.

या वर्षी 13 सप्टेंबर रोजी हा पुरस्कार कॉ.रानडे यांना प्रदान करण्यात येईल. रोख रु 50,000/- आणि स्मृति चिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप असेल.

## भारत 'दार उल इस्लाम' नव्हे तर 'दार- उल -अमन'

**मुंबई :** भारत हा 'दार उल इस्लाम' नव्हे तर 'दार उल अमन' असल्याची बाब मुस्लिम समाजाने समजून घेतले पाहिजे, असे मत वंचित बहुजन आघाडीचे सर्वेसर्वा प्रकाश आंबेडकर यांनी सोमवारी व्यक्त केले.



तोडफोडीच्या या घटनेचे देशात तीव्र पडसाद उमटण्याची चिन्हे आहेत.

श्रीनगर येथील सुप्रसिद्ध हजरतबल दर्ग्यातील अशोक स्तंभांची अज्ञात लोकांनी तोडफोड केल्यामुळे मोठा वाद निर्माण झाला आहे. मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांनी या प्रकरणी धार्मिक स्थळावर राष्ट्रीय प्रतीक लावण्यात आल्यावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. वक्फ बोर्डाचे अध्यक्ष दरख्शां अंद्राबी यांनीही या प्रकरणी अत्यंत कठोर भूमिका घेत तोडफोड करणाऱ्यांवर जनसुरक्षा कायद्यांतर्गत (पीएसए) कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

या पार्श्वभूमीवर प्रकाश आंबेडकर यांनी मुस्लिम समाजाला खडेबोल सुनावलेत. ते म्हणाले, मी श्रीनगरमध्ये भारताच्या राष्ट्रीय चिन्हांच्या - अशोक स्तंभ - तोडफोडीचा तीव्र निषेध करतो. राष्ट्रीय चिन्ह हे भारतातील सर्व नागरिकांचे आहे. ते कोणत्याही एका व्यक्तीचे किंवा समुहाचे नव्हे तर संपूर्ण राष्ट्राचे व त्याच्या जनतेचे प्रतिनिधित्व करते. मुस्लिम राष्ट्रीय चिन्हाच्या अशा तोडफोडीला पाठिंबा देऊन स्वतःला व भारतातील आपल्या सपूर्ण समुदायाला वेगळे करत आहेत. मुस्लिमांनी हे समजून घेतले पाहिजे की, भारत दार उल इस्लाम नव्हे तर दार उल अमन आहे.

## पाच वर्षीय मुलाची हत्या

**यावल :** यावल शहरातील बाबूजीपुरा भागातील रहिवासी पाच वर्षीय बालक शुक्रवारी सायंकाळी बेपत्ता झाला होता. त्याचा मृतदेह शनिवारी त्याच्या शेजारील रहिवाशाच्या घरात एका पोत्यात जळालेल्या स्थितीत मिळून आला. संशयित २२ वर्षीय तरुणाने गळा आवळून या बालकाची हत्या केली. नंतर मृतदेह जाळून विल्हेवाट लावण्याच्या हेतूने पोत्यात कोंबून ठेवला होता. संशयिताच्या वडिलांनीच पोलिसांना माहिती दिल्याने हा प्रकार उघडकीस आला. यानंतर पोलिसांनी संशयितासह त्याच्या संपूर्ण कुटुंबास ताब्यात घेतले. या घटनेमागे लैगिंक शोषण हे प्राथमिक कारण असल्याचा अंदाज आहे.

## उपमुख्यमंत्री अजित पवारांच्या अडचणीत वाढ

### अंजली दमानियांकडून कायदेशीर तक्रार दाखल, मुख्यमंत्र्यांनाही पाठवले पत्र

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ८: उपमुख्यमंत्री अजित पवारांच्या विरोधात सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र पाठवले आहे. दमानिया यांनी अजित पवारांच्या विरोधात कायदेशीर तक्रार दिली आहे.



महिला आयपीएस अधिकाऱ्याला कारवाईपासून रोखल्याने अजित पवार अडचणीत आले आहेत. तसेच अजित पवारांनी महिला अधिकाऱ्याला धमकावले असून त्यांच्याविरोधात गुन्हा दाखल करून घेणारच, असा इशारा अंजली दमानिया यांनी दिला आहे.

अंजली दमानिया म्हणाल्या, अजित पवारांच्या विरोधात मी कायदेशीर तक्रार दाखल केली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, इक्बाल सिंह चहल आणि महाराष्ट्र पोलिस यांच्याकडे तक्रार दिली आहे. मला असे वाटते की यांना धडा शिकवणे गरजेचे आहे. कायदा हा सगळ्यांसाठी समान असतो. कोणीही दादागिरी करू शकत नाही आणि राजकारणी तर अजिबात नाही. जी काही दादागिरी, अवैध धंदे आणि लूट सुरू आहे, एवढेच नाही तर अधिका?यांवर जो काही राजकीय दबाव सुरू आहे हा कुठेतरी थांबवण्यासाठी आपण सगळ्यांनी प्रयत्न करणे गरजेचे आहे.

करमाळा येथील कुर्डू गावात अवैध उत्खनन सुरू होते. या उत्खननावर कारवाई करण्यासाठी आयपीएस अधिकारी अंजना कृष्णा गेल्या होत्या. पण राष्ट्रवादीच्या कार्यकत्यानें थेट अजित पवारांना फोन लावला आणि अजित पवारांनी कारवाई न करण्याचे आदेश दिले. त्यानंतर अंजना कृष्णा यांनी स्वतःच्या फोनवरून कॉल करण्याची विनंती केली.

त्यानंतर अजित पवारांनी एवढी हिंमत आली का तुझ्यात असे म्हणत धमकावले. हा व्हिडिओ सोशल मीडियावर चांगलाच व्हायरल झाला होता. व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर अजित पवारांनी काहीशी माघार घेत आपला सरकारी कामात कुठलाही अडथळा आणण्याचा उद्देश नव्हता असे सांगितले.

राष्ट्रवादीचे प्रवक्ते अमोल मिटकरी यांनी थेट आयपीएस अधिकारी अंजना कृष्णा यांच्या विरोधात यूपीएससीला पत्र लिहिले होते. त्यानंतर त्यांना देखील माघार घ्यावी लागली आहे.

लक्ष्मण हाके यांनी देखील अजित पवारांवर टीका केली आहे. ते म्हणाले, अजितदादा तुम्ही पोल्ट्रीवरचे कामगार शोभत. जर तुम्ही एका यूपीएससी देणा?या मुलीवर दादागिरीची भाषा करत असाल ती भाषा सुधारावी. तुम्ही वरिष्ठ सभागृहात रॅकेल चोर अमोल मिटकरी जो बसवला आहे. त्या वरिष्ठ सभागृहाचा तुम्ही अपमान केला आहे. या पळालेल्या श्वनाला आवरा, असे म्हणत हाके यांनी टीका केली आहे.

## बंजारा समाजही अनु. जमातीत येणार का?

### हैदराबाद गॅझेटियरमुळे नवा पेच : समाजाने आक्रमक होत आंदोलनाचा दिला इशारा



■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ८: मनोज जरांगे यांच्या आझाद मैदानातील आंदोलनानंतर, राज्य सरकारने मराठा आरक्षणासंदर्भात एक नवीन शासन आदेश काढला. या आदेशात हैदराबाद गॅझेटियर लागू करण्याची मराठा समाजाची मागणी मान्य करण्यात आली. यामुळे केवळ मराठा समाजालाच नव्हे, तर बंजारा समाजाला देखील मोठा फायदा होण्याची शक्यता आहे. सध्या बंजारा समाज एनटी (ए) प्रवर्गात समाविष्ट आहे, परंतु हैदराबाद गॅझेट नुसार त्यांचा समावेश अनुसूचित जमाती (एसटी) प्रवर्गात होण्याची शक्यता आहे.

मुंबईत बंजारा समाजाची एक उच्चस्तरीय बैठक देखील आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीला बंजारा समाजाचे सर्व धर्मगुरू, महंत, मंत्री संजय राठोड, इंद्रनील नाईक,सर्व आमदार, लोकप्रतिनिधी आणि बंजारा समाजातील अभ्यासक उपस्थित राहणार आहेत. समाजाची बाजू समजून घेण्यासाठी या बैठकीचे आयोजन करण्यात आले असल्याचे सांगितले जात आहे.

हैद्राबाद गॅझेटियरचा आधारावर बंजारा समाजाला आदिवासी प्रवगार्तून आरक्षण देण्याची समाजाची मागणी सुरु झाली आहे. जर 'हैद्राबाद गॅझेटीयर'च्या आधारावर मराठा समाजाला 'कुणबी प्रमाणपत्र' मिळत असेल तर त्याच गॅझेटियरमध्ये 'आदिवासी' उल्लेख असलेल्या बंजारा समाजावर अन्याय का?, असा प्रश्न बंजारा समाजाकडून उपस्थित करण्यात आला आहे. आजच्या मुंबईच्या बैठकीत पुढील आंदोलनाची दिशा निश्चित होईल. अनेक जिल्ह्यांमध्ये बंजारा समाजाकडून सरकारला आदिवासीतून आरक्षणासाठीचे निवेदन सरकारला पाठवण्यात आले आहे.

तत्कालीन निजाम सरकारच्या हैदराबाद गॅझेटियरमध्ये बंजारा समाजाचा आदिवासी प्रवर्ग म्हणून उल्लेख आहे. सध्या महाराष्ट्रात बंजारा समाजाला विमुक्त भटक्या जमाती (एनटी) प्रवर्गाचे आरक्षण आहे.

आंध्र प्रदेश, तेलंगणा, कर्नाटक आणि राजस्थानमध्ये बंजारा समाजाचा आदिवासी प्रवर्गात समावेश करण्यात आला आहे. मराठा समाजाच्या आरक्षणाच्या मागणीनंतर आता बंजारा समाजही 'हैद्राबाद गॅझेटीयर'चा आधार घेत महाराष्ट्रात आरक्षणाचे आंदोलन तीव्र करण्याची शक्यता आहे.

बीड मधून बंजारा समाजाने हैदराबाद गॅझेटनुसार एसटी प्रवर्गात समावेश करावा अशी मागणी करण्यात आली आहे.ही मागणी आपण हिवाळी अधिवेशनात करणार असल्याचे आमदार विजयसिंह पंडित यांनी जाहीर केले आहे.

## मुंबईत पुन्हा डेंजर झोन? नागरिकांमध्ये भीती!

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ८: मुंबईत पावसाळा आला की डासजन्य आजारांचे सावट गडद होते. यंदाही परिस्थिती वेगळी नाही. रुग्णालयांच्या आकडेवारीकडे पाहिलं तर गेल्या काही आठवड्यांतच डेंगी, मलेरिया आणि चिकनगुनिया या आजारांचा प्रादुर्भाव झपाट्याने वाढताना दिसतो आहे. शहरातील अनेक भागांत नागरिक डासांमुळे त्रस्त झाले आहेत.

झोपडपट्ट्यांपासून उंच इमारतींपर्यंत सगळीकडे डेंगीच्या केसेस नोंदवल्या जात आहेत. आरोग्य यंत्रणा उपाययोजना करत असली तरी प्रत्यक्षात नागरिकांचा संताप उफाळून येत आहे. स्वच्छतेसफाईचे ढोल पिटले जातात, पण प्रत्यक्षात गल्लीबोळात घाणीचे साम्राज्य कायम आहे, अशी तक्रार रहिवासी करत आहेत.



आरोग्य विभागाच्या अहवालानुसार, डेंगीच्या रुग्णसंख्येत तब्बल ४२ टक्क्यांनी वाढ झाली आहे, तर मलेरियाचे रुग्ण १७ टक्क्यांनी वाढले आहेत. चिकन गुनियाच्या रुग्णसंख्येतही सातत्याने वाढ दिसून येते. त्यामुळे महानगरपालिकेच्या उपाययोजनांवर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण इतके की, छोट्या तापालाही डेंगीचा संशय घेतला जातोय.

परिस्थिती गंभीर असली तरी प्रशासनाकडून व्यापक मोहीम उशिरा सुरू झाल्याची टीका केली जात आहे. या सर्व घडामोडींमध्ये सर्वाधिक धक्का बसला तो टिळकनगर भागातील घटनांमुळे. इथे एकाच इमारतीत सात जणांना डेंग्यूची लागण झाली असून हा परिसर डेंगीचा हॉटस्पॉट बनला आहे. दहशतीच्या सावटाखालील हा भाग आता संपूर्ण शहरासाठी इशारा ठरत आहे.

## मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनाच्या आधी

# कुणबी प्रमाणपत्र द्या!

### मनोज जरांगे यांचा सरकारला इशारा



■ वृत्तसंस्था

छ. संभाजीनगर, दि. ८ : मराठा आरक्षण नेते मनोज जरांगे पाटील हे सध्या रुग्णालयात दाखल असून त्यांना आज डिस्चार्ज देण्यात येत आहे. पत्रकारांशी संवाद साधताना त्यांनी पुन्हा एकदा सरकारला इशारा दिला आहे. तसेच विनंती देखील केली आहे की मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनाच्या आधी मराठवाड्यातील मराठ्यांना कुणबी प्रमाणपत्र देण्याची प्रक्रिया सुरू करण्यात यावी, अन्यथा दसरा मेळाव्यात मोठा निर्णय घेऊ, असे म्हणत जरांगे यांनी सरकारला इशारा दिला आहे.

मनोज जरांगे म्हणाले, सरकारला एक विनंती आहे तुम्ही व्यासपीठावर सांगितले होते की हैदराबाद गॅझेट आपण लागू केले आहे. मला तुम्हाला स्पष्ट सांगणे आहे तुम्हाला काय करायचे काय नाही ते तुम्ही बघा, 17 सप्टेंबरला मराठवाडा मुक्तिसंग्राम दिन आहे, त्याआधी हैदराबादच्या गॅझेटच्या नुसार मराठवाड्यातल्या मराठ्यांना कुणबी प्रमाणपत्र देण्याची कारवाई सुरू केली पाहिजे. येत्या कॅबिनेटमध्ये आपण ही प्रक्रिया सुरू करावी आणि अंमलबजावणी करण्यात यावी. 17 सप्टेंबरच्या आधी ही प्रक्रिया सुरू करावी, अशी मागणी आहे.

**अर्धा महाराष्ट्र पागल झाला**

तुम्ही ठरवलेच आहे तर मनुष्यबळ द्या, तातडीने कामाला लावा आणि हैदराबाद गॅझेटच्या नोंदीनुसार कुणबी प्रमाणपत्र देण्याची प्रक्रिया सुरू करावी अन्यथा मला मोठे पाऊल घ्यावे लागेल, असा इशारा मनोज जरांगे यांनी दिला आहे. आमची हेळसांड झाली तर पुन्हा खूप वाईट दिवस तुमच्या चुकीमुळे आली नाही पाहिजे.

मराठवाड्यातल्या मराठ्यांना कुणबी प्रमाणपत्र द्या म्हटले की अर्धा महाराष्ट्र पागल झाला. म्हणजे गरिबांच्या पोरांनी आणि मी आम्ही जीआर काढला तेव्हा काही अभ्यासक सुद्धा पागल झाले. आमचे विरोधक तर इतके पागल झाले आहेत की त्यांना झोपाच येत नाहीत. मराठवाडा शंभर टक्के आरक्षणात जाणार.

**दसरा मेळाव्यात आमची भूमिका मांडू**

एकदा आपले सगळे मराठे आरक्षणात जाऊ द्या त्यानंतर आणखी मोठा आनंद साजरा करू. त्यामुळे मराठ्यांनी थोडे संयमाने घ्या. 17 सप्टेंबरच्या आधी जर मराठवाड्यातील मराठ्यांना जर कुणबी प्रमाणपत्र देण्याची प्रक्रिया सुरू नाही झाली तर येत्या दसरा मेळाव्याला आम्हाला आमची भूमिका जाहीर करावी लागेल सरकारच्या विरोधात. कारण आता मुख्यमंत्र्यांनी सांगितले आहे की आम्ही हैदराबाद गॅझेट लागू केले. तर मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनाच्या आधी प्रमाणपत्र देण्याची सुरुवात करावी.

**प्रक्रिया सुरू करण्यात यावी**

नारायण गडावर दसरा मेळावा होणार आहे. आता मला शंभर टक्के खात्री आहे की आता मराठ्यांचा अपमान होणार नाही आणि कुणबी प्रमाणपत्र देण्यात येणार. मराठे शंभर टक्के जिंकले आहेत. मुंबईत जाऊन आपण खूप मोठी लढाई जिंकली.

हा विजय अनेकांना पचत नाही. आपल्या लेकरांना काय मिळवायचे काय द्यायचे ते आपण बघून घेऊ, बाकीचे नाटके बंद. काही शब्द चुकले तर ते सरकारने बघून घ्यायचं. आम्हाला व्यासपीठावर येऊन सांगितले की हैदराबाद गॅझेट लागू केले, तर आता त्यानुसार प्रमाणपत्र देण्याची प्रक्रिया सुरू करण्यात यावी.

**आम्ही तुमच्या मुळावर उठणार**

मनोज जरांगे म्हणाले, मुख्यमंत्री आणि दोन उपमुख्यमंत्री आणि विखे पाटलांना सांगतो, आमच्या जीआरमध्ये जर येवला वाल्याचे ऐकून जर काही शब्दात हेराफेरी जर केल्या तर एक लक्षात ठेवा 1994 चा जीआर आम्ही सुद्धा चॅलेंज करणार आणि न्यायालयाला तो सुद्धा रद्द करावा लागणार.

आम्ही तुमच्या मुळावर उठणार. आम्ही खूप संयम पाळला, आता बास. त्यामुळे 17 सप्टेंबरच्या आत कुणबी प्रमाणपत्र देण्याची कारवाई सुरू करावी, अशी मागणी त्यांनी केली.

# ११४४ पानांच्या ग्रंथाचा प्रकाशन सोहळा उत्साहात



■ वृत्तसंस्था, अहिल्यानगर, दि. ८ : अहिल्यानगर जिल्ह्यातील लोककलांपासून, शास्त्रीय संगीत, गायन, वादन, नृत्य तसेच तंत्रज्ञ, साहित्यिक, अभिनेते, अशा सर्व कलाकारांची माहिती असलेला कलासाधकांचा नगरी आहेर हा ग्रंथ नगरच्या कलाक्षेत्राचा माहितीकोष असून, लेखक-संपादक शाहीर अरुण आहेर यांचे हे अतुलनीय कार्य आहे, असे गौरवोद्गार ज्येष्ठ विचारवंत तथा साहित्यिक प्रा. रतनलाल सोनग्रा यांनी काढले.

शाहीर अरुण आहेर लिखित व संपादित, 1144 पानांच्या या ग्रंथाचा प्रकाशन सोहळा नुकताच येथे झाला. त्या वेळी डॉ. सोनग्रा अध्यक्षस्थानावरून बोलत होते. या वेळी महापालिकेचे माजी विरोधी पक्षनेते संपत बारस्कर, माजी नगरसेवक अनिल बोरुडे, माजी महापौर बाबासाहेब वाकळे, डॉ. सागर बोरुडे, राज्य चर्मकार विकास संघाचे प्रदेशाध्यक्ष प्रा. संजय खामकर, शब्दगंध साहित्यिक परिषदेचे अध्यक्ष राजेंद्र उदागे, संस्थापक सचिव सुनील गोसावी, खजिनदार भगवान राऊत, न्यू आर्ट्स कॉलेजचे माजी प्राचार्य खासेराव शितोळे, पेमराज सारडा महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. माहेश्वरी गावित, आंतरराष्ट्रीय ख्यातीचे सूफी गायक पवन नाईक, मराठी साहित्य परिषदेच्या सावेडी शाखेचे प्रमुख कार्यवाह जयंत येलूलकर, कवी सुभाष सोनवणे, ग्रंथाचे सहायक संपादक दीपक रोकडे, संतोष कानडे उपस्थित होते.

शहरातील ख्यातनाम उद्योजक आणि मराठी साहित्य परिषदेच्या सावेडी शाखेचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया यांनी त्यांच्या शांतीकुमारजी फिरोदिया मेमोरियल फाउंडेशनतर्फे या ग्रंथाचे प्रकाशन केले.

यावेळी प्राचार्य खासेराव शितोळे म्हणाले, की अहिल्यानगर जिल्ह्याने राज्याला नृत्य, नाट्य, संगीत, गायन, वादन, साहित्य आणि लोककला अशा विविध क्षेत्रांतील नामवंत कलावंत दिले. यातील बहुतेक कलावंत बहुजन वर्गातील होते. त्यामुळे उपेक्षित राहिलेल्या अशा कलाकारांना न्याय देण्याचे काम शाहीर अरुण आहेर यांनी या ग्रंथातून केले आहे.

हा ग्रंथ जिल्ह्यातील प्रत्येक शाळा महाविद्यालयातील ग्रंथालयापर्यंत पोहोचला पाहिजे जेणेकरून हा ग्रंथ वाचून अनेक नवोदित कलावंतांना प्रेरणा मिळेल आणि त्यांच्यातून भविष्यात अनेक कलावंत निर्माण होतील.

संभाजी नगरचे विख्यात कवी समीक्षक डी.बी. जगतपुरिया म्हणाले, या ग्रंथात शाहीर आहेरांनी लेखक कलावंत व इतर गुणवंतांचा सत्वसार मांडलाय. प्रस्तावनाकार थोर विचारवंत आचार्य रतनलालजी सोनग्रा, शाहीर आहेर यांचे सांस्कृतिक योगदान वंदनीय आहे. लेखक-संपादक शाहीर अरुण आहेर म्हणाले, जिल्ह्यातील विविध क्षेत्रांतील कलावंतांचे कार्य मला खुणावत होते.

या कलावंताच्या कामाचे कुठे तरी दस्तऐवजीकरण होणे गरजेचे होते. त्याच प्रामाणिक भावनेतून मी या ग्रंथाचा मनोदय व्यक्त केला व तो पूर्णत्वास नेण्यासाठी अनेक मदतीचे हात पुढे आले. त्यापैकी मसाप सावेडी शाखेचे अध्यक्ष व प्रसिद्ध उद्योजक नरेंद्र फिरोदिया यांनी या ग्रंथ प्रकाशनासाठी मला मोलाची मदत केली. त्याबद्दल मी त्यांच्या ऋणातच राहू इच्छितो. माझे ध्येय आणि उद्दिष्ट साध्य झाले आहे.

सहायक संपादक दीपक रोकडे यांनी ग्रंथ निर्मितीची पार्श्वभूमी स्पष्ट केली. प्राचार्य डॉ. माहेश्वरी गावित, संजय खामकर, नगरसेवक संपत बारस्कर, सुनील गोसावी, संतोष कानडे, सुभाष सोनवणे आदींची भाषणे झाली. गायक पवन नाईक यांनी प्रास्ताविक केले. बीणा दिघे यांनी सूत्रसंचालन केले. वर्षा आहेर यांनी आभार मानले.

कार्यक्रमाची सुरुवात कल्याणी कामतकर यांच्या कथक नृत्यालयाच्या नृत्यांगना वैष्णवी पाटोळे, वैभवी चव्हाण, राधिका देशमुख, सृष्टी उदमले यांच्या नटराज वंदन नृत्याने झाली. समारंभासाठी रोहिणी अरुण आहेर, इंजि. सोनाली अश्विनीकुमार आहेर, उद्योजक अश्विनीकुमार आहेर, प्रा. अवधूत अरुण आहेर, संतोष सुर्वे, देवीकृपा सांस्कृतिक मंडळ यांनी परिश्रम घेतले.

# वाद्यांच्या गजरात १४ तास मिरवणूक

## ऑपरेशन सिंदूर, गोरक्षणाचा संदेश, शिवतांडवाचा जिवंत देखावा; ढोलताशांसह डीजेचाही वापर

■ **महासागर प्रतिनिधी**
**अकोला, दि. ८ :**

यंदा गणपती बाप्पाच्या विसर्जन मिरवणुकीत डीजेसह पारंपरिक वाद्यांचा गजर वाढल्याचे जाणवला. मोठ्या गणेशोत्सव मंडळांकडून लेझर लाईटचा वापर झाला. मिरवणुकीतून ऑपरेशन सिंदुरचा फलक लावत गणेशभक्तांची राष्ट्रभक्तिचा संदेश दिला. काही दिवसांपासून गोवंश वाहतूक, तस्करीवर पोलिसांकडून कठोर कारवाई करण्यात येत असून, याचे प्रतिबिंबही मिरवणुकीत दिसून आले. काहींनी गोरक्षणाचा फलक हातात घेत गोसेवाचा संकल्प केला. मिरवणुकीत ६२ गणेश मंडळे आणि ५ आखाडे सहभागी झाले. यंदा गतवर्षीच्या तुलनेने ५ मंडळे वाढली. फुले अन गुलालाचीही उधळण होत सकाळी ११ वाजता सुरू झालेली मिरवणूक १.३० पर्यंत चालली.

जिल्ह्यात यंदा १ हजार ७७० सार्वजनिक ठिकाणी लाडक्या बाप्पांची स्थापना झाली. ६ सप्टेंबर रोजी मानाच्या श्री बाराभाई गणेशोत्सव मंडळाच्या बाप्पांचे ११ वाजता जयहिंद चौक परिसरात आगमन झाले. चौकात आरती केल्यानंतर मुख्य मिरवणुकीला



प्रारंभ झाला. मिरवणुकीचे संचलन सार्वजनिक गणेशोत्सव मंडळातर्फे करण्यात आले. यावेळी अध्यक्ष ॲड. मोतिसिंह मोहता, कार्याध्यक्ष संग्राम गावंडे, महासचिव सिद्धार्थ शर्मा, विजयकुमार जलपिल्ले, विजय तिवारी, रमाकांत खेतान, मनोज खंडेलवाल, मनोहर पंजवाणी आदी उपस्थित होते. चौकामध्ये अशीही खबरदारी : श्री सार्वजनिक गणेशोत्सव मंडळातर्फे प्रत्येक चौकात पदाधिकारी, पोलिस कर्मचारी तैनात होते. कोणताही अनुचित प्रकार घडू नये, मिरवणूक शांततेने पार पडावी, दोन मंडळांतर्फे जास्त अंतर राहू नये.

चिमुकल्यांचाही सहभाग शहरात महाराणा प्रताप बागेजवळच्या गणेशघाट येथे विसर्जनासाठी कुंड तयार करण्यात आले होते. बाप्पाला निरोप देण्यासाठी सर्वात पुढे पालकांसोबत चिमुकले अग्रेसर होते. गणपती निघाले आपल्या गावाला, चैन पडेना आम्हाला, अशी काहीशी अवस्था गत दहा दिवस मनोभावे सेवा केलेल्या गणेश भक्तांची झाली होती.

निरोप घेतो देवा आता आज्ञा असावी, चुकले आमचे काही तर क्षमा असावी, असा भाव व्यक्त गणेशभक्तांनी गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या, अशा जयघोषात लाडक्या बाप्पाला निरोप दिला.

धैर्याला, नेतृत्वाला सलाम पहलगाम हल्ल्यानंतर भारताने पाकिस्तानला ऑपरेशन सिंदूर राबवत चोख प्रत्युत्तर दिले. विसर्जन मिरवणुकीत मंडळांनी ऑपरेशन सिंदूरचे फलक लावले. यावर ऑपरेशनच्या प्रक्रियेत सहभागी लष्कराच्या अधिकारी व्योमिका सिंग व कर्नल सोफिया कुरेशी यांची छायाचित्रे होती. व्योमिका सिंग व कर्नल सोफिया कुरेशी यांच्या धैर्याला व नेतृत्वाला सलाम. ऑपरेशन सिंदुरमधील त्यांच्या प्रेरणादायी भूमिकेसाठी अभिमान.

सामर्थ्य व महिला सक्षमीकरणाच्या खऱ्या प्रतीक आहेत, फलकावर नमूद करण्यात आले होते.

व्यायाम शाळांची परंपरा कायम व्यायाम शाळा, आखाड्यांची परंपरा गणेशोत्सव मिरवणुकीत कायम असल्याचे दिसून आले यात श्री जयभवानी व्यायाम शाळा (शिवापूर), श्री रामभरोसे छत्रपती आखाडा (शिवसेना वसाहत), श्री रामभरोसे हनुमान आखाडा (रजपूतपुरा), श्री हनुमान आखाडा (अनिकट), हनुमान आखाडा (खदान) सहभागी झाला. युवक-युवतींनी लाठी-काठी, भवरासह अन्य कवायती सादर केल्या.

मानाच्या श्री बाराभाई गणपतीच्या पूजनेतर ११.३० वाजता अन्य मंडळे पुढे सरकली. मिरवणूक वीर हनुमान चौक, जनता बँक, टिळक रोड, अकोट स्टँड, सुभाष चौक, तेलीपुरा चौक, मो. अली चौक (ताजनापेठ पोलिस चौकी), गांधी चौकातून मार्गक्रमण करत गणेश घाट येथे समारोप झाला. ताजनापेठ चौकातून रात्री सुमारे १ च्या सुमारास शेवटचे मंडळ निघाले. रात्री १.३० च्या सुमारास शेवटच्या मंडळाकडून गणेश मूर्तीचे विसर्जन झाले. मुस्लिम बांधव व गणेश भक्तांनी एकमेकांचे स्वागत करून आभार मानले.

# समृद्धीवर २.४३ कोटींची धाडसी चोरी

■ **महासागर प्रतिनिधी**
**अकोला, दि. ८ :**

समृद्धी महामार्गावर धावत्या कंटेनरमधून २.४३ कोटीचे औषधे लंपास करणाऱ्या आंतरराज्य टोळीला वाशीम पोलिसांनी मोठ्या शिताफीने गजाआड केले. या टोळीने विविध राज्यात गुन्हे केले आहेत. टोळीला पकडण्यासाठी तब्बल ८५ हजार वाहनांची तपासणी पोलिसांनी केली.



भिवंडी येथून बोट कंपनीच्या गोदामातून कंटेनरमध्ये (क्र.एमएच ०४ जेके ७०५४) औषधांचा माल नेण्यात येत होता. समृद्धी महामार्गावर धावत्या कंटेनरचे कुलूप तोडून दोन कोटी ४३ लाख ८६ हजार ६८४ रुपयांचे औषधे अज्ञात चोरट्यांनी लंपास केले होते. या प्रकरणी ३० जुलै रोजी कंपनी व्यवस्थापक मनोज कुमार यांच्या तक्रारीवरून कारंजा ग्रामीण पोलीस ठाण्यात विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला. पोलीस अधीक्षक अनुज तारे यांचे मार्गदर्शनाखाली गुन्ह्याचा समांतर तपास स्थानिक गुन्हे शाखा व सायबर शाखेकडे देण्यात आला. या प्रकरणी समृद्धी महामार्गावरुन धावलेल्या ८५ हजार संशयित वाहनांची तपासणी केली.

आरोपी पुन्हा गुन्हा करण्याच्या हेतूने ट्रक (क्र. एमपी ०९ एचएच ९८२९) घेऊन आले. वाशीम पोलिसांच्या पथकांनी पाठलाग करुन मोठ्या शिताफीने ट्रक अडवून त्याची झडती घेतली. ट्रकमधील संशयित आरोपी अरबिंद अनाबसिंग चौहान, बुरा उर्फ कुलदीप भारत छाडी, कुनाल नरेश चौहान, अंतिम कल्याण सिसोदीया यांना ताब्यात घेऊन चौकशी केली. त्यांनी मुख्य आरोपी राजेंद्र सादुलसिंग चौहान हा असल्याचे सांगितले. त्याला मध्य प्रदेशमधील देवास स्थानिक गुन्हे शाखेने ताब्यात घेतले.

गुन्ह्यात वापरण्यात आलेली मोटार देखील जप्त करण्यात आली. या टोळीने महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांसह गोवा, कर्नाटक व गुजरात राज्यात गुन्हे केले आहेत. आरोपींकडून गुन्ह्यात वापरलेला ३८ लाख २० हजारांचा मुद्देमाल जप्त केला.

गुन्ह्यात चोरी गेलेल्या औषधांचा शोध घेण्यासाठी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक विविध ठिकाणी रवाना करण्यात आले आहेत. या गुन्ह्यात एकूण सहा आरोपीना अटक करण्यात आले आहे. आरोपींना न्यायालयाने १२ सप्टेंबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावली. ही कारवाई पोलिस अधीक्षक अनुज तारे, अपर पोलीस अधीक्षक लता फड, उपविभागीय पोलीस अधिकारी प्रदीप पाडवी यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखा, सायबर सेल व कारंजा ग्रामीण पोलीस ठाण्यातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी केली.

## शेगाव येथील टावरी परिवाराकडून मरणोत्तर नेत्रदान

■ **महासागर प्रतिनिधी, बुलढाणा, दि. ८ :**

शेगाव येथील टावरी परिवाराने समाजासाठी प्रेरणादायी ठरणारे कार्य घडवून आणत मरणोत्तर नेत्रदानाचा आदर्श घालून दिला आहे. येथील ज्येष्ठ नागरिक दिवंगत रामगोपाल टावरी (वय ८० वर्षे) यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या इच्छेनुसार नेत्रदान करण्यात आल्याची माहिती जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अमोल गिते यांनी दिली. ही प्रक्रिया जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. दत्तात्रय बिराजदार व जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अमोल गिते यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. यासाठी जिल्हा नेत्र शल्यचिकित्सक डॉ. रवी शिंदे, डॉ. अमोल उगले, नेत्रसमुपदेशक योगेश सिरसाट व सौरभ हिवाळे यांनी समन्वय साधत संपूर्ण प्रक्रिया यशस्वीरीत्या पूर्ण केली.

या कार्यामुळे समाजात टावरी कुटुंबाचे कौतुक होत असून विविध स्तरांतून त्यांचा गौरव केला जात आहे. दिवंगत रामगोपाल टावरी यांच्या इच्छापूर्तीमुळे अनेकांनी त्यांच्या सामाजिक कार्यास व कुटुंबाच्या निर्णयास दाद दिली आहे. नेत्रदानामुळे गरजू व्यक्तींना नवीन दृष्टी लाभणार असून समाजात एक आदर्श निर्माण केला आहे. नेत्रदानाच्या या उपक्रमामुळे अनेकांना नवजीवन मिळण्याची संधी उपलब्ध होणार असून, टावरी परिवाराने केलेले हे कार्य समाजासाठी प्रेरणादायी ठरत आहे.

# दगडमातीने केली वनराई बंधाऱ्यांची निर्मिती

■ **महासागर प्रतिनिधी,**
**खामगाव, दि. ८ :**

दरवर्षीच पावसाळ्यात डोंगरावरून लाखो लिटर पाण्यासोबतच हजारो टन माती, मृदा वाहून जाते व ज्यामुळेच धरणातील पाणी साठवण्याच्या क्षमतेला अडथळे निर्माण होतात. म्हणूनच शासकीय व सामाजिक स्तरावर वनराई बंधारे निर्माण करण्याची एक सोपी पध्दत काही वर्षापूर्वी अस्तित्वात होती ज्यास येथील सृष्टीमंगलम् प्रतिष्ठानच्या वतीने पुन्हा मुर्तरूप देण्याचे काम गेल्या पाच वर्षांपासून अविरत सुरू ठेवले असून यावर्षी वेगवेगळ्या दिन विशेषांचे औचित्य साधून जवळपास पाच वनराई बंधारे निर्माण केले आहेत.

या कार्यासाठी सकल सामाजिक संस्थांचा दरवर्षीच हातभार लागत असून आज पर्यंत अनेक बंधारे लेकुरवाळी टेकडी, नंदाखोरा, सोनबर्डी व जाफ्राबादी टेकडीवर निर्माण केले असून यामाध्यमातून लाखो लिटर पाणी जमिनीत खोलवर जिरवण्यात येत असून सोबतच हजारो टन मृदा संवर्धन करण्यात येत आहे. या उपक्रमाचा फायदा नजिकच असलेल्या



शेतकरी व शेतजमीनसही होत असल्याचे शेतकरी ग्वाही देत आहेत. सामाजिक सेवेतून विधायक कार्य पार पडतात याला जर शासकीय हातभार लागला तर नक्कीच निसर्ग संवर्धन होईल. यावर्षी फोटोग्राफी डे, फ्रेंडशिप डे ,वन महोत्सव सप्ताह, श्रावण सोमवार अशा निमित्त वनराई बंधारे निर्माण करून त्या बंधाऱ्यांना त्याच दिन विशेषाची नांवे देण्यात आली. दगड मातीच्या या बंधा-यांची ऊंची तीन ते चार फूट असून लांबी पंधरा ते पंचवीस फूट आहे. मोठ्या प्रमाणात पाणी अडवा - पाणी जिरवा या उपक्रमा सोबतच मृदु संधारण सुध्दा होत आहे. वरील उपक्रमास कलाध्यापक संजय गुरव यांचे मार्गदर्शन लाभत असून विजय खंडागळे, गणेश कोकाटे, संदीप फंदाट, वैभव कारंजकर, राजेश शर्मा, उमेश खेडकर, दिनेश उखळकर, संतोष डवले, गौरव इंगळे, सुभाष बोचरे आदीचे सहकार्य लाभत असून फोटोग्राफर असोसिएशन खामगाव या उपक्रमात सामील झाले आहे.

## पुसद येथील डॉ. प्रिया शेजुळे यांची इस्त्रोमध्ये संशोधन शास्त्रज्ञ म्हणून निवड

■ **महासागर प्रतिनिधी,**
**पुसद, दि. ८ :**

डॉ. प्रिया शेजुळे यांची भारतीय अंतराळ संशोधन संस्थेत (इस्त्रो) मध्ये संशोधन शास्त्रज्ञ म्हणून निवड झाली आहे. कष्ट, चिकाटीच्या जोरावर त्यांनी हे यश मिळवले आहे. त्यांचा संघर्षमय प्रवास आज लाखो तरुण स्वप्नवतांना आशेचा किरण आणि प्रेरणेचा स्रोत ठरत आहे.



डॉ. प्रिया शेजुळे यांचे वडील अशोक शेजुळे हे तलाठी म्हणून शासकीय सेवेत कार्यरत आहेत. तर आई अनिता ही गृहिणी आहे. अल्प साधनांच्या वातावरणात वाढलेल्या प्रियाला लहानपणापासूनच पालकांनी शिस्त, शिक्षण व कठोर मेहनतीची मूल्ये दिली. प्रियाचे शालेय शिक्षण पुसद येथील महात्मा मुंगसाजी विद्यालय (पूर्व प्राथमिक) आणि नंतर राणी लक्ष्मीबाई विद्यालयात झाले. पुसदच्या के. डी. हायस्कूलमधून एसएससी परीक्षेत तिने गुणवत्ता यादीत स्थान मिळवले. त्यानंतर पी. एन. महाविद्यालयात उच्च माध्यमिक शिक्षण पूर्ण केले.

पुणे येथील अभियांत्रिकी महाविद्यालयात शिक्षण घेतल्यानंतर एनआयटी राऊरकेला (ओडिशा) येथे एम.टेक. नंतर आयआयटी गुवाहाटी येथे पीएच.डी. केली. राष्ट्रीय महत्त्वाच्या प्रकल्पांतर्गत "पूरव्यवस्थापन आणि सुधारित पर्जन्यमान अंदाज' या विषयावर केलेल्या उत्कृष्ट संशोधनासाठी तिला पंतप्रधान संशोधन फेलोशिप मिळाली. या काळातच तिने आपल्या संशोधनाची मांडणी करण्यासाठी जगभरातील अनेक शैक्षणिक परिषदांमध्ये अमेरिका, दक्षिण कोरिया आणि युरोप येथे सहभाग घेतला. आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताचे प्रतिनिधित्व केले. तिच्या चार संशोधन लेखांना आंतरराष्ट्रीय स्तरावर मान्यता मिळाली.

## वडनेरच्या महाराणा गणेश मंडळ येथे रोगनिदान शिबिर

■ **महासागर प्रतिनिधी,**
**दर्यापूर, दि. ८ :**

तालुक्यातील वडनेर गंगाई येथे आरोग्य सेवा तुमच्या दारी या अभियानांतर्गत महाराणा गणेश मंडळ येथे रोगनिदान शिबिर पार पडले. मंडळाचे सचिव अभिषेक मावळे यांच्या पुढाकारातून हे शिबिर घेण्यात आले. दरवर्षीप्रमाणे यावर्षी देखील वडनेरगंगाई येथील महाराणा गणेशोत्सव मंडळाने आपली सामाजिक बांधिलकी जोपासत आरोग्य सेवा बळकट करण्यासाठी पुढाकार घेतला आहे. या हेतूने प्रेरित होत मंडळाचे सचिव अभिषेक मावळे यांच्या पुढाकारातून व प्राथमिक उपकेंद्र वडनेर गंगाई येथील स्टाफच्या समन्वयातून आरोग्य तपासणी शिबिर पार पडले. या शिबिराला प्रमुख म्हणून शुभम बायस्कार यांनी उपस्थित राहत वैद्यकीय तपासण्या करून घेतल्या. तर शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी विशाल माहुलकर, ऋषिकेश इंगळे, प्रणव कंटाळे, आकाश माहुलकर संदीप डोफे, सागर माहुलकर, स्वप्निल माहुलकर, स्वप्निल कंटाळे, गोपाल माहुलकर, सुमित गाडखे, प्रज्वल माहुलकर यांनी प्रयत्न केले.

# गोंधळ, गणराज वंदनेसह जनजागृतीच्या नाट्यातून रंगला पहिला राज्य महोत्सव

■ **महासागर प्रतिनिधी**
**वाशीम, दि. ८ :**

गणरायाचा उत्सव हा धार्मिक सोहळा समाजातील एकात्मता, बंधुभाव आणि सांस्कृतिक वारसा जपण्याची मोठी संधी आहे. या निमित्ताने होणाऱ्या विविध कलात्मक सादरीकरणांतून सामाजिक जाणीवा, पर्यावरण संवर्धन व संस्कृतीचे महत्त्व अधोरेखित केले जाणार आहे. राज्य सरकारने गणेशोत्सवास राज्य उत्सवाचा दर्जा दिला आहे. ही अभिमानाची बाब असून यातून परंपरांसोबतच आधुनिक सामाजिक मूल्ये जपण्याचा संदेश दिला जातो. अशा कार्यक्रमांतून युवकांना प्रेरणा मिळून समाजहितासाठी नवे उपक्रम घडतील, असे प्रतिपादन




जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी यावेळी केले.

सांस्कृतिक कार्य विभाग, सांस्कृतिक कार्य संचालनालय मुंबई व जिल्हाधिकारी कार्यालय वाशीम यांच्या संयुक्त विद्यमाने महा गणेशोत्सवाच्या निमित्ताने जिल्हा क्रीडा संकुलातील बॅडमिंटन हॉल येथे भव्य सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

यावेळी कार्यक्रमाच्या निमित्ताने व्यासपीठावर जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर, निवासी उपजिल्हाधिकारी विश्वनाथ घुगे, उपविभागीय अधिकारी वैशाली देवकर, तहसीलदार नीलेश पळसकर, नगर परिषद मुख्याधिकारी नीलेश गायकवाड, जिल्हा क्रीडा अधिकारी किशोर बोंडे, मनीष मंत्री आदी मान्यवर उपस्थित होते. सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार यांच्या संकल्पनेनुसार या वर्षीपासून गणेशोत्सवास राज्य उत्सवाचा दर्जा देण्यात आला आहे. नेहरू युवा मंडळाने गोंधळी गीत सादर करून सुरुवात केली. मागासवर्गीय मुलींच्या वसतिगृहातील मुलींनी गणरायाचे गीत सादर करून वातावरण भारावले. प्रदीप पट्टेबहादूर व संचाने पर्यावरण संवर्धनावर आधारित प्रभावी पथनाट्य सादर केले. महेश राठोड व संच व गजानन कक्कर व संचाने गणेश भक्तिगीते सादर करून उपस्थितांना भक्तिरसात न्हाऊ घातले.

## मेहकर शहरामध्ये पोलिसांच्या गणेशाचे विसर्जन

**मेहकर :** गणपत्ती बाप्पाच्या विसर्जना दरम्यान कर्तव्य पार पाडल्यानंतर स्थानिक पोलिस वसाहतीतील गणरायाला आज, दि. ७ सप्टेंबर रोजी मिरवणूक काढून निरोप देण्यात आला. या वेळी अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सामाजिक संदेशपर फलक हातात घेऊन सहभाग घेतला. शनिवार, दि. ६ सप्टेंबर रोजी शहरातील गणेश विसर्जन उत्साहात व शांततेत पार पडले. या दरम्यान कायदा व सुव्यवस्था कायम राखण्यासाठी पोलिस दलाने चोख बंदोबस्त ठेवला. यावेळी स्वतःच्या घरच्या सणावारापेक्षा सामान्य नागरिकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देत कर्मचाऱ्यांनी कर्तव्य बजावले. यावेळी ठाणेदार व्यंकटेश आलेवार यांच्यासह पोलिस कर्मचा?यांनी सामाजिक संदेशपर फलक हातात घेऊन मिरवणुकीत सहभाग घेतला. काढण्यात आलेल्या या मिरवणुकीदरम्यान सामाजिक संदेश देण्यात आला.

# "नंददीप'मुळे वृद्धाला मिळाले कुटुंबीय

■ **महासागर प्रतिनिधी**
**यवतमाळ, दि. ८ :**

तालुक्यातील वाई येथे रस्त्यावर उपद्रव घालणाऱ्या एका वृद्ध व्यक्तीला ग्रामीण पोलिसांनी नंददीप येथे आणून सोडले. त्यांना असलेल्या विसरभोळेपणाच्या आजारामुळे ते तसे वागत होते. नंददीप येथे पाच दिवसांच्या मानसोपचारानंतर त्यांना आर्णी तालुक्यातील पांगरी येथे कुटुंबीयांकडे नुकतेच पूनर्वसित करण्यात आले.

तत्पूर्वी केंद्राचे निशांत सायरे यांनी वणी, पिंपळखुटी, नांझा, कळंब, जोडमोहा, घाटंजी, अकोला बाजार आणि शेवटी म्हसोला ही गावे पालथी घातली. मोतीराम वारलू आडे (वय ७७) असे त्यांचे नाव आहे. वाई येथून ग्रामीण पोलिस ठाण्याचे ठाणेदार सुनील नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली खुशाल आडे, कुणाल पोलपेलावार, कृष्ण मेश्राम तसेच नाना कदम यांनी त्यांना दि. २७ ऑगस्ट रोजी समर्थवाडी येथील संदीप व नंदिनी शिंदे यांच्या नंददीप बेघर मनोरुग्ण निवारा केंद्रात दाखल केले.

त्यांच्यात डिमेंशिया या आजाराची लक्षणे दिसत असल्याने त्यानुसार त्यांच्यावर पाच दिवस औषधोपचार करण्यात आले. त्यानंतर केंद्राचे स्वयंसेवक निशांत सायरे, कृष्णा मुळे, कार्तिक भेंडे तसेच स्वप्नील सावळे यांनी त्यांच्या कुटुंबीयांचा शोध घेण्याची मोहीम हाती घेतली. आठ गावांना भेटी दिल्यानंतर आर्णी तालुक्यातील पांगरी येथे त्यांचे कुटुंबीय सापडले. त्यांना पत्नी रुखमा व मुलगा जना यांच्याकडे सोपवण्यात आले. मोतीराम यांची विचारपूस केल्यानंतर ते शिवणी (जोडमोहा) हे गाव असल्याचे सांगत होते. परंतु, शिवणी येथे पोहोचल्यावर त्या गावामध्ये त्यांना कुणीही ओळखले नाही. तेथून निघत असताना मात्र, प्रत्येक वृद्धाला त्यांची ओळख पटली. त्यांनी नांझा येथे त्यांचा भाऊ राहतो, अशी माहिती दिली. यानंतर नांझा येथे भाऊ नथुजी आडे यांची भेट झाली. ते म्हणाले की, मोतीराम यांची पत्नी व मुलगा कळंब येथे राहतात. तेथून कळंब येथे गेल्यानंतर त्यांच्या मुलाने सांगितले की, मोतीराम यांनी दुसरे लग्न केले आणि ते आपल्या त्या पत्नीसोबत आर्णी तालुक्यातील पांगरी येथे राहतात. तेव्हा मात्र पांगरी या गावात त्यांचे कुटुंबीय सापडले. अंगणवाडीच्या रूममध्ये ते राहत होते. आठ गावे पालथी घातल्यानंतर ही मोहीम यशस्वी झाली.

# कोणतेही सामाजिक कार्य सर्वांच्या मदतीनेच शक्य होते : प्रा. डॉ. प्रशांत गावंडे

■ **महासागर प्रतिनिधी**
**यवतमाळ, दि. ८ :**

संघर्षातुन माणूस घडत असतो, चांगल्या कार्याची वेगळी ओळख निर्माण करावी, कोणतेही कार्य सर्वांच्या मदतीने शक्य होते. आई-वडिल हे प्रेरणा स्त्रोत आहे. त्यांची सेवा करावी. यवतमाळ ही माझी जन्मभूमी व कर्मभूमी आहे असे विचार डॉ. प्रशांत गावंडे यांनी व्यक्त केले. जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था यवतमाळ यांच्या वतीने प्राचार्य डॉ. प्रशांत गावंडे व अधिव्याख्याता डॉ. देवानंद सावरकर हे नियतवयोमानाने सेवानिवृत्त झाल्याने शिक्षक दिनाचे औचित्य साधून त्यांच्या सेवापुर्ती सोहळ्याचे आयोजन शुक्रवार दि. ५ सप्टेंबर रोजी जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्थेत करण्यात आले होते. त्यावेळी सत्काराला उत्तर देताना ते बोलत



होते.

राज्यस्तरीय सन्मान सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य डॉ. रमेश राऊत तर प्रमुख अतिथी म्हणून सत्कारमूर्ती माजी प्राचार्य डॉ. प्रशांत गावंडे व सेवानिवृत्त ज्येष्ठ अधिव्याख्याता डॉ. देवानंद सावकर, अमरावती डायटचे सेवानिवृत्त प्राचार्य डॉ.प्रशांत डवरे, अमरावती डायटचे प्राचार्य डॉ. मिलींद कुबडे, डॉ. प्रविण राठोड अमरावती, बालाजी शेळके अकोला, डॉ. किरण रापतवार नांदेड, बजरंग बोडखे नांदेड, नितीन भालचक्र अकोला, डॉ. संजयकुमार खाडे, उपशिक्षणाधिकारी राजू मडावी, डॉ. विजयकुमार शिंदे, अधिव्याख्याता धम्मरत्न वायवळ, मधुमती सांगळे, सारिका पवार, प्राचार्य डॉ. वानखेडे, गटशिक्षणाधिकारी पोपेश्वर भोयर, विस्तार अधिकारी प्रणिता गाढवे, संगीता गावंडे, नलिनी सावरकर आदि मान्यवरांची उपस्थिती होती.

उपस्थित मान्यवरांनी शिक्षक दिनाचे औचित्य साधुन माजी राष्ट्रपती डॉ. राधाकृष्णन व क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करुन दीपप्रज्वलन केले. यावेळी प्रास्ताविक अधिव्याख्याता धम्मरत्न वायवळ यांनी केले. याप्रसंगी प्राचार्य मिलींद कुबडे, माजी प्राचार्य डॉ. प्रशांत डवरे, गटशिक्षणाधिकारी पोपेश्वर भोयर, उपशिक्षणाधिकारी राजू मडावी, मधुमती सांगळे, राजेंद्र गोबाडे, अशोक राऊत यांनीही समयोचित प्रतिक्रिया व्यक्त केली. यावेळी जिल्ह्यातील व अमरावती, अकोला, हिंगोली, नांदेड आदि जिल्ह्यातील शिक्षण क्षेत्रात कार्य करणाऱ्यांसह जिल्ह्यातील साधनव्यक्ती, केंद्रप्रमुखांचा सहभाग होता.


**जाहीर सुचना**

जनतेला सूचना देण्यात येते की, श्री. आनंद विजय देशपांडे आणि श्रीमती स्वप्ना आनंद देशपांडे, जिल्हा नागपूर यांचे मालमत्तेच्या अनुसूचीमध्ये विशेषत: वर्णन केलेल्या मालमत्तेच्या संदर्भात मालकी हक्क म्हणजेच मालक हक्काचे विक्री दस्तावेज वरील मालकाने सादर केले आहे. ती विक्री दस्तावेज बँक ऑफ महाराष्ट्र, सीताबर्डी शाखा, नागपूर कार्यालयातील रेकॉर्डमध्ये मिळत नाही. जे कर्ज प्रकरणादरम्यान गहाण ठेवण्यासाठी जमा करण्यात आले होते. जर हे दस्तावेज कोणाला मिळाल्यास कृपया बँक ऑफ महाराष्ट्र, सीताबर्डी शाखा, नागपूर संपर्क कमांक ७०६६६९६००५ ला कळवा.

**मिळतनसलेल्या मूळ विक्री दस्तावेज चे वर्णन खालीलप्रमाण :** दस्ताऐवज कमांक ३८९/२०२५ दिनांक १६/०१/२०२५ नागपूर येथे उप-निबंधक कमांक ७ म्हणून नोंदणीकृत, अपार्टमेंट कमांक एफ ११०४, ११वा मजला, इमारतीमध्ये "जयंती नगरी-VII" नावाचा विंग-एफ, मोजमाप कार्पेट क्षेत्रफळ १०३.२३६, जमीनीतील अविभाजित भाग ०.५०७३%, भूखंड कमांक १ असलेल्या बिगर शेती जमिनीचा भाग व तुकडा, प्लॉट नं. १, क्षेत्रफळ ६२२७.४३४ चौ.मी., संपूर्ण जमीनीचा भाग, सर्वे / खसरा नं. ८२/२, मौजा बेसा, पी.एस.के नं. ३८-ए, गाव बेसा, तह. नागपूर आणि जिल्हा नागपूर, **अपार्टमेंटची चतु:सिमा :** पुर्व : अपार्टमेंट नं. एफ - ११०१, पश्चिम : अपार्टमेंट नं. ई - ११०१, उत्तर : अपार्टमेंटची जागा, दक्षिण : अपार्टमेंट नं. एफ - ११०३



**सार्वजनिक सूचना**

जनतेला येथे कळविण्यात येते की, माझे क्लायंट, अनिरुद्ध श्रीकृष्ण हरणे, डॉ. श्रीकृष्ण दिगंबर हरणे यांचे पुत्र, हे गाव-लखपुरी येथे अनुक्रमे २.०० हे. आसपास असलेल्या सर्व्हे क्रमांक ४७०, खाते क्रमांक ७७४ असलेल्या मालमत्तेचे कायदेशीर मालक आहेत.

जर कोणाला वर नमूद केलेल्या विक्री व्यवहाराबद्दल कोणताही आक्षेप, हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावे आणि वाद असतील, तर ते प्रकाशनाच्या तारखेपासून १४ दिवसांच्या आत कागदोपत्री पुराव्यासह अधोस्वाक्षरीकर्त्याशी संपर्क साधू शकतात, असे न केल्यास, माझा क्लायंट वर नमूद केलेल्या मालकासोबत विक्री व्यवहार पूर्ण करण्यास पुढे जाईल आणि असे मानले जाईल की असे दावे असल्यास, ते माफ केले गेले आहेत आणि सोडून दिले गेले आहेत.

अनुसूचित मालमत्ता

सर्व शेती जमिनीचे तुकडे आणि भाग अनुक्रमे सर्व्हे क्रमांक ४७०, खाते क्रमांक ७७३, सुमारे २.१८ हे. क्षेत्रफळ असलेले, गाव-लखपुरी, तालुका मूर्तिजापूर येथे, ग्रामपंचायत-लखपुरी, तालुका मूर्तिजापूरची उप-नोंदणी आणि विभाग आणि जिल्हा नोंदणी-अमरावती, अकोला यांच्या हद्दीत आहेत.

ॲड. तन्वी डी. कोटक
१०८, बी विंग, परम टॉवर, साई प्रणय हॉटेलच्या शेजारी, तीन हात नाका, ठाणे पश्चिम-४००६०४.
मोब: ९१०७३८१३८१
ठिकाण: नागपूर दिनांक: ०९.०९.२०२५



**सार्वजनिक सूचना**

जनतेला कळविण्यात येते की, माझे क्लायंट, डॉ. श्रीकृष्ण दिगंबर हरणे यांची कन्या अनुप्रिता श्रीकृष्ण हरणे यांनी, लक्षपुरी गावातील अनुक्रमे २.१८ हे. क्षेत्रफळ असलेल्या सर्व्हे क्रमांक ४७०, खाते क्रमांक ७७३ असलेल्या मालमत्तेच्या मालकी हक्काच्या हस्तांतरणासाठी अर्ज केला आहे, जो पूर्वी त्यांच्या मृत वडिलांच्या नावावर होता.

डॉ. श्रीकृष्ण दिगंबर हरणे यांच्या निधनानंतर आणि लागू असलेल्या वारसाहक्क कायद्यानुसार, माझ्या क्लायंटने सदर मालमत्तेचे हस्तांतरण करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे.

जर कोणाला वर नमूद केलेल्या विक्री व्यवहाराबद्दल कोणताही आक्षेप, हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावे आणि वाद असेल, तर तो/ती प्रकाशनाच्या तारखेपासून १४ दिवसांच्या आत कागदोपत्री पुराव्यासह अधोस्वाक्षरीकर्त्याशी संपर्क साधू शकतो, असे न केल्यास, माझा क्लायंट वर नमूद केलेल्या मालकासोबत विक्री व्यवहार पूर्ण करेल आणि असे मानले जाईल की असे दावे असल्यास, ते माफ केले गेले आहेत आणि सोडून दिले गेले आहेत.

अनुसूचित मालमत्ता

सर्व शेती जमिनीचे तुकडे आणि भाग अनुक्रमे सर्व्हे क्रमांक ४७०, खाते क्रमांक ७७३, सुमारे २.१८ हे. क्षेत्रफळ असलेले, गाव-लखपुरी, तालुका मूर्तिजापूर येथे, ग्रामपंचायत-लखपुरी, तालुका मूर्तिजापूरची उप-नोंदणी आणि विभाग आणि जिल्हा नोंदणी-अमरावती, अकोला यांच्या हद्दीत आहेत.

ॲड. तन्वी डी. कोटक
१०८, बी विंग, परम टॉवर, साई प्रणय हॉटेलच्या शेजारी, तीन हात नाका, ठाणे पश्चिम-४००६०४.
मोब: ९१०७३८१३८१
ठिकाण: नागपूर दिनांक: ०९.०९.२०२५

# राजीनामा किंवा अविश्वास प्रस्ताव?

नवीन उपराष्ट्रपतीची निवडणूक ९ सप्टेंबर रोजी होणार आहे. यामध्ये एनडीएचे महाराष्ट्राचे राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन आणि सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायाधीश बी. सुदर्शन रेड्डी यांच्या विरोधात उभे आहेत. या निवडणुकीविषयी फारशी उत्सुकता आणि चर्चा दिसत नाही. तथापि, सर्व काही सुरळीत सुरू असताना जगदीप धनखड यांनी अचानक राजीनामा का दिला? मंगळवारच्या निवडणकीनंतर नवीन उपराष्ट्रपती मिळतील. त्यानंतर धनखड त्यांच्या राजीनाम्याचे कारण स्पष्ट करतील का?

-----------------

२१ जुलै रोजी संसदेचे पावसाळी अधिवेशन सुरू झाले. जगदीप धनखड यांनी दिवसभर राज्यसभेचे अध्यक्ष म्हणून सभागृहाचे कामकाज चालवले. त्यानंतर त्याच रात्री अचानक उपराष्ट्रपतीपदाचा राजीनामा दिल्याची बातमी आली. त्यांनी पद सोडण्याचे कारण प्रकृती अस्वास्थ्याचे दिले.

या राजीनाम्याबद्दल माध्यमांमध्ये अनेक तर्कवितर्क सुरू झाले. तथापि, ४८ दिवसांनंतरही धनखड यांनी या प्रकरणावर मौन बाळगले आहे. धनखड यांच्या जवळच्या सूत्रांचे म्हणणे आहे की, ९ सप्टेंबरपूर्वी हे मौन तुटणार नाही. योग्य वेळ आल्यावर ते पुढे येतील आणि परिस्थिती स्पष्ट करण्यासाठी स्वतःचा निर्णय घेतील.

प्रत्यक्षात, धनखड यांच्या जवळच्या लोकांनी असाही दावा केला की धनखड यांनी स्वतःहून राजीनामा दिला नाही. त्यांना राजीनामा देण्यास सांगण्यात आले. सूत्रांच्या माहितीनुसार, त्यांच्याकडे दोन पर्याय होते, पहिला, स्वतःहून राजीनामा देणे. दुसरा, अविश्वास प्रस्तावाला सामोरे जाणे. उपराष्ट्रपती भवनातील विश्वसनीय सूत्रांनी पुष्टी केली आहे की धनखड यांना एक दिवस आधी माहित नव्हते की त्यांना राजीनामा द्यावा लागू शकतो. उपराष्ट्रपती धनखड २१ जुलै रोजी राज्यसभेच्या कामकाजाला उपस्थित राहिले. नंतर त्यांनी संध्याकाळी राजीनामा दिला.

जगदीप धनखड यांच्या जवळच्या एका सूत्राचा दावा आहे की, 'धनखड यांना दोन जणांमार्फत राजीनामा देण्याचा संदेश पाठवण्यात आला होता. यामागील खरे कारण काय होते हे फक्त धनखडच सांगू शकतात. २१ जुलै रोजीच धनखड यांना राजीनामा देण्याचा संदेश पाठवण्यात आला होता याची पुष्टी झाली आहे.

माजी उपराष्ट्रपतींकडे दोन पर्याय होते. पहिला, ते स्वतः राजीनामा देऊ शकत होते. दुसरा, त्यांना अविश्वास प्रस्तावाला सामोरे जावे लागू शकते. त्यांनी पहिला पर्याय निवडला कारण त्यांना दुसरा पर्याय निवडून अपमानित व्हायचे नव्हते.'


घटनात्मकदृष्ट्या, उपराष्ट्रपती हे पद राष्ट्रपतींच्या खाली आणि पंतप्रधानांच्या वर आहे. माजी उपराष्ट्रपती सतत त्यांच्या पदानुसार प्रोटोकॉलची मागणी करत होते, असे वृत्त देखील आले होते. जे त्यांना सरकारकडून मिळत नव्हते.

या सिद्धांतावर, सूत्र म्हणाले, 'यात काय चूक होती? माजी उपराष्ट्रपतींनी एकदा एका बैठकीत गृहमंत्र्यांच्या कडक स्वरात हस्तक्षेपावर आक्षेप घेतला होता. अशा अनेक कथा आहेत. माहितीनुसार, आतापर्यंत कोणतीही वेळ निश्चित केलेली नाही, पण, ते नक्कीच कधीतरी येतील.'

सूत्रांनुसार, 'धनखड संघाच्या जवळ जाऊ इच्छित होते. ते संघाच्या अनेक वरिष्ठ नेत्यांनाही भेटले. संघाकडे दुर्लक्ष होत असल्याबद्दल आणि त्यांच्या सल्ल्याकडे दुर्लक्ष केले जात असल्याबद्दल त्यांनी तक्रार केली. गेल्या एका वर्षात त्यांनी संघाच्या बाजूने अनेक मोठी विधाने केली. याच वेळी संघ आणि भाजपमधील मतभेदांबद्दल माध्यमांमध्ये बातम्या आल्या होत्या.'

धनखड यांना वाटले की संघ त्यांच्या बाजूने उभा राहील. तथापि, संघाने स्पष्ट केले की ते या प्रकरणात 'तटस्थ' राहतील.

सूत्रांनी सांगितले की, त्याऐवजी संघाने धनखड यांना सांगितले की, 'त्यांनी सार्वजनिक व्यासपीठावरून संघाचे कौतुक करू नये कारण यामुळे दोन संदेश जातील. पहिले, असे दिसून येईल की हे सर्व संघाच्या इशाऱ्यावर घडत आहे. दुसरे, पक्ष आणि संघटनेत गैरसमज वाढू शकतात.'



धनखड यांनी संघाच्या समर्थनार्थ काही विधाने केली होती.

**१. संघराज्याची टीका ही संविधानाच्या विरुद्ध**

३१ जुलै २०२४ रोजी समाजवादी पक्षाचे खासदार रामजीलाल सुमन यांनी राष्ट्रीय चाचणी संस्थेच्या (एनटीए) अध्यक्षांच्या नियुक्तीवर प्रश्न उपस्थित केले होते. प्रत्युत्तर यामध्ये संघाचे नाव पुढे आले होते. यावर धनखड म्हणाले होते, 'आरएसएसवर टीका करणे संविधानाच्या विरुद्ध आहे. देशाला आरएसएसचा अभिमान असला पाहिजे.' 'राष्ट्राची निःस्वार्थपणे सेवा करण्यास वचनबद्ध असलेले लोक संघात आहेत. संघ आपल्या संस्कृती, समाज आणि राष्ट्रीय हिताच्या विकासासाठी काम करत आहे. संघ हा एका जागतिक दर्जाच्या थिंक टँकसारखा आहे, त्याचे स्वयंसेवक अनेक कलांनी समृद्ध आहेत.'

२. माजी उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी २ जुलै २०२४ रोजी राज्यसभेत सांगितले होते की ते गेल्या २५ वर्षांपासून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे (आरएसएस) चाहते आहेत. एकलव्यशी स्वतःची तुलना करताना त्यांनी म्हटले होते की त्यांना आरएसएसशी औपचारिकपणे जोडले जात नसल्याबद्दल पश्चात्ताप होतो.

धनखड म्हणाले होते, 'मी आरएसएसच्या एकलव्यासारखाच राहिलो. माझ्या मनात नेहमीच एक खंत असायची की मी पहिले वर्ष का केले नाही, दुसरे वर्ष का केले नाही, तिसरे वर्ष का केले नाही?'

३. संघाचे सरचिटणीस दत्तात्रेय होसाबळे यांनी संविधानाच्या प्रस्तावनेचा मुद्दा उपस्थित केला होता. त्यांनी त्यातून धर्मनिरपेक्ष आणि समाजवादी हे शब्द काढून टाकण्याबाबत बोलले होते. धनखड यांनी २८ जून २०२५ रोजी यावर आपले मत मांडले होते. त्यांनी म्हटले होते की, 'प्रस्तावना पालकांसारखी आहे, जी बदलता येत नाही.'

हे विधान आरएसएसच्या मागणीपेक्षा वेगळे होते. तथापि, पुढच्याच ओळीत त्यांनी आणीबाणीच्या काळात संविधानाच्या प्रस्तावनेत धर्मनिरपेक्ष आणि समाजवादी हे दोन शब्द जोडल्याबद्दल टीका केली होती. प्रत्यक्षात, भागवत यांनी त्यांच्या विधानाद्वारे स्पष्ट केले होते की हे दोन्ही शब्द मूळतः संविधानात नव्हते. हे काँग्रेसच्या काळात जोडले गेले होते.

उपराष्ट्रपती भवनातील एका सूत्रानुसार, 'जेव्हा कोणी आपल्या पदाचा राजीनामा देतो तेव्हा ते निश्चितच काही दिवस आधी त्याबद्दल विचार करतात. तथापि, धनखड यांना एक दिवस आधीपर्यंत माहित नव्हते की ते राजीनामा देणार आहेत. त्यांनी राजीनामा देण्याच्या एक दिवस आधी ४० किलो जिलेबी मागवली होती. ते हे अनेकदा करायचे. ते संपूर्ण कर्मचाऱ्यांमध्ये वाटून टाकायचे. जर त्यांना असे काही अपेक्षित असते तर त्यांनी कदाचित हे केले नसते.'

सूत्राने दावा केला की, धनखड यांना त्यांच्या राजीनाम्याची माहिती एक दिवस आधीपर्यंत नव्हती. त्यांच्या देहबोलीवरूनही ते कोणत्याही गोष्टीमुळे नाराज असल्याचे दिसून आले नाही. सूत्राने असेही म्हटले आहे की आमच्यापर्यंत पोहोचलेल्या काही बातम्यांवरून असे दिसून आले आहे की माजी उपराष्ट्रपती आणि सरकारमध्ये काहीतरी सुरू आहे.

माजी उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी २ सप्टेंबरच्या रात्री सरकारी इमारत सोडली. ते दिल्लीतील छतरपूर येथील एका फार्म हाऊसमध्ये स्थलांतरित झाले आहेत. हे फार्म हाऊस हरियाणाचे दिग्गज नेते अभय सिंह चौटाला यांचे आहे. त्यांना टाइप-८ सरकारी बंगला मिळेपर्यंत ते येथे राहू शकतात, जो त्यांना माजी उपराष्ट्रपती म्हणून हक्काचा आहे.

खरंतर, धनखड आणि आयएनएलडी प्रमुख अभय चौटाला यांच्यातील संबंध खूप जुने आहेत. जुलै २०१९ मध्येही जेव्हा धनखड यांनी बंगालचे राज्यपाल म्हणून पदभार स्वीकारला तेव्हा त्यांनी अभय सिंह चौटाला यांचे आजोबा देवीलाल यांच्याशी असलेल्या त्यांच्या संबंधांचा उल्लेख केला होता. त्यांनी म्हटले होते की देवीलाल यांनी त्यांना निवडणूक लढवण्यासाठी प्रोत्साहित केले होते. ते त्यांचे मार्गदर्शक आहेत.

१९८९ मध्ये जेव्हा देवीलाल उपपंतप्रधान झाले तेव्हा धनखड यांना कॅबिनेट मंत्री बनवण्यात आले. तथापि, १९९० मध्येच पंतप्रधान व्हीपी सिंह यांनी देवीलाल यांचे सरकार बरखास्त केले. धनखड देवीलाल यांच्या समर्थनार्थ उभे राहिले. त्यांनी ताबडतोब कॅबिनेट मंत्रीपदाचा राजीनामा दिला.

धनखड छतरपूर येथील फार्म हाऊसमध्ये शिफ्ट झाल्यावर, अभय सिंग चौटाला यांनी माध्यमांशी बोलताना म्हटले होते, धनखड आणि त्यांच्या कुटुंबातील नाते खूप जुने आणि खोल आहे. धनखड या फार्महाऊसमध्ये त्यांना हवे तितके दिवस राहू शकतात. हे त्यांचे घर आहे. तथापि, ते या फार्महाऊसमध्ये किमान ४-५ महिने राहतील.

खरं तर, माजी उपराष्ट्रपतींच्या जवळच्या सूत्रांनुसार, धनखड यांनी सरकारी बंगल्यासाठी अर्ज केला आहे, परंतु तो मिळण्यासाठी त्यांना किमान ४ ते ५ महिने लागतील. धनखड यांच्या पदानुसार, त्यांना टाइप-८ बंगला मिळेल. देवीलाल यांचे नातू अजय चौटाला यांनी आतापर्यंत धनखड यांना फार्म हाऊसवर भेट घेतली आहे. आयएनएलडीच्या सूत्रांनी सांगितले की, 'अजय चौटाला आणि धनखड यांचे चांगले जमते. ते ६ सप्टेंबरच्या संध्याकाळी धनखड यांना भेटायला गेले होते.'

**धनखड आता जाट राजकारण करतील का?**

चौटाला कुटुंब हरियाणात वर्षानुवर्षे सत्तेपासून दूर असेल, पण ते अजूनही जाट राजकारणात आघाडीवर आहेत. धनखड हे देखील जाट आहेत. अशा परिस्थितीत, प्रश्न असा निर्माण होतो की धनखड आता चौटाला कुटुंबासोबत जाट राजकारण करतील का?

सूत्रांनी सांगितले की, 'धनखड आणि चौटाला कुटुंब नेहमीच जवळचे होते, परंतु धनखड यांची धारा वेगळी झाली होती. आता धनखड यांनी फार्महाऊसमध्ये राहण्याचा निर्णय घेतल्याने, धारा देखील भेटू शकतात. तथापि, धनखड किंवा चौटाला कुटुंबाने अद्याप याबद्दल काहीही सांगितलेले नाही.'

आता हे पाहायचे आहे की देवीलाल यांचा वाढदिवस २५ सप्टेंबर रोजी आहे. चौटाला कुटुंब दरवर्षी या निमित्ताने मोठा कार्यक्रम आयोजित करते. धनखड या कार्यक्रमाला उपस्थित राहतील का? त्याआधी अभय सिंह चौटाला रोहतकमध्ये मोठी रॅली काढणार आहेत, या रॅलीत धनखड यांचे नाव घेऊन ते भाजपवर निशाणा साधतील का?

# साक्षरतेचे प्रमाण वाढण्याची गरज

कालचा दिवस म्हणजे ८ सप्टेंबर हा दिवस संपूर्ण जगात जागतिक साक्षरता दिन म्हणून साजरा केला गेला. मानवी समाज सुसंस्कृत बनून समाजाचे शिक्षणाच्या जोरावर मानवी कल्याण होऊन सर्वांना विकासाच्या समान संधी उपलब्ध व्हाव्यात.


ज्ञानी लोकांपासून अज्ञानी लोकांची होणारी पिळवणूक, फसवणूक, शोषण आदीपासून मुक्तता व्हावी. निरक्षर लोकांना साक्षरतेची संधी मिळावी यासाठी राष्ट्रकुलच्या 'युनेस्को' या संघटनेने १९६५ साली जागतिक पातळीवर साक्षरता दिन साजरा करण्याची घोषणा केली व त्याच्या पुढच्या वर्षापासून ८ सप्टेंबरला जगभर ती प्रथा रूढ झाली. आज इतक्या वर्षांनंतरही युनेस्कोने सुरु केलेल्या जागतिक साक्षरता दिनाला जगभर प्रचंड प्रतिसाद मिळत आहे.

युनेस्कोच्या व्याख्येनुसार साक्षरता म्हणजे माणसाला दैनिक जीवनाशी निगडित बाबीविषयी लिहिता वाचता येणे, मानवी जीवनातील घडामोडींचे विश्लेषण करता येणे व वैयक्तिक स्वातंत्र्य अबाधित ठेवून स्वतःच्या व समाजाच्या प्रगतीस हातभार लावणे. शिक्षणाचे महत्व कोणाला नाही? मानवी कल्याणासाठी शिक्षण अतिशय महत्वाचे आहे मात्र केवळ शिक्षण देणे म्हणजेच साक्षरता नव्हे तर मानवी प्रगतीच्या वाट्यात अडथळा बनण्याचा, गरिबीला नष्ट करण्याचा तो एक वैशिष्ट्यपूर्ण आणि शक्तिशाली मार्ग आहे.

जीवनातील आव्हानांना तोंड देण्यासाठी आणि समाज बदलवण्यासाठी साक्षरता एक परिणामकारक साधन आहे म्हणूनच युनेस्कोने जगभर साक्षरता अभियान राबवले. युनेस्कोने सुरु केलेल्या या साक्षरता अभियानाला जगभर चांगला प्रतिसाद मिळाला.

भारतात सुद्धा या अभियानाचे चांगले फलित दिसून आले असून, एका आकडेवारीनुसार १९४७ साली भारत स्वातंत्र्य झाला तेंव्हा भारताचा साक्षरता दर हा १२ टक्के इतकाच होता. १९९१ मध्ये साक्षरतेचे हे प्रमाण ५२ टक्क्यांवर आले तर २०११ मध्ये ते ७५.०६ वर पोहचले. पण आपला देश अजूनही १०० टक्के साक्षर नाही. देशाला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्ष झाली तरी १०० टक्के साक्षरता आपण साध्य करु शकलो नाही.

उत्तरप्रदेश, मध्यप्रदेश, ओडिशा, बिहार या उत्तरेकडील राज्यात अजूनही साक्षरतेचे प्रमाण समाधानकारक नाही त्यामानाने केरळसह दक्षिणेकडील सर्व राज्यात मात्र साक्षरतेचे प्रमाण समाधानकारक आहे. देशातील साक्षरतेचे प्रमाण वाढविण्यासाठी शासकीय पातळीवर विविध उपक्रम राबवले जात आहेत.



**श्याम ठाणेदार**
**दौंड. जिल्हा पुणे.**
**९९२२५४६२९५**

सर्व शिक्षा अभियान, समग्र शिक्षा अभियान, मध्यान भोजन योजना, प्रौढ शिक्षण योजना, राजीव गांधी साक्षरता अभियान, नवभारत साक्षरता अभियान या सारखे उपक्रम राबवून सरकार देशातील साक्षरतेचा टक्का वाढवण्याचा प्रयत्न करत आहे.

या सर्व उपक्रमांना चांगला प्रतिसादही मिळत असल्याने लवकरच आपण १०० टक्के साक्षरतेचे उद्दिष्ट साध्य करू. जागतिक साक्षरता दिनाच्या आपल्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा!

■ ■ ■

# अक्षरओळख नसलेल्यांच्या नावाने विद्यापीठ

जे कधीही प्राथमिक शाळेत सुद्धा गेले नाहीत साधी अक्षरओळख सुद्धा नाही पण ज्यांच्या नावाने विद्यापीठ आहे अशा दोन महान विभूती महाराष्ट्रात होऊन गेल्या त्या म्हणजे गाडगे बाबा आणि बहिणाबाई चौधरी. गाडगे बाबा यांच्या नावाने अमरावती येथे विद्यापीठ आहे तर बहिणाबाई चौधरी यांच्या नावे जळगाव येथे विद्यापीठ आहे आणि कित्येक विद्यालयात आणि महाविद्यालयाच्या पाठयक्रमात बहिणाबाई यांच्या कविता शिकविल्या जातात. त्यांच्या साहित्यावर कित्येकांनी पीएच. डी. मिळविल्या आहेत.



काल बहिणाबाई चौधरी यांची जयंती होती. जळगावजवळील एका खेड्यात त्यांचा जन्म झाला आणि त्या काळच्या परिस्थितीनुसार त्यांचे लग्न लवकरच म्हणजे त्यांच्या वयाच्या १३ व्या वर्षी झाले. त्यांना तीन मुले झाली पण वयाच्या ३० व्या वर्षी त्या विधवा झाल्या. त्यांच्या ३ मुलांपैकी सोपानदेव चौधरी सुप्रसिद्ध कवी आहेत .बहिणाबाई यांनी आयुष्यभर शेतात काम केले आणि काम करताकरता कविता रचल्या. त्यातील फार थोड्या कविता आज उपलब्ध आहेत, त्या सोपानदेवांनी लिहून घेतल्यामुळे.

याबाबत सोपानदेव म्हणाले होते कि आई दिवसभर शेतात जाई आणि शेतात काम करता करता तिला कविता सुचत असत मग संध्याकाळी सर्वांची जेवणे झाली कि सोपानदेवांना त्या कविता सांगत त्या कविता सोपानदेव एका कागदावर लिहून ठेवत आणि तो कागद आईकडे देत. आई तो कागद तिच्या कमरेला एक चंची असे त्यात ती ठेवून देत आणि ती चंची कागदाने भरली कि त्याच्या घरात जे आढे असे (आढे म्हणजे आडवे लाकूड असे ज्यावर छप्पर असते), त्या आढ्यावर खोचून ठेवीत. अशा अनेक चंची तिथे खोचून ठेवल्या होत्या.

मग सोपानदेव एम. ए. झाले आणी मुंबईला नोकरीला लागले. ते सुद्धा कविता करत आणि त्या कविता त्यावेळी आचार्य अत्रे यांच्या" दैनिक मराठा " मध्ये प्रसिद्ध होत. एक दिवस त्यांना मुबईला निरोप मिळाला कि घराच्या व शेतीच्या वाटण्या होणार आहेत तेव्हा तुम्ही गावी या. ते गावाकडे आले. गावचे पंच जमले होते आणि ते घराबाहेर खुर्च्या टाकून बसले होते.

सोपानदेव आले. नंतर त्यांनी वाटणी करायला सुरवात करावी म्हणून त्यांच्या भावाने घरात जे काही असेल ते बाहेर आणायला सुरवात केली म्हणजे भांडी कुंडी वगैरे. त्यात एक चंची होती. तेव्हा सोपानदेव म्हणाले कि तेवढी चंची मला द्या, मला बाकी काही नको. पंचांना वाटले कि त्या चंचीत काही सोने वगैरे आहे काय? पण फक्त कागद निघाले ते सगळे जीर्ण झाले होते.

मग ते ती चंची घेऊन मुंबईला आले आणि त्यांनी एका वहीत त्या कविता लिहून ठेवल्या आणि त्या कविता नेहमी त्यांच्याबरोबर त्यांच्या शबनम पिशवीत असत. नेहमीप्रमाणे ते आचार्य अत्रे यांच्याकडे गेले पण ते "दैनिक मराठा" याचा अग्रलेख लिहीत होते. म्हणून ते परत यायला निघाले. वाटेत त्यांना आठवण झाली कि शबनम अत्रे यांच्या ऑफिस मध्येच राहिली आहे. ती घेण्यासाठी म्हणून परत आले तेव्हा अत्रे त्या कविता वाचत होते आणि सोपानदेव आल्यानंतर त्यांना म्हणाले कि तुम्ही सोने लपवून ठेवले. हा एक मोहरांचा हंडा आहे. मग त्यांनी त्या प्रसिद्ध केल्या. अत्रे यांनी बहिणाबाईंच्या कवितांवर दोन अग्रलेख दैनिक मराठ्यांत लिहिले.

सोपानदेव म्हणतात कि पाऊस आला की त्यांच्या आईला फार आनंद होत असे. त्यात श्रावण महिना आला कि तिला आनंद होत असे. सकाळी जात्यावर दळताना, तसेच धान्य पाखडताना, घरात केरवारे करताना ती स्वरचित कविता म्हणे .

तिला एकदा विचारले कि तुला कविता सुचते कशी? तर तिने सांगितले

*"माझी माय सरस्वती , मला शिकविते बोली!*
*एका बहिणीच्या मनी, किती गुपिते पेरली!!*
*अरे घरोटा घरोटा, तुझ्यातून पडे पिठी!*
*तसे तसे माझे गाणे , पोटातून येते ओठी !!*

बहिणाबाईना माहेरचे खुप प्रेम असे. त्यांचेकडे नेहमी एक योगी येत असे. नेहमी माहेर माहेर करणाऱ्या त्या बहिणाबाईंना पाहून तो योगी त्यांना म्हणाला

*माझे माहेर माहेर, सदा गाणे तुझ्या ओठी!*
*मग माहेरून आले मग सासरी कशापोटी !!*

तेव्हा बहिणाबाई उत्तर देते

*अरे एक हे रे योग्या, ऐक काय मी सांगते!*
*लेकीच्या माहेरासाठी माय सासरी नांदते!!*

यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाने तर बहिणाबाईंची गाणी हा त्यांच्या पाठयक्रम याचा भागच बनवला आहे. माधुरी शानभाग यांनी फ्रॅग्रन्स ऑफ द अर्थ या नावाने बहिणाबाई चौधरी यांच्या कविता इंग्रजीमध्ये भाषांतरित केल्या आहेत. हे भाषांतरही बरेच प्रसिद्ध आहे. त्यातील बऱ्याच कविता या लोकांना माहित आहेत त्यांच्या कवितांच्या ओळीचे वर्णन म्हणीत झाले आहे

*"अरे संसार संसार! जसा तवा चुल्हावर!*
*आधी हाताला चटके तेव्हा मिळते भाकर !*
*"मन वढाळ, वढाळ! उभ्या पिकातलं ढोर!*
*किती हाकला हाकला! फिरून येते पिकावर!*
*"मन मोकाट मोकाट! याच्या ठाई ठाई वाटा!*
*जश्या वाऱ्याने चालल्या! पाण्यावरच्या रे लाटा!*

त्यांच्या कमी प्रसिद्ध असलेल्या (अर्थात माझ्या मते) कविता खलिलप्रमाणे...

*बिना कपाशीने उले त्याला बोड म्हणू नई!*
*हरिनामाविना बोले त्याले तोंड म्हणू नई !*
*नही वाऱ्याने हलले त्याले पान म्हणू नई !*
*नही ऐके हरिनाम त्याले कान म्हणू नई!*
*पाटा विहिरीवाचून त्याले मळा म्हणू नई !*
*नही देवाचे दर्शन त्याले डोळा म्हणू नई!*
*निजविते भुक्यापोटी तिले रात म्हणू नई !*
*आखडता दानासाठी त्याले हात म्हणू नई /*
*नाही वळखला कान्हा तिले गाय म्हणू नई /*
*जिते नही फुटे पान्हा तिले माय म्हणू नई /*
*अरे, वाटच्या दोरीले कधी साप म्हणूं नई !*
*इके पोटच्या पोरीले त्याले बाप म्हणूं नई !*
*इमानाले इसरला त्याले नेक म्हणूं नई !*
*जल्मदात्याले भोवला त्याले लेक म्हणूं नई !*

दुसरी कविता

*धरित्रीच्या कुशीमध्ये बियबियाणी निजली !*
*वर पसरली माती जशी शाल पांघरली !*
*बीज डरारे मातीत सर्व कोंब आले वर!*
*गहिवरले शेत जस अंगावरती शहार !*
*ऊनवाऱ्याशी खेळता एका एका कोंबातून !*
*प्रगटली दोन पान जशी हात ती जोडून !*
*टाळ्या वाजविती पान दंग देवाच्या भजनी !*
*जशी कार्टी करुणा होऊ दे रे आबादानी !*
*दिसामासा होय वाढ रोप झाली आता मोठी !*
*आला पिकाला बहर झाली शेतामध्ये दाटी !*
*कशी वाऱ्याने डोलती दाणे आले गाडी गाडी !*
*देव अजब गारुडी देव अजब गारुडी !*

काल बहिणाबाई यांची जयंती होती. त्यानिमित्त या कवियत्रीला विनम्र अभिवादन!!

■ ■ ■

# हे जगन्माते! राष्ट्राच्या रक्षणासाठी आम्हाला शक्ती दे

**वाचक लिहितात**

आई भवानी, तुझा नवरात्रीचा उत्सव म्हणजे केवळ नऊ दिवसांचा सण नाही, तर तो तुझ्या पराक्रमाचे, शौर्याचे आणि विजयाचे प्रतीक आहे. घटस्थापनेपासून विजयादशमीपर्यंत, तुझ्या उदो उदो गजराने काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत, आणि बंगालपासून महाराष्ट्रापर्यंत प्रत्येक दिशा दुमदुमून गेले आहे. प्रत्येक भक्ताच्या मनात तुझी भक्ती जागृत झाली आहे आणि तू दुर्बलांना शक्ती व लढवय्यांना प्रेरणा देत आहेस.

आई दुर्गे, तू अधर्माचांनाश करण्यासाठी नऊ दिवस असुरांशी घनघोर युद्ध केलेस आणि महिषासुर व इतर दैत्यांचा वध करून या विश्वाला त्यांच्या क्रूरतेपासून मुक्त केलेस. त्याचप्रमाणे, मोगलांचे असुररूपी साम्राज्य उद्धवस्त करण्यासाठी हिंदूनृपती छत्रपती शिवाजी महाराजांनी महिषासुरमर्दिनी तुळजापूरवासिनी भवानी मातेची भक्तीभावाने उपासना करून हिंदवी स्वराज्याचे तोरण बांधले. तोच पराक्रम आम्हाला पुन्हा एकदा आठवावा लागत आहे. कारण आज पुन्हा एकदा असुरी प्रवृत्तींनी या जगात थैमान घातले आहे. या असुरांविरुद्ध लढण्यासाठी आणि सत्याचा विजय मिळवण्यासाठी तुज्या लेकरांना तुज्यासारख्याच शौर्याची गरज आहे. आम्हाला ती शक्ती दे.

आई महिषासुरमर्दिनी, तुझ्या मुकुटावर ज्या असुरांनी रक्तपात घडवला, त्यांनी धर्म विचारून निष्पाप जीवांचा बळी घेतला. पण तुज्या वीर जवानांनी त्यांच्या घरात घुसूनच त्यांना धडा शिकवला. त्यांनी तुझ्या मुकुटाचे रक्षण केले आणि तुझ्या चरणी त्या असुरांची मुंडमाळ अर्पण केली. आज प्रत्येक भारतीयाला तुझ्या वीर पुत्रांप्रमाणे राष्ट्रासाठी उभे राहण्याची प्रेरणा मिळत आहे.

माता महाकालीके, जेव्हा आमच्या वीर भारतीय सैन्याने दहशतवाद्यांचा खात्मा करून शौर्याची गाथा लिहिली, तेव्हा त्यांच्या त्यागावर प्रश्नचिन्ह निर्माण करण्याची हिंमत काही देशद्रोह्यांनी केली. आजही असे अनेक असुरी जीव समाजात वावरत आहेत. ते त्यांच्या वाईट कृत्यांनी पुन्हा एकदा धर्माला आणि राष्ट्राला आव्हान देत आहेत. आई, त्यांच्या षड्यंत्रांचे जाळे उलथून पाडण्याचे सामर्थ्य आम्हाला दे. आम्हाला खात्री आहे की त्यांचा हिशोब लवकरच लागेल.

माते रणचंडिके, आम्ही जंगलात लपलेल्या माओवादी नक्षलवाद्यांचा नायनाट करण्यात बऱ्याच प्रमाणात यश मिळवले. पण, आता भारत मातेचे अस्तित्व नाकारणाऱ्या अर्बन नक्षलवाद्यांचे एक नवे आव्हान उभे राहिले आहे. हे अर्बन नक्षलवादी राष्ट्रात अराजकता माजवण्याचा प्रयत्न करत आहेत. जातीवाद आणि प्रांतवादासारख्या समस्यांना खतपाणी घालून ते राष्ट्राला कमकुवत करत आहेत.

ज्या मायावी शक्तींना कित्येक दशकांपासून राष्ट्राचा विकास करता आला नाही, त्या आज समाजात जातीचे विष कालवत आहेत. अफजल आणि औरंग्याच्या कबरीवर फुले उधळणाऱ्या राष्ट्रद्रोही जमाती विरुद्ध संघर्ष करण्यासाठी आम्हाला बळ दे.

हे जगन्माते, या विचारांच्या सर्पांचे फडे ठेचून काढण्याची शक्ती दे. त्यांचे हे प्रयत्न निष्फळ करण्याचे सामर्थ्य आम्हाला दे आणि अशा विचारांवर मात करण्याची बुद्धी व विवेक दे.

आई जगदंबे, तुझ्या प्रत्येक भक्ताला तुज्यासारखीच लढण्याची शक्ती दे. हिंदुत्वाचे रक्षण म्हणजे स्वराज्याचे संरक्षण आहे. वाईटाचा नाश करण्याची आणि धर्माचे रक्षण करण्याची प्रेरणा दे. केवळ शत्रूंचा नाशच नाही, तर एक समृद्ध, एकसंध आणि बलशाली राष्ट्र निर्माण करण्याची शक्ती आम्हाला दे.

हे जगन्माते, आम्हाला आशीर्वाद दे!

■ **अमोल तपासे**
**सिताबर्डी, नागपूर.**
**९९६०६७३७८९**

■ ■ ■

# रात्री हळदीचे दूध पिण्याचे फायदेच फायदे



प्रत्येक भारतीय घरात आजी-आजोबा झोपताना मुलांना दूध पिण्यास सांगतल आलेले असतात. आताही अनेकजण हा सल्ला पाळत असतात. परंतू तुम्हाला माहिती आहे का? लोक हळद घालून दूध का प्यायचे? आणि त्यातून शरीरास काय फायदे होतात?

**रोगप्रतिकारक शक्ती वाढवते**

हळदीचा मुख्य यौगिक करक्यूमिन तुमची रोगप्रतिकारक शक्तीला मजबूत करते. आणि त्याबरोबर काळासोबत आपली लवचिकता वाढवते. त्यामुळे तुमचे शरीर रोजच्या छोट्या छोट्या आजारांशी लढण्यास तयार होते. तुम्हाला खोकला, सर्दी, ताप असे मोसमी आजारापासून वाचवते.

**त्वचेसाठी देखील फायदा**

हळद घातलेले दूधाचे एंटीसेप्टीक गुण आणि एंटीऑक्सिडेंट्स पिंपल्स आणि त्वचेच्या इतर समस्यांना दूर करण्यास मदत करते. हे तुमच्या त्वचेसाठी फायदेशीर होते.

**गाढ झोपेसाठीचा शॉर्टकट**

झोपण्यापूर्वी गरम हळदीचे दूध पिल्याने अनेक फायदे होतात. याच्या गरमपणा आणि हल्का मसाला शरीरास सिग्नल देतो की आता आराम करण्याची वेळ आली आहे. रात्री हळदीचे दूध प्यायल्याने मानसिक शांतता मिळते आणि त्यामुळे तुम्हाला चांगली झोप येते.

**सूज कमी करते**

हळदीत एंटी-इंफ्लेमेटरी प्रॉपर्टी असते. त्यामुळे शरीरातील सूज कमी करण्यासाठी मदत होते. आणि सांधे दुखी सारख्या आजार देखील हे फायदेशीर असते.

**मेंदूसाठी चांगले..**

गरम हळदीचे दूध मेंदूसाठी देखील फायदेमंद असते. कारण हळदीच्या दूधाने तुमची एकाग्रता वाढू शकते. आणि मूड चांगला राखण्यास मदत होऊ शकते.

**अनेक आजारांना रोखते**


खूप काळापर्यंत राहणारी सूज कॅन्सर, मेटाबोलिक सिंड्रोम, अल्झायमर आणि हृदय रोग सारख्या क्रॉनिक डिसीसना वाढवतात. त्यामुळे म्हणून, दाहक-विरोधी संयुगे समृद्ध आहार या आजारांचा धोका कमी करू शकतो.

आले, दालचिनी आणि करक्युमिन (हळदीतील सक्रीय तत्वे) वर केलेल्या संशोधनात कळले की या तिन्हीत शक्तीशाली सूजविरोधी गुण असतात. त्यामुळे रात्री हळदीचे दूध अवश्य प्या.

■ ■ ■

## अशोकायन

**प्रा. अशोक सारडा मेहकर**
**(९४२१३९४३३९)**



## महिमा गुरूंचा..!

**लहान मुले आम्ही अजाण**
**क्षीर-निराची नाही जाण**
**देऊन आम्हा ज्ञान**
**गुरूवर्या बनवा वीर महान!**

**गुरूवर्या, तुमचे कार्य महान**
**महती गाती वेद पुराण**
**वर्णाया शब्द पडती सान**
**करितो आम्ही प्रणाम!**

**भौतिक सुखाने सीमा गाठली**
**परी अंतरीची शांती ढळली**
**करण्या दानवी वृत्तीचा संहार**
**रूजविता मानवतेचे संस्कार!**

# स्मार्ट, आकर्षक आणि सर्वांसाठी सुलभ सिट्रोन बॅसाल्ट एक्स सोबत सीएआरए



**मुंबई, ८ सप्टेंबर :** सिट्रोन इंडिया ने आपली आक्रमक सिट्रोन २.० शिफ्ट इनटू द न्यू रणनीती सुरू ठेवत, सीएआरए, भारतातील पहिला बुद्धिमान इन-कार साथीदार असलेल्या सर्व-नवीन इंटिरिअर्ससह बसाल्ट एक्स रेंजच्या पदार्पणाची घोषणा केली. एकत्रितपणे, बसाल्ट एक्स आणि सीएआरए अधिक कनेक्टेड, अधिक मानवी आणि अधिक महत्वाकांक्षी असलेल्या गतिशीलतेची स्टेलांटिसची दृष्टी प्रदर्शित करतात भारतीय ग्राहकांसाठी भारतात अभिमानाने अभियंता आणि जागतिक बाजारपेठांसाठी सज्ज आहे.

सीएआरएला प्रथम भारतात आणून, स्टेलांटीस ऑटोमोटिव्ह इनोव्हेशनसाठी जागतिक तंत्रज्ञान केंद्र म्हणून देशाच्या वाढत्या भूमिकेवर भर देत आहे. भारत केवळ स्टेलांटिसच्या सॉफ्टवेअर रोडमॅपमध्ये योगदान देत नाही तर सीएआरए सारख्या नवकल्पनांसह देखील आघाडीवर आहे, जे स्थानिक पातळीवर डिझाइन केलेले आहेत आणि जागतिक स्तरावर तैनात आहेत.

अनावरणाबद्दल बोलताना, स्टेलांटिस इंडियाचे सीईओ आणि एमडी शैलेश हजेला म्हणाले, भारत स्टेलांटिसच्या जागतिक दृष्टीच्या केंद्रस्थानी आहे, आणि आजचे लॉन्च हे सिट्रोन इंडिया २.० शिफ्ट इन टू द देशात एक निर्णायक क्षण आहे. बसाल्ट एक्स सोबत, आम्हाला भारतातील CA-RAint, CA-RAIN ची पहिली ओळख करून देण्यात अभिमान वाटतो. सहचर-संकल्पित, अभियांत्रिकी आणि भारतात लॉन्च केले गेलेले एक धाडसी पाऊल आहे, ज्याने आमचा पोर्टफोलिओ अनन्य आणि आरामशीरपणे मजबूत केला आहे.

कुमार प्रियेश, बिझनेस हेड आणि डायरेक्टर - ऑटोमोटिव्ह ब्रँड्स, स्टेलांटिस इंडिया, पुढे म्हणाले, बेसाल्ट एक्स रेंजचे पदार्पण आमच्या सिट्रोन २.० शिफ्ट टू नवीन स्ट्रॅटेजीमध्ये एक ठळक झेप दाखवते. येथेच स्मार्ट टेक्नॉलॉजी सिट्रोएन कम्फर्टची पूर्तता करते, जी आम्ही विकसित होत असलेल्या भारतीय ग्राहकांसाठी आणि बासॅल्ट एक्स पूर्व ग्राहकांसाठी तयार केली आहे. अत्याधुनिक वैशिष्ट्ये जी आमच्या वेगाने वाढणाऱ्या नेटवर्कच्या पाठिंब्याने, सिट्रोनसाठी एक शक्तिशाली नवीन दिशा दर्शवितात आणि प्रत्येकासाठी आमच्या ब्रँडच्या मूल्यांनुसार आम्ही आकांक्षा प्रवेशयोग्य बनवत आहोत. आम्ही ७.९५ लाख किंमतीपासून सुरू होणाऱ्या बसाल्ट रेंजसह आकांक्षा सुलभ करत आहोत.

# अर्बन कंपनी लिमिटेडची १९०० कोटी रु. ची प्राथमिक समभाग विक्री १० सप्टेंबर २०२५ पासून सुरू




**मुंबई, ८ सप्टेंबर :** अर्बन कंपनी लिमिटेड (कंपनी) आपल्या इक्विटी शेअर्सच्या प्राथमिक समभाग विक्री संदर्भात बोली/ऑफर बुधवार १० सप्टेंबर २०२५ रोजी खुली करणार आहे.

एकूण ऑफर साईज मध्ये १९,००० दशलक्ष रु. १९०० कोटी रु. किंमतीच्या इक्विटी शेअर्सचा समावेश आहे. त्यामध्ये विक्री समभागधारकांकडून ४,७२० दशलक्ष रु. ४७२ कोटी रु. पर्यंतचे फ्रेश इश्यू आणि १४,२८० दशलक्ष रु. १,४२८ कोटी रु. मूल्याच्या ऑफर फॉर सेलचा समावेश आहे. (एकूण ऑफर साईज)

प्रमुख गुंतवणूकदाराच्या बोलीचा दिनांक मंगळवार, ९ सप्टेंबर २०२५ असेल. बिड / ऑफर बुधवार, १० सप्टेंबर २०२५ रोजी खुली होऊन शुक्रवार, १२ सप्टेंबर २०२५ रोजी बंद होईल.

ऑफरचा किंमतपट्टा प्रति इक्विटी शेअरसाठी ९८ रुपये ते १०३ रुपये निश्चित करण्यात आला आहे. बोली किमान १४५ इक्विटी शेअर्ससाठी आणि त्यानंतर १४५ इक्विटी शेअर्सच्या पटीत लावता येईल.

कर्मचारी राखीव भागात बोली लावणाऱ्या पात्र कर्मचाऱ्यांना प्रति इक्विटी शेअर ९ रु. इतकी सूट दिली जाईल.

कंपनी इक्विटी शेअर्सच्या फ्रेश इश्यूमधून मिळणारा निव्वळ निधीचा उपयोग पुढीलप्रमाणे केला जाईल: (१) नवीन तंत्रज्ञान विकास आणि क्लाउड इन्फ्रास्ट्रक्चर यासाठी खर्च, अंदाजित रक्कम १,९००.०० दशलक्ष रु. १९० कोटी रु., (२) कार्यालयांच्या भाडेपट्टीसाठी देयके, अंदाजित रक्कम ७५०.०० दशलक्ष रु. ७५ कोटी रु., (३) विपणन उपक्रमांसाठी खर्च, अंदाजित रक्कम ९००.०० दशलक्ष रु. ९० कोटी रु. आणि (४) सर्वसाधारण कॉर्पोरेट उद्दिष्टांसाठी. (ऑफरचा उद्देश)

कोटक महिंद्रा कॅपिटल कंपनी लिमिटेड, मॉर्गन स्टॅनली इंडिया कंपनी प्रायव्हेट लिमिटेड, गोल्डमन सॅक्स (इंडिया) सिक्युरिटीज प्रायव्हेट लिमिटेड आणि जेएम फायनान्शियल लिमिटेड हे या इश्यूचे बुक रनिंग लीड मॅनेजर्स आहेत.

हे इक्विटी शेअर्स कंपनीच्या दिनांक २ सप्टेंबर २०२५ रोजीच्या रेड हेरिंग प्रॉस्पेक्टस द्वारे सादर करण्यात येत असून रजिस्ट्रार ऑफ कंपनीज, दिल्ली आणि हरयाणा यांच्याकडे दाखल करण्यात आले आहेत. हे शेअर्स बीएसई लिमिटेड आणि नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेड वर सूचीबद्ध करण्याचे प्रस्तावित आहे.

# किरकोळ विक्रेत्यांचे सक्षमीकरण करण्यात आले

## ग्राहकांना उत्साहपूर्ण आनंद देण्याचा व उत्सव एकत्र साजरा करण्यासाठीचा अनोखा उपक्रम



**मुंबई, ८ सप्टेंबर :** जल्लोषात सण साजरा केला जात असताना महाराष्ट्रातील सण, बाजारपेठा आणि आसपासचा परिसर एकतेचे रंग व उत्साहाने भरून गेला आहे. या सण साजरीकरणादरम्यान कोका-कोला इंडिया व्यक्ती व समुदायांना प्रशंसित करत आहे, जे या क्षणांना खास बनवतात, समारोहांमध्ये उत्साह आणतात आणि आनंदाची भर करतात, जो या उत्साहपूर्ण सीझनदरम्यान प्रत्येक गल्ली व मोहल्लामध्ये पाहायला मिळतो. आपल्या लोकली युअर्स' मोहिमेशी संलग्न राहत कंपनी समारोहांमध्ये उत्साहाची भर करत आहे, तसेच समुदाय जीवनाला उत्साहित करणाऱ्या स्थानिक उद्योगांना देखील प्रकाशझोतात आणत आहे. विविध टचपॉइण्ट्सवर सोईस्करपणे पेये उपलब्ध करून देत कोका-कोला इंडिया सणासुदीच्या काळाला संस्करणीय करण्यामध्ये विनम्र भूमिका बजावत आहे, तसेच आसपासच्या परिसराला समान आनंद व आपलेपणाची भावना जागृत करणाऱ्या वातावरणामध्ये बदलत आहे.

जीवनात उत्साहाची भर करणारे कूलिंग पॉइण्ट्स विविध ठिकाणी स्थापित करण्यात आले आहेत आणि स्थानिक स्टोअर्स उत्सवी मागणीची पूर्तता करण्यासाठी कार्यरत आहेत. बॉटलिंग सहयोगी हिंदुस्तान कोका-कोला बेव्हरेजेस, रेसिडण्ट वेल्फेअर असोसिएशन्स (आरडब्ल्यूए) आणि किराणा स्टोअर्स यांच्यासोबत सहयोगाने कोका-कोला ग्राहकांसाठी पेय उपलब्ध असण्याची खात्री घेते, ज्यामुळे कुटुंब व मित्रांसोबत धमाल साजरीकरणाचा आनंद घेता येतो.

कोका-कोला इंडिया व साऊथवेस्ट एशियाच्या विकसित होत असलेल्या बाजारपेठांमधील फ्रँचायझी ऑपरेशन्सचे उपाध्यक्ष करण अचपाल म्हणाले, सणासुदीच्या काळात व्यक्ती व समुदाय एकत्र येतात आणि आम्हाला या खास क्षणांचा भाग असण्याचा आनंद होत आहे. आम्ही प्रत्येक साजरीकरणामध्ये पेये उपलब्ध असण्यासोबत थंड व सर्व्ह करण्यास सुसज्ज असण्याची खात्री घेण्यावर लक्ष केंद्रित करत आहोत, तसेच एकूण परिसंस्थेचे महत्त्वपूर्ण भाग असलेल्या हजारो किरकोळ विक्रेते व वितरकांसाठी आर्थिक गती साध्य करत आहोत. प्रबळ पुरवठा साखळी तयार करत आणि सहयोगींना पाठिंबा देत आमचा ग्राहकांना आनंद देण्याचा आणि समुदाय विकास करण्याचा प्रयत्न आहे.''

हिंदुस्तान कोका-कोला बेव्हरेजेस प्रा. लि.चे चीफ कमर्शियल ऑफिसर विनय नायर म्हणाले, आम्ही किराणा सहयोगी आणि वितरण चॅनेल्ससोबत सहयोग करण्याचा प्रयत्न करत आहोत, ज्यामधून खात्री घेत आहोत की आमच्या ग्राहकांना सहजपणे कोका-कोका पेय उपलब्ध होईल. हा दृष्टिकोन ग्राहकांच्या सोयीसुविधेमध्ये वाढ करतो, तसेच किरकोळ विक्रेत्यांना साधने व पायाभूत सुविधेसह सक्षम देखील करतो, जे सणादरम्यान अधिकाधिक व्यक्तींना अधिक प्रभावीपणे सर्व्ह करण्यासाठी आवश्यक असतात.''

## सेटवर असताना घरी असल्यासारखेच वाटते : ऋषी सक्सेना



**मुंबई, ८ सप्टेंबर :** जीवनातील नातेसंबंध, कौटुंबिक भावबंध आणि अस्सल व संबद्ध वाटणारे प्रसंग यामुळे सोनी सबवरील इत्ती सी खुशी मालिका लोकप्रिय होत आहे.

अलीकडच्या भागांमध्ये आपल्या पाच धाकट्या भावंडांचा जबाबदरीने सांभाळ करणारी २१ वर्षीय तरुणी अन्विता (सुंबुल तौकीर खान) आणि तिचा मित्र विराट (रजत वर्मा) यांच्यात फुलत असलेल्या नात्याचे सुंदर चित्रण बघायला मिळाले. प्रेक्षकांना त्यांच्यातील केमिस्ट्री उलगडताना बघायला आवडते आहे. दरम्यान, अन्विताचा बालपणीचा मित्र संजय (ऋषी सक्सेना) आता पोलिसात काम करत आहे आणि तो पहिल्यापासून अन्विताचा मोठा आधार आहे. अन्विता आणि ऋषीच्या नात्यात एक मोकळेपणा आणि जुन्या आठवणींची किनार आहे, तर अन्विता आणि विराटच्या नात्यात रोमान्स फुलला आहे.

ऋषीने नमूद केले की या मालिकेत अन्विताच्या वडिलांची, सुहासची भूमिका करणाऱ्या वरुण बडोला या जेष्ठ कलाकाराला काही वर्षांपूर्वी ऋषीसोबत काम केल्याचे चटकन आठवले. ऋषी म्हणतो, त्यांना ओळख पटल्यामुळे वातावरण एकदम मोकळे आणि खास झाले. सगळ्यांचे प्रेम आणि आधार असल्यामुळे सेटवर काम करताना खरोखर आपल्या घरी असल्यासारखेच वाटत आहे.

## खूप मोठ्या कालावधीनंतर इतकी प्रामाणिक गोष्ट आली आहे टीव्हीच्या पडद्यावर : सोनाली बेंद्रे



**मुंबई, ८ सप्टेंबर :** आपल्या स्वभावातील गोडवा आणि आपल्या दैनंदिन भावनांशी संबंधित कथानकांची आवड असणाऱ्या सोनाली बेंद्रेला सोनी सबवरील इत्ती सी खुशी मालिकेने भुरळ घातली आहे. या मालिकेचे कथानक साधे पण हृदयस्पर्शी आहे. सोनाली बेंद्रेला आवडते तसे आपल्या जीवनाशी संबद्ध कथानक सादर करणारी ही मालिका आहे.

इन्स्टाग्रामवर सोनालीने लिहिले आहे की, एरवी ती काही पुस्तके वाचण्याची शिफारस करत असते. पण यावेळी, तिने सोनी सबवरील इत्ती सी खुशी ही मालिका बघण्याची प्रेक्षकांना शिफारस केली आहे. तिच्या मते भारतीय टेलिव्हिजनवरील ही मालिका साधी, प्रामाणिक आणि हृदयस्पर्शी आहे. तिने नमूद केले आहे की, कित्येक दिवसांनी तिला टीव्हीवर अशी कहाणी सापडली आहे, जी ताज्या हवेची झुळूक वाटावी अशी आहे, जी तिला मनापासून आवडली आहे. सोनाली म्हणते, या मालिकेत भावना आणि हलके-फुलके क्षण यांचे सुंदर मिश्रण आहे, त्यामुळे मला ती खूप आवडली आहे.

# ग्रामीण महाराष्ट्रातील अंबुजा सिमेंट्सची स्तन कर्करोग जागरूकता मोहीम ; किशोरवयीन मुलांची अनावश्यक शस्त्रक्रिया टळली

**नागपूर, ८ सप्टेंबर :** अदानी पोर्टफोलिओच्या सिमेंट आणि बांधकाम साहित्य कंपनी अंबुजा सिमेंट्सने त्यांच्या सीएसआर शाखेद्वारे असोसिएशन ऑफ ब्रेस्ट सर्जरी, यूके (एबीएस), असोसिएशन ऑफ ब्रेस्ट सर्जन इन इंडिया (एबीएसआय) आणि टाटा कॅन्सर केअर प्रोग्राम यांच्या सहकार्याने एक अनोखा उपक्रम राबवला. चंद्रपूर जिल्ह्यातील देहेगाव गोवारीजवळील राजुरा, कोरपना आणि जिवती ब्लॉकमधील ५२ गावांमध्ये २०२३ मध्ये मोठ्या प्रमाणात स्तन कर्करोग जागरूकता आणि तपासणी मोहीम राबवली. या उपक्रमाच्या माध्यमातून ते ७,४०० हून अधिक महिलांपर्यंत पोहोचले. आणि जास्त धोका असलेल्या ५२० जणांच्या आजाराचे वेळेवर निदान झाले. यामुळेच वेळेवर तपासणी आणि तज्ज्ञांचा सल्ला घेता आला.

नारंदा गावातील १९ वर्षीय सोनाली भोसले हिच्यासाठी हा उपक्रम आयुष्य बदलवून टाकणारा ठरला. स्तनातील गाठीचे चुकीचे निदान झाले आणि स्थानिक डॉक्टरांनी शस्त्रक्रिया करून ती काढून टाकण्याचा सल्ला दिला. तिचे कुटुंब ३०,००० रुपयांची तयारी करत असले तरी हा खर्च त्यांच्या आवाक्याबाहेरचा होता. मात्र, अंबुजा सिमेंट्सच्या पुढाकाराने राबवण्यात आलेल्या या उपक्रमात सोनालीची पुन्हा तपासणी करण्यात आली. त्यात तिला फायब्रोडेनोमा असल्याचे आढळले आणि तिला शस्त्रक्रियेऐवजी उपचार तसेच योग्य ती काळजी घेण्यास सांगण्यात आले. यामुळे पैसे आणि काळजी दोन्हीमध्ये दिलासा मिळाला.

या उपक्रमाद्वारे, अंबुजा सिमेंट्स केवळ पायाभूत सुविधा निर्माण करत नाही तर ग्रामीण आरोग्य यंत्रणा देखील बळकट करते आहे. वेळेवर निदान आणि वैद्यकीय तज्ज्ञांच्या उपलब्धतेतील तफावत भरून काढत, कंपनी चुकीचे निदान टाळणे, रुग्णाचा जीव वाचवण्यावर भर देते तसेच वंचित समुदायांवरील आर्थिक भार कमी करण्यास मदत करते. ग्रामीण भारतातील सामाजिक तसेच सार्वजनिक आरोग्य गरजेशी हे सुसंगत आहे.

# एआयपीएमएतर्फे इंटरनॅशनल कॉन्फरन्स ऑन बूस्ट इंडियाज एक्सपोर्ट ऑफ प्लॅस्टिक फिनिश्ड प्रॉडक्ट अ ग्लोबल सोर्सिंग हब २४ सप्टेंबर रोजी मुंबई येथे




**मुंबई, ८ सप्टेंबर :** जागतिक प्लास्टिक व्यापारात भारत निर्णायक उडी घेण्यासाठी सज्ज आहे. मेक इन इंडिया, मेक फॉर द वर्ल्ड या ध्येयदृष्टीखाली, ऑल इंडिया प्लास्टिक्स मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन (एआयपीएमए) ने पुढील तीन वर्षांत भारतातील प्लास्टिक फिनिश्ड प्रॉडक्ट्सच्या निर्यातीला चौपट वाढवण्याची महत्त्वाकांक्षी रणनीती जाहीर केली आहे. तसेच २४ सप्टेंबर २०२५ रोजी मुंबईत होणाऱ्या आंतरराष्ट्रीय परिषदेची घोषणाही करण्यात आली.

एआयपीएमए च्या गव्हर्निंग कौन्सिलचे चेअरमन अरविंद मेहता म्हणाले, हा फक्त व्यापार विस्तार नसून, भारताला जागतिक प्लास्टिक हब बनवण्याचा राष्ट्रीय मिशन आहे. मेहता यांनी सांगितले की, जागतिक प्लास्टिक फिनिश्ड वस्तूंचा व्यापार सुमारे १,३०० अब्ज डॉलर्स इतका आहे, परंतु भारताचा हिस्सा केवळ १२.५ अब्ज डॉलर्स म्हणजेच एकूण ०.९६% इतका आहे. उदाहरणार्थ, अमेरिकेत एकट्याने ७२.३५ अब्ज डॉलर्स किमतीची प्लास्टिक उत्पादने आयात केली जातात, परंतु त्यात भारताचा वाटा फक्त १.२% आहे. योग्य धोरणांमुळे २-३ नवीन पॉलिमर प्लांट्स, प्लास्टिक मशिनरी व सहयोगी युनिट्समध्ये १००% वाढ, एमएसएमई-आधारित उत्पादनात मोठी भर पडू शकते. रोजगार व कौशल्यविकासात भर पडेल. चीनच्या केन्टन फेअरच्या उदाहरणावरून योग्य शासकीय धोरणे निर्यात कशी बदलू शकतात हे स्पष्ट होते.

भारतातील प्लास्टिक उद्योग प्रामुख्याने एमएसएमई-आधारित आहे. देशभरात ५०,००० हून अधिक युनिट्स कार्यरत असून या क्षेत्रात सुमारे ४.६ दशलक्ष लोक थेट व अप्रत्यक्षरित्या रोजगार करतात. निर्यात लक्ष्य साध्य झाले तर रोजगार संधी ६ दशलक्षांवर पोहोचू शकतात.

एआयपीएमए चे अध्यक्ष मनोज आर. शाह यांनी म्हटले, ही फक्त व्यापाराची गोष्ट नाही; तर लाखो एमएसएमई ना सक्षम करणे, देशभरात रोजगार निर्माण करणे आणि भारताला प्लास्टिक फिनिश्ड प्रॉडक्ट्सचे जागतिक केंद्र बनवणे हे आमचे ध्येय आहे.

त्यांनी पुढे सांगितले की, एआयपीएमएच्या सेल निर्यातने २१ देश व ९ एचएसएन कोड्सचा सखोल अभ्यास केला आहे. यात भारताचा प्लास्टिक फिनिश्ड प्रॉडक्ट्स निर्यात हिस्सा १.२% आहे, तर चीनचा २२% व व्हिएतनामचा ४% आहे. अभ्यासात युएसए, चीन, जर्मनी, मेक्सिको, फ्रान्स, इटली, यूके, कॅनडा, पोलंड, नेदरलँड्स, तुर्की, जपान, स्पेन, बेल्जियम, युएई, ब्राझिल, चिली, इथिओपिया, घाना, केनिया व नायजेरिया या देशांचा समावेश आहे.

# सॅमसंगकडून आधुनिक काळातील भारतीय कुटुंबांना स्मार्ट, नवीन बीस्पोक एआय वॉशर ड्रायर श्रेणी लाँच



**मुंबई, ८ सप्टेंबर :** सॅमसंग या भारतातील सर्वात मोठ्या ग्राहक इलेक्ट्रॉनिक्स ब्रँडने आज नवीन बीस्पोक एआय वॉशर ड्रायर (१२ किग्रॅ वॉश / ७ किग्रॅ ड्राय)च्या लाँचची घोषणा केली, जो आधुनिक काळातील भारतीय कुटुंबांसाठी डिझाइन करण्यात आला आहे. सॅमसंगचा नवीन १२ किग्रॅ वॉशर ड्रायर कॉम्बो नो लोड ट्रान्सफर, ऑल-वेदर लॉण्ड्री आणि एकाच एकीकृत युनिटमध्ये इंटेलिजण्ट फॅब्रिक केअर देतो, ज्यामुळे हा मोठ्या कुटुंबांसाठी व शहरी घरांसाठी डिझाइन करण्यात आलेला जागेची बचत करणारा अप्लायन्स आहे.

सॅमसंग इंडियाने नुकतेच केलेल्या ग्राहक संशोधनानुसार वॉशर ड्रायर्ससाठी मागणी वाढत आहे, जेथे कुटुंबं सर्व ऋतूंमध्ये कपड्यांचे धूळ व जंतूंपासून संरक्षण करण्याचा प्रयत्न आणि एअर-ड्राइंगच्या प्रयत्नाची बचत करण्याचा प्रयत्न करत आहेत. या परिवर्तनामधून विशेषत: जास्त कपडे धुण्याचे व्यवस्थापन करावे लागणाऱ्या आणि कपडे सुकवण्यासाठी मर्यादित जागा असलेल्या कुटुंबांमध्ये कार्यक्षमता व सोयीसुविधेचे संयोजन असलेल्या अप्लायन्सेससाठी मागणी वाढत असल्याचे दिसून येते. सॅमसंगची बीस्पोक एआय वॉशर ड्रायर्सची श्रेणी या बदलत्या प्राधान्यक्रमांची पूर्तता करण्यासाठी डिझाइन करण्यात आली आहे, जी वर्षभर कपड्यांचा भार हस्तांतरित न करण्याची आणि सोईस्कर कपडे धुण्याची व सुकवण्याची सुविधा देते. ही श्रेणी प्रत्यक्ष ग्राहकांना फायदा देणाऱ्या मूल्यांद्वारे संचालित आहे: ईजी, सेव्ह आणि केअर.

सॅमसंगच्या नवीन एकीकृत वॉशर ड्रायर कॉम्बोमधील वॉशर व ड्रायरदरम्यान 'नो-लोड ट्रान्सफर' आहे, ज्यामुळे ग्राहकांना अप्लायन्समधून कपडे प्रत्यक्ष क्लोदिंग लाइनमध्ये टाकता येतात.

''आमची नवीन बीस्पोक एआय वॉशर ड्रायर श्रेणी आधुनिक जीवनशैलीला समजून घेते, सोयीसुविधा देते आणि दररोज कपडे धुण्याच्या क्रियेला स्मार्ट व अधिक कार्यक्षम करते. सर्वोत्तम वैशिष्ट्ये हवामान बदलामधील अनिश्चितता वाढत असताना आणि ग्राहकांना उच्च प्रदूषण व धूळीसह संघर्ष करावा लागत असताना आधुनिक काळातील राहणीमानासाठी परिपूर्ण सोल्यूशन देतात. सॅमसंगचे बीस्पोक एआय तंत्रज्ञान कपड्याचा प्रकार व भारानुसार वॉश चक्र सानुकूल करण्यासोबत वीज व पाण्याची बचत करण्यास देखील मदत करते, तसेच स्वच्छतेची खात्री देते. आमची नवीन श्रेणी कपड्यांच्या जास्त भाराची हाताळणी करण्यासाठी उच्च क्षमतेसह डिझाइन करण्यात आली आहे, तसेच या श्रेणीमध्ये असलेली वैशिष्ट्ये वेळेची बचत करतात, कपड्यांचे संरक्षण करतात आणि स्वच्छता राखतात. यामधून 'ईजी, सेव्ह व केअर' ही मुलभूत मूल्ये दिसून येतात. मला विश्वास आहे की आमचे नवीन सोईस्कर, इंटेलिजण्ट व कनेक्टेड अप्लायन्सेस भारतातील कुटुंबांच्या कपडे धुण्याच्या पद्धतीमध्ये बदल घडवून आणतील, ते अधिक सोपे, गतीशील आणि अधिक विश्वसनीय करतील,'' असे सॅमसंग इंडियाच्या डिजिटल अप्लायन्सेस बिझनेसचे उपाध्यक्ष गुफरान आलम म्हणाले.


## आज का अंदाज

मंगळवार ९ सप्टेंबर २०२५
जबरदस्त पास होणारे चान्सेस
पत्थर फोड एकच

**कल्याण बाजार**

3 4 5 7
157 466 177 269
229 248 456 458
300 347 348 368
32 42 51 71
30 40 56 76
38 48 59 79

**मुंबई बाजार**

2 4 7 8
147 699 179 134
390 266 250 260
480 400 340 350
25 45 70 80
23 43 79 89
21 41 76 86

**९ सप्टेंबर २०२५ सर्व बाजारांसाठी**

21 51 83 93
24 54 86 96
27 57 80 90

सर्व बाजारांसाठी सिंगल अंक ओपन टू क्लोज
0 8 9 7 6

कल्याण, मुंबई आणि सर्व बाजारासाठी 60 पानांचा चार्ट मिळेल. 100 टक्के खात्रीशीर.
प्रो. बालाजी कुमार
9822486034


# टोयोटा किर्लोस्कर मोटरकडून वेईकल्सच्या किमतीमधील कपातीची घोषणा ; कमी करण्यात आलेल्या जीएसटी दराचे संपूर्ण फायदे देणार

**अमरावती, ८ सप्टेंबर :** ग्राहक-केंद्रित लाभ आणि प्रत्येक टचपॉइण्टवर उत्साहवर्धक अनुभव देण्याप्रती आपल्या अविरत कटिबद्धतेशी बांधील राहत टोयोटा किर्लोस्कर मोटर (टीकेएम)ने आज घोषणा केली की, कंपनी ग्राहकांना नुकतेच जाहीर करण्यात आलेल्या जीएसटी दरामधील कपातीचे संपूर्ण फायदे देणार आहे. सुधारित किमती सप्टेंबर पासून लागू होतील.

ही घोषणा करत सेल्स-सर्विस-युज्ड कार बिझनेस अँड प्रॉफिट एन्हान्समेंटचे उपाध्यक्ष वरिंदर बाधवा म्हणाले, ''आम्ही या महत्त्वपूर्ण सुधारणेसाठी भारत सरकारचे मनापासून आभार व्यक्त करतो. यामुळे ग्राहकांसाठी किफायतशीरपणामध्ये वाढ झाली असून ऑटो क्षेत्रात एकूणच आत्मविश्वास देखील वाढला आहे. सणासुदीच्या काळापूर्वी आम्हाला अपेक्षा आहे की हा पुढाकार उत्तम गतीसोबत मागणीला देखील आणखी चालना देईल. पारदर्शक व ग्राहक-केंद्रित कंपनी म्हणून आम्हाला ग्राहकांना हे फायदे देण्याचा आनंद होत आहे. आम्ही जागतिक दर्जाचे गतीशीलता सोल्यूशन्स अधिक सहजसाध्य करण्याप्रती कटिबद्ध आहोत आणि अशा सुधारणांचे स्वागत करतो, जे मागणीला गती देतील, सर्वांसाठी गतीशीलता उपलब्ध करून देतील आणि ग्राहकांना आनंदित करतील, तसेच भारताच्या शाश्वत व सर्वसमावेशक विकासाप्रती योगदान देखील देतील.''

# राशीभविष्य

**मेष :** आजचा दिवस तुमच्यासाठी फायदेशीर ठरणार आहे. आज तुम्ही तुमच्या व्यवसायात काही बदल करू शकता, ज्यासाठी तुम्हाला लवकरच सकारात्मक प्रतिसाद मिळेल.

**वृषभ :** आज सामाजिक आणि कौटुंबिक जीवनात संतुलन राखणे महत्त्वाचे आहे. तुम्ही तुमच्या बोलण्याने लोकांवर छाप पाडू शकता. प्रवासाचे योग आहेत, जे तुमच्यासाठी फायदेशीर ठरतात.

**मिथुन :** तुम्ही तुमच्या सहकाजयांशी मैत्रीपूर्ण वागलात तर येणाजया काळात त्यांचा तुम्हाला फायदा होईल. जर तुम्ही तुमच्या खर्चावर नियंत्रण ठेवले तर हळूहळू तुमची आर्थिक बाजू मजबूत होईल.

**कर्क :** आज तुम्ही बालपणीच्या मित्राला भेटाल, तुमच्या जुन्या आठवणी ताज्या होतील. आज, व्यवसायात नफा मिळवण्यासोबतच, तुम्ही तुमच्या खर्चाकडेही लक्ष दिले पाहिजे.

**सिंह :** आजचा दिवस ऊर्जा आणि उत्साहाने भरलेला असेल. कामाच्या ठिकाणी तुम्हाला नेतृत्व करण्याची संधी मिळेल. तुमच्या कल्पनांना योग्य दिशा मिळेल. जुना मित्र अचानक भेटेल. ज्यामुळे आनंद होईल.

**कन्या :** आज आरोग्याची काळजी घेणे महत्त्वाचे आहे. कामाच्या ताणामुळे थोडा थकवा जाणवू शकतो. आर्थिक व्यवहार करताना काळजी घ्या. कोणताही मोठा निर्णय घाईत घेऊ नका.

**तूळ :** आज तुम्ही व्यावसायिक संबंध मजबूत करण्यासाठी काही महत्त्वाचे निर्णय घ्याल जेणेकरून तुमचा व्यवसाय चांगला चालेल. गुंतवणुकीच्या बाबतीत आर्थिक सल्लागाराची मदत घेऊ शकता.

**वृश्चिक :** कुटुंबासोबत आनंदी क्षण घालवाल. आर्थिकदृष्ट्या दिवस चांगला आहे, तुम्हाला अपेक्षित लाभ मिळू शकतो. अभ्यासात यश मिळेल. कुटुंबासोबत वेळ घालवल्यास शांतता मिळेल.


**धनु :** आज तुम्हाला तुमच्या व्यवसायात दुप्पट नफा होईल आणि कुटुंबाच्या गरजा पूर्ण करण्यात तुम्ही यशस्वी व्हाल. आज तुम्हाला वडीलधाजयांचे आशीर्वाद मिळतील ज्यामुळे तुमचे काम प्रगती करेल.

**मकर :** आज ऑफिसमध्ये, बॉस तुमच्या कामाची प्रशंसा करतील आणि कनिष्ठ विद्यार्थीही तुमच्याकडून काहीतरी शिकण्याचा प्रयत्न करतील. आज कोणताही निर्णय घेण्यापूर्वी घरातील वडीलधाजयांचा सल्ला घ्या.

**कुंभ :** आज कामात यशस्वी व्हाल. तुमचे प्रयत्न तुम्हाला यश मिळवून देतील. आर्थिकदृष्ट्या आजचा दिवस चांगला आहे. तुमच्या जोडीदारासोबतचे संबंध अधिक दृढ होतील. विद्यार्थ्यांसाठी दिवस शुभ आहे.

**मीन :** तुमच्या योजनांना योग्य दिशा मिळेल, ज्यामुळे त्या त्यांच्या ध्येयाकडे पुढे जातील. आज तुम्हाला काही नवीन लोक भेटतील जे तुमच्या कामात मदत करतील. आज वडीलधाजयांचा भरपूर पाठिंबा मिळेल.

# शब्दकोडे क्रमांक २२१२



**आडवे शब्द :-**

१) जमिनीपासून मिळणारे सरकारचे उत्पन्न
६) संदेश
८) जिंकणारा
१०) संगीतातील एक राग
११) धक्का
१२) प्रजा
१३) मृत्यू
१५) नूतन
१७) धैर्य, हिंमत
१८) ठराविक पैसे
१९) दृढता, सोशिकपणा
२१) रसाळ
२३) पोते शिवण्याची सुई
२५) राबता, जाणेयेणे
२७) पराजय
२८) संगीतातील एक राग
२९) ओढा पण मनाचा
३०) बारदान
३१) मुसलमानांचा उपवासाचा महिना
३२) शपथ
३३) ढग
३६) कुराणातील वचने
३८) चामखीळ
४०) प्रसिद्धी, गप्पांचे आगर
४४) एक तारवाद्य
४६) कर्ज
४७) ताठा, गुर्मी, जोर
४८) ओझी वाहणारा
४९) सुसर
५०) कमीतकमी व जास्तीतजास्त
५३) आश्रय
५६) मोहरी
५७) पाणी वाहण्याची कातडी पिशवी
५८) बडबड
६०) बोटाच्या टोकावरील आवरण
६२) मणका
६३) दूध वा दुधाचे पदार्थ
६४) मडके
६५) पुरुष
६६) फुरसत
६७) लोटी
६८) विशेष
६९) नृत्य
७०) अंगारा, रक्षा
७१) पादत्राण
७२) टेहाळणी करणारा
७४) पृथ्वी
७६) दुर्गंधी येऊ लागलेला
७७) पागोट्याव बांधण्याचे रत्नजडित तुरा
७८) अहंकार

**उभे शब्द :-**

१) जलाशय, समुद्र
२) नेत्र
३) माझे
४) हत्या, खून
५) बारीक सारीक
६) आधार नसलेला
७) घराचा मागचा दरवाजा
८) वापर
९) आग्रा येथील ऐतिहासिक वास्तू
१४) पावसाचे साठवून ठेवलेले पाणी
१६) पराक्रमी
२२) दरवाजा
२४) महाराष्ट्राची देवता
२६) घोड्याची गाडी,
२८) मारणारा
२९) पाऊल
३०) गाईचे घर
३४) चंद्र,
३५) स्नानगृह
३७) हावरटपणा
३९) किरकोळ सामान
४०) कडक
४१) पत्र
४२) मवाळ धोरण
४३) आकाश
४५) खरकट्याचा ढीग
४८) नक्की, खात्रीने
५१) फक्त, केवळ
५२) संगीतातील एक घराणे
५४) हावरट,
५५) अवधान, लक्ष
५७) अनुमती
५९) जंगलात राहणारे प्राणी
६१) अफूचे बीज
६२) किंचित कडू चव
६३) मधुर
६४) गावातील जुनी वस्ती
६७) मोजणी करणारा
६८) मीठाची चव
७०) पोपट
७३) दुनिया
७५) मलई

(उत्तर उद्याच्या अंकात)

## मागील शब्दकोड्याचे उत्तर



# इंग्रज काळापासून २१ गावांमधील समस्या जैसे थे

## विकास समितीने मुख्यमंत्र्यांना प्रत्यक्ष भेटून मांडल्या समस्या

■ महासागर प्रतिनिधी
उमरखेड, दि. ८ :

तालुक्यातील पैनगंगा अभयारण्यात येणाऱ्या बंदी भागातील २१ गावांच्या विविध समस्या संदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची नागपूर येथे प्रत्यक्ष भेट घेवून बंदी भाग विकास समितीच्या शिष्टमंडळाने अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या समस्या मांडल्या. त्यामुळे बंदी भागातील समस्यांचे निराकरण आतातरी होईल, अशा आशा निवेदनकर्त्यांच्या पल्लवित झाल्या आहेत.



बंदी भागातील समस्या सोडवण्यासाठी अहोरात्र झटणारे विकास समितीचे अध्यक्ष बाबुसिंग जाधव मोरचंडी, सामाजिक कार्यकर्ते संतोष गवळे मन्याळी, भगवानसिंग साबळे सोनदाभी यांनी रंजित आडे दराटी यांचे माध्यमातून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेवून उमरखेड तालुक्यामधील बंदी भागातील समस्यांवर चर्चा केली.

उमरखेड तालुक्यामध्ये बंदी भाग हा इंग्रज काळापासून ज्या परिस्थितीमध्ये वसलेला आहे. आजही त्याच परिस्थितीत आहे. बंदी भाग हा विकासापासून दूर फेकल्या गेलेला आहे. या भागातील एकही रस्ता हा पक्का नसून सर्व कच्चे रस्ते आहेत. या समस्यांमुळे बंदी भागातील २१ गावांतील जनतेने सन २०१९ मध्ये लोकसभेच्या निवडणुकीवर बहिष्कार टाकला होता.

तत्कालीन जिल्हाधिकारी अजय गुल्हाणे यांनी मोरचंडी येथे येऊन सहा महिन्यात बंदी भागातील सर्व समस्या निकाली काढू, असे तोंडी आश्वासन दिले होते. ते आश्वासन आजपर्यंत पूर्ण करण्यात आलेले नाही.

बंदी भागातील बिटरगांव-मोरचंडी-दरा टी, चिखली-जेवली, सोनदाभी-गाडी, मन्याळी चिखली, सोनदाभी- परोटी, जेवली-पेंधा हे सर्व रस्ते फारच खराब असून त्यावर चालणे कठीण आहे. याबाबत वारंवार जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी उमरखेड यांना निवेदने दिल्याचे यावेळी मुख्यमंत्री यांच्या लक्षात आणून दिले. इंग्रज काळापासून आजपर्यंत उमरखेड तालुक्यातील बंदी भागातील २१ गावे मूलभूत सुविधांपासून वंचित आहे. आंदोलन, मोर्चे झाली. परंतु, समस्या सुटल्या नाही. या भेटीत मात्र मुख्यमंत्री यांच्या आश्वासनानंतर आशा पल्लवीत झाल्या आहेत.

शासकीय योजनांचा लाभापासून वंचित इंझाली बंदी भागातील जनतेला १५ एकर शेतीचे प्लॉट देऊन बिगारी मार्फत त्यांची कामे करुन घेतली. सदर जमिनी आजपर्यंत भोगवटादार वर्ग-२ च्याच आहेत. त्या आजपर्यंत भोगवटादार वर्ग-१ म्हणून झालेल्या नाहीत. ह्या जमिनी आमच्या वडीलोपार्जीतांना मिळालेल्या असून त्या आजपर्यंत फेरफार किंवा फोडपट्टेसुध्दा झालेले नाहीत. एका ७/१२ मध्ये जवळपास चार ते पाच लोकांचे नावे आहेत. शासकीय योजनेचा त्यांना फायदा होत नाही. त्यामुळे सदर जमिनी भोगवटादार वर्ग-२ पासून वर्ग-१ करुन द्यावा व तसेच फोड पट्टे (फेरफार) करुन द्यावे.

## चांदूर रेल्वे शहरामध्ये घरावर कोसळली वीज

■ महासागर प्रतिनिधी
चांदूर रेल्वे, दि. ८ :

अनंत चतुर्दशीच्या दिवशी शनिवार ६ रोजी रात्री ८.३० ते ९ च्या सुमारास चांदूर रेल्वे शहरात अचानक आलेल्या वादळी पाऊस सुरू झाला. यादरम्यान विजांचा तुफान कडकडाट सुरू राहिला. शहरातील अनेक भागात एकामागोमाग एक विजा कडाडत होत्या. या अचानक बसलेल्या नैसर्गिक तडाख्यामुळे नागरिक भयभीत झाले. विजांचा जोर इतका प्रचंड होता की, शहरातील मंगलमूर्ती नगरातील रामदास कारमोरे यांच्या घरावर वरच्या भागावर थेट वीज कोसळली. तिच्या प्रचंड आवाजाने परिसर हादरला. परंतु, सुदैवाने या कुटुंबात कोणतीही जीवित हानी झाली नाही. जेथे वीज पडली तेथील थोडा भाग तुटून खाली पडला. या विजेमुळे त्यांच्या घरातील काही इलेक्ट्रॉनिक्स साहित्यांचे नुकसान झाले. या घटनेनंतर नागरिकांमध्ये संभ्रम व भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, पुढील काही दिवस ढगाळ वातावरण कायम राहण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे. नुकसानग्रस्त नागरिकांनी मदतीची मागणी केली आहे. उपकरणे झाले निकामी दरम्यान, शहरातील विविध वस्त्यांमध्ये या विजांचा तडाखा बसल्याने अनेक घरांतील विविध इलेक्ट्रॉनिक्स उपकरणे अचानक बंद पडल्याची प्राथमिक माहिती आहे.

# सातासमुद्रापार गणपती बाप्पा मोरयाचा जयघोष

■ महासागर प्रतिनिधी
अकोला, दि. ८ :

महाराष्ट्रात गणेशोत्सवाची मोठी परंपरा लाभली आहे. यावर्षी राज्य महोत्सव म्हणून गणेशोत्सव साजरा करण्यात आला. गणेशोत्सवात भाविक मनोभावे गणरायाची आराधना करतात. महाराष्ट्र व संपूर्ण भारत देशासह आता सातासमुद्रापार देखील गणपती बाप्पा मोरयाचा जयघोष करण्यात येत आहे.



स्कॉटलंड देशातील अबर्डीन शहरात मराठी मंडळ अबर्डीन, नादब्रह्म ढोल समूह आणि अबर्डीन हिंदू मंदिर ट्रस्टच्या संयुक्त विद्यमाने पाच दिवसांचा रंगतदार गणेशोत्सव सोहळा साजरा करण्यात आला. या उत्सवामुळे शहरात उत्साह आणि एकोप्याचे वातावरण निर्माण झाले. हा खरोखरच सर्वांसाठी आनंदाचा उत्सव होता, असे मूळचे अकोलेकर राजेश वानखडे यांनी सांगितले.

अकोल्यातील रेणुका नगर रहिवासी राजेश वानखडे हे स्कॉटलंड देशातील अबर्डीन शहरात स्थायिक झाले आहेत. त्याठिकाणी ते भारतीय संस्कृती व परंपरा जोपासतात. अबर्डीन येथे गणेशोत्सवाची सुरुवात पर्यावरणपूरक मातीच्या गणेशमूर्ती बनविण्याच्या कार्यशाळेने करण्यात आली. यामध्ये येथील भारतीय कुटुंबांसह लहान मुलांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला. त्यानंतर गणरायाची स्थापना करून दररोज मनोभावे पूजा व आरती करण्यात आली. त्यामुळे अबर्डीन शहरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले. गणेशोत्सवानिमित्त सांस्कृतिक कार्यक्रमांची ही मेजवानी लाभली. त्यामध्ये भारतीयांसह स्थानिक कलाकारांनी नृत्य, संगीत आणि विविध कलाप्रकार सादर केले. त्यामुळे रसिक मंत्रमुग्ध झाले होते.

स्कॉटलंडच्या अबर्डीन शहरात ऐतिहासिक पहिलीच भव्य गणपतीची मिरवणूक या गणेशोत्सवात काढण्यात आली. यासाठी खास पुणे येथून ढोल, ताशे व इतर मिरवणूक साहित्य मागविण्यात आले होते. ढोल, ताशा, झांजच्या गजरात तेजस्वी ध्वजांसह शेकडो स्थानिक नागरिकांसह भारतीय सहभागी झाले होते. गणरायाच्या भव्य-दिव्य मिरवणुकीमुळे संपूर्ण परिसर दुमदुमला होता. गणपती अथर्वशीर्ष आवर्तन आणि पारंपरिक विसर्जन सोहळ्यानंतर स्कॉटलंडमधील गणेशोत्सवाचा समारोप झाला. या गणेशोत्सव सोहळ्याला अबर्डीन शहर महापालिका आणि स्कॉटलंड पोलिसांचे विशेष सहकार्याला लाभल्याचे आयोजकांनी सांगितले.

## रेडक्रॉस सोसायटीतर्फे बाराभाई गणपतीचे स्वागत

■ महासागर प्रतिनिधी
अकोला, दि. ८ :

शहरातील गणेश विसर्जन मिरवणुकीत मानाचे स्थान असणाऱ्या प्रथम क्रमांकाच्या बाराभाई गणपतीचे रेडक्रॉस सोसायटीच्या वतीने पारंपारिकरित्या स्वागत करण्यात आले. अनेक वर्षांपासून रेडक्रॉस सोसायटीला प्रथम पूजेचा हा बहुमान सुभाष चौकात दिल्या जातो. यंदा मनपा आयुक्त डॉ. सुनील लहाने यांच्या हस्ते या मानाच्या गणपतीचे पूजन झाले. तर प्रमुख पाहुणे म्हणून गुजरात अंबुजा एक्स्पोर्ट लिमिटेडचे विपणन अध्यक्ष ब्रिजमोहन चितलांगे, रेडक्रॉस सोसायटीचे चेअरमन डॉ. किशोर मालोकार, सोसायटीचे सचिव प्रभजीतसिंह बछेर आदी मान्यवर उपस्थित होते.

# विद्यार्थ्यांच्या भविष्याची पायाभरणी शिक्षक करतात : ॲड. तुषार महाजन

■ महासागर प्रतिनिधी
बुलडाणा, दि. ८ :

"शिक्षक हे केवळ ज्ञान देत नाहीत, तर ते विद्यार्थ्यांमध्ये नैतिक मूल्ये आणि सामाजिक जाणीव निर्माण करतात.

देशाच्या उज्ज्वल भविष्याची पायाभरणी करण्याचे कार्य शिक्षकच करत असतात, असे प्रतिपादन ॲड. तुषार महाजन यांनी केले बुलडाणा एज्युकेशन सोसायटी संचालित शिक्षण संस्थेतील शिक्षकांच्या योगदानाला गौरव देण्यासाठी आणि त्यांना प्रोत्साहित करण्याच्या उद्देशाने कै. शंकर प्रल्हाद देशपांडे आणि



प्रमिला शंकर देशपांडे स्मृती सेवाव्रती अध्यापक आणि अध्यापिका पुरस्कार वितरण समारंभ नुकताचऐडेड हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयात उत्साहात पार पडला. या कार्यक्रमात सामाजिक, आर्थिक, राजकीय तसेच शैक्षणिक क्षेत्रातील प्रा सदानंद माळी यांना त्यांच्या प्रदीर्घ सेवेबद्दल हा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

# स्कॉर्पिओ वाहन अनियंत्रित; दुचाकीस्वार गंभीर

■ महासागर प्रतिनिधी,
तिरोडा, दि. ८ :

भरधाव जाणारे स्कार्पिओ वाहन अनियंत्रित होऊन दुचाकीला धडकल्याने दुचाकीस्वार गंभीर जखमी झाल्याची घटना तिरोडा-बाघोली मार्गावर सी. जे. पटेल महाविद्यालयाच्या प्रवेशद्वारासमोर आज शुक्रवार ५ सप्टेंबर रोजी संध्याकाळी ७ वाजताच्या सुमारास घडली.




बाघोली येथून तिरोडाच्या दिशेने जाणाऱ्या स्कॉर्पिओ वाहन क्रमांक एम एच २३ वाय ०३९८ चे नियंत्रण सुटल्याने दुचाकी क्रमांक एम एच ४९ बीएस २४५६ ला जोरदार धडक बसली. यानंतर स्कॉर्पिओ रस्त्याच्या कडेला खाली उतरली. वाहनात आठ प्रवासी सवार होते. सुदैवाने वाहनातील कुणीही जखमी झाले नाही. मात्र दुचाकी चालक गंभीर जखमी झाला असून त्याची पत्नी किरकोळ जखमी झाली आहे. जखमींना तिरोडा उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. माहितीनुसार, स्कॉर्पिओ बाघोली येथील साखरपुडा कार्यक्रम आटोपून भंडारा जिल्ह्यातील नाकाडोंगरीकडे जात होती. अपघातग्रस्त स्कॉर्पिओ चालकाचे नाव निखिल खोबरागडे (रा. नाकाडोंगरी ता. तुमसर जि. भंडारा) असे असून तिरोडा पोलिसांनी पुढील तपास सुरू केला आहे.

# वाघाच्या हल्ल्यात महिलेचा मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी
चंद्रपूर, दि. ८ :

मूल तालुक्यातील सोमनाथ पर्यटन स्थळाजवळील बाबा आमटे प्रकल्पाच्या वसाहतीत वास्तव्याला असलेल्या अन्नपूर्णा बिलोने या महिलेवर वाघाने हल्ला केला. त्यात महिलेता मृत्यू झाला. ही घटना सोमवारी (८ सप्टेंबर) सकाळी ४.३० वाजताच्या सुमारास घडली. दरम्यान, वाघासोबत लढा देऊनही पत्नीची वाघाच्या जबड्यातून सुटका करण्यात पतीला यश आले नाही.

मिळालेल्या माहितीनुसार, तुळशीराम बिलोने आणि त्यांची पत्नी अन्नपूर्णा बिलोने (५२) हे बाबा आमटे प्रकल्पाच्या वसाहतीत वास्तव्याला आहेत. सोमवारी पहाटे ४.३० वाजता अन्नपूर्णा बिलोने अंगणात भांडी साफ करत असताना अचानक वाघाने तिच्यावर हल्ला केला. पत्नीची आरडा ओरड ऐकून पती तुळशीराम झोपेतून जागा झाला. तोपर्यंत वाघाने पत्नीचा गळा पकडला होता. तुळशीराम घाबरला नाही आणि तिला वाचवण्यासाठी पत्नीचे पाय ओढू लागला. पण, वाघासमोर त्याची ताकद पुरेशी नव्हती. त्याने जवळच पडलेली काठी उचलली आणि वाघावर हल्ला केला. हल्ल्यामुळे वाघ तेथून पळून गेला. मात्र अन्नपूर्णा हिचा घटनास्थळीच मृत्यू झाला.

या घटनेची माहिती मूल पोलिसांना तसेच वन विभागाला देण्यात आली. त्यावेळी पोलिस ठाण्यात कर्तव्यावर असलेले मेजर राष्ट्रपाल काटकर, धनराज नेवारे, वेदनाथ करंबे इत्यादींनी घटनास्थळी पोहोचून पाहणी केली आणि मृतदेह शवविच्छेदनासाठी मूल उपजिल्हा रुग्णालयात पाठवण्यात आला.

वन विभागाचे उच्च अधिकारीही घटनास्थळी पोहोचले आणि मृताच्या पतीला २० हजार रुपयांची तात्काळ मदत केली. उपविभागीय पोलिस अधिकारी सत्यजित आमले यांच्या मार्गदर्शनाखाली आणि पोलिस निरीक्षक विजय राठोड यांच्या नेतृत्वाखाली पुढील तपास सुरू आहे.


## Change Of Name

MY OLD NAME WAS **KAMAL RAMESH MANSARAMANI**. NOW MY NEW NAME IS **KAMAL RAMESH MANSHARAMANI.**
**ADD** : C-1, SHUBHANKAR APTS, HILL TOP RAMNAGAR, NAGPUR 440010

MY OLD PASSPORT NO. **U3622899**. MY OLD NAME WAS **SAHID BASHIR SHEIKH**. NOW MY NEW NAME IS **SAEED BASHIR SHEIKH.**
**ADD** : H.NO.690,HANSAPURI NAGPUR 440018

MY OLD PASSPORT NO. **U3622900**. MY OLD NAME WAS **SALAMABEGAM SAHID SHEIKH**. NOW MY NEW NAME IS **SALAMABEGAM SAEED SHEIKH.**
**ADD** : H.NO.690,HANSAPURI NAGPUR 440018

MY OLD NAME WAS **NISAR AHMEDRAFIQUE AHMED**. NOW MY NEW NAME IS **NISAR AHEMAD RAFIK AHEMAD.**
**ADD** : SUBHASH CHOWK LOHAR LINE PUSAD YAVATMAL 445204

MY OLD NAME WAS **MUSTAFA HUSAIN**. NOW MY NEW NAME IS **MUSTAFA SAJJAD HUSAIN BOMBAYWALA.**
**ADD** : C/3 MOHAMMADI MOHALLA, BINAKI MANGALWARI, NAGPUR 440002

MY OLD NAME WAS **MOHAMMAD SAJID KAMAR**. NOW MY NEW NAME IS **MOHAMMAD SAJID QURESHI.**
**ADD** : P. NO. 174 B DAIMOND NAGAR NAGPUR - 440026

MY PASSPORT NO - **M7512820**. MY OLD NAME WAS **SIDDHI RAJESH DEWANI**. NOW MY NEW NAME IS **DOLLY RAJESH DEWANI.**
**ADD** : HOUSE NO. 23 NARA ROAD BHIM CHOWK JARIPATKA NAGPUR 440014

MY PASSPORT NO - **M9539868**. MY OLD NAME WAS **MIRZA TAUFEEQUE BAIG MIRZA ASIF BAIG**. NOW MY NEW NAME IS **TAUFIQ ASIF MIRZA.**
**ADD** : PLOT NO.330 NEAR THAKRE SCHOOL ASHIRWAD NAGAR NAGPUR 440024

MY OLD NAME WAS **PANKAJ KUMAR SINGH**. NOW MY NEW NAME IS **PANKAJ RAVI SINGH.**
**ADD** : FLAT NO.304 RAJAT SANKUL GANESHPETH NAGPUR 440018
PASSPORT NO. **J1974355**

## PAPER PUBLICATION

**IN THE COURT OF JE CIVIL JUDGE JR. DN. RAMTEK**

Process no. 202114
MJC Case No. 25/2025 — Fixted for: 23/09/2025

**APPLICANTS:** 1) Shri Ganpat S/o Ramkrushna Chawke, aged 52 years, Occ- Agriculture 2) Shri Maroti So Ramkrushna Chawke, aged 49 years, Occ- Private Both R/o Bori, Post Kachurwahi, Tahani Ramtek, Dist. Nagpur. 3) Smt. Sumtra Prabhu Suraskar, aged 65 years, Occ- Household R/o Garra Bagheda, Tahani Tumsar, Dist. Nagpur. 4) Smt. Jaytri Kawadu Watkar, aged 62 years, Occ- Household R/o Adegaon, Tahani Ramtek, Dist. Nagpur 5) Sau Sunanda Dilip Kundle, aged 56 years, Occ- Household R/o Plot No. 79, Near Renuka Mata Mandir, Hudkeshwar, Mhalginagar, Nagpur, Tah. & Dist. Nagpur 6) Shri Pramod Ishwar Chaudhari, aged 42 years, Occ- Private R/o Bori (Ghivari), Post Indora, Tah. Mouda, Dist. Nagpur. 7) Sau. Sharda Ravindra Kadav, aged 38 years, Occ- Household R/o Navargaon, Post Rewral, Tah. Mouda, Dist. Nagpur. 8) Smt. Suman wd/o Shiva Chawke, aged 69 years, Oce- Household 9) Shri Vilas So Shiva Chawke, aged 35 years, Occ- Private, Both 8 & 9 R/o Plot No. 75, Ramji Nagar, Parsoda, Taj Mahal, Dist. Nagpur. 10) Sau. Kavita Raju Laxane, aged 41 years, Occ- Household, R/o Building No. 15B, Flat Nom 401, Tarodi, Symbiosis University, Post Kapsi, Taj Mahal & Dist. Nagpur. 11) Smt. Nanda wd/o Ashok Chawke, aged 56 years, Occ- Household 12) Shri Vishal Ashok Chawke, aged 31 years, Occ- Private, Both 11 & 12 R/o Bori, Post Kachurwahi, Taj Mahal, Dist. Nagpur 13) Sau. Sonali Devanand Gaurkar, aged 35 years, Occ. Household, R/o Chindwada Road, Near Kanchan Mangal Karyalay, Mahadula, Koradi, Tah. & Dist. Nagpur. 14) Sau. Monali Shailesh Askar, aged 33 years, Occ. Household, R/o Plot No. 608/A, Nandanvan Road, Near Buddha Vihar, Neharu Road, Ayodhya Nagar, Nagpur, Tah. & Dist. Nagpur.

----- Versus -----

**Non-Applicant:** Nil

**Name of Deceased :-** Ramkrushna Shrawan Chawke died on 18.12.2009 at Bori, Tah. Ramtek, Dist. Nagpur. At that time he was residing at Bori, Tah. Ramtek, Dis nagpur

Whereas I Ramkrushna Shrawan Chawke Died On 18/12/2009 at Bori, Tah. Ramtek, Dis nagpur and Whereas 1) Shri Ganpat S/o Ramkrushna Chawke 2) Shri Maroti So Ramkrushna Chawke 3) Smt. Sumtra Prabhu Suraskar 4) Smt. Jaytri Kawadu Watkar 5) Sau Sunanda Dilip Kundle, 6) Shri Pramod Ishwar Chaudhari 7) Sau. Sharda Ravindra Kadav 8) Smt. Suman wd/o Shiva Chawke 9) Shri Vilas So Shiva Chawke 10) Sau. Kavita Raju Laxane 11) Smt. Nanda wd/o Ashok Chawke 12) Shri Vishal Ashok Chawke 13) Sau. Sonali Devanand Gaurkar 14) Sau. Monali Shailesh Askar has presented an application under Rule 2, chapter I of Bombay Regulation act 1827 for grant Legal Heir Certificate U/s. 390 of Indian Succession Act, 1925 In respect of Heirship Certificate confirming the applicant as the lawful/legal heir.

This is to give public notice to all persons who may dispute the right of the said applicant, Ramkrushna Shrawan Chawke, as legal heir of the deceased, to appear before the Court of the Joint Civil Judge, Junior Division, Ramtek, on the 23rd day of sreptember 2025, at 10:30 a.m., All such persons are invited to submit their objections. It is hereby declared that if no sufficient objection is raised on or before the above-mentioned date, the court shall proceed forthwith to receive proof of the said applicants claim and, if satisfied, shall grant them a legal heir certificate, provided they are entitled thereto, under legal heirs to the said deceased.

Give under my hand and seal of the Court, this 03/09/2025.

Asstt. Supdt.
Court of Civil Judge Sr. Dn. Ramtek.

## कोर्ट विद्यमान श्री. रमेश कोळपे तालुका दंडाधिकारी, रामटेक यांचे न्यायालय

प्र.क्र. /एम.आर.सी.-/८१/२०२५
मौजा रामटेक ता. रामटेक
जिल्हा नागपूर

**-: जाहिरनामा :-**

ज्याअर्थी आनंदराव जयराम भिवगडे रा. सुभाष वार्ड, रामटेक जि. नागपूर, जि. नागपूर मो. ९८२३२७९००५१ यानी स्वतः नामे आनंदराव जयराम भिवगडे यांचा जन्म दिनांक १६.०६.१९५४ रोजी सुभाष वार्ड, रामटेक ता. रामटेक येथे राहत्या घरी येथे झाला असून जन्मची नोंद नगर परिषद रामटेक येथे केली नाही. त्याबाबत नगर परिषद रामटेक यांनी दिनांक १२.०८.२०२५ रोजी नोंद नसल्याचे प्रमाणपत्र सादर केले आहे. त्यामुळे नामे आनंदराव जयराम भिवगडे यांचा जन्म दिनांक १६.०६.१९५४ बाबत नगर परिषद रामटेक येथे नोंद घेणेबाबत आदेश पत्र मिळणेकरिता अर्ज सादर केले आहे.

त्याअर्थी या जाहिरनाम्याद्वारे असे सूचित करण्यात येते की, उपरोक्त अर्जात नमूद आनंदराव जयराम भिवगडे यांचा जन्म दिनांक १६.०६.१९५४ बाबत नगर परिषद रामटेक येथे घेण्यास इतर कुणाचेही कोणतेही प्रकारचे आक्षेप अथवा उजर तक्रार असल्यास आपण दिनांक २२/०९/२०२५ पावेतो आपले आक्षेप अथवा उजर तक्रार लेखी स्वरुपात स्वतः उपस्थित राहून या न्यायालयात समक्ष सादर करावे. नियोजित तारखेनंतर मिळालेल्या आक्षेपावर विचार करण्यात येणार नाही, याबाबत संबंधितांना नोंद घ्यावी.

सदर जाहीरनामा आज दिनांक ०४/०९/२०२५ रोजी माझे सही व शिक्क्यानिशी प्रसिद्ध करण्यात येत आहे.

स्थळ : रामटेक
दिनांक : ०४/०९/२०२५

(रमेश कोळपे)
तहसिलदार, रामटेक

## महसूल व वनविभाग
### कोर्ट विद्यमान तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर शहर, यांचे कार्यालय

(आकाशवाणी चौक, सिव्हील लाईन्स,नागपूर पिन कोड- ४४०००१)
तालुका - नागपूर शहर, जिल्हा - नागपूर
E-mail ID tahsildarngpcity@gmail.com

-: जाहिरनामा :-

[illegible]

तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी, नागपूर शहर करीता

(The same heading, with a -: जाहिरनामा :- whose text is [illegible] and the same signature line, is printed on each of the other nine notices of the तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर शहर on this page.)


RNINo-20789/71 महासागर नागपूर मालक,मुद्रक,प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस,कॉटन मार्केट,नागपूर१८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय,टेकडी रोड,सिताबर्डी,नागपूर येथे प्रकाशित केले. संपादकश्रीकृष्ण तनसुखदास चांडक मुख्य कार्यालय फोन७४४७७३५८५१/९९२२९७००२३/७४४७७३५८५३




# प्राण्यांचं वॉर मेमोरियल

अनेक जवान आपल्या देशासाठी प्राणांचं बलिदान देतात. या शहीद जवानांचा प्रत्येकालाच अभिमान वाटतो. या जवानांच्या, त्यांच्या शौर्याच्या आठवणी वॉर मेमोरियलच्या रूपात जपून ठेवल्या जातात. या मेमोरियलमध्ये गेल्यावर आपल्या अंगावर रोमांच उभे राहतात. देशासाठी बरेच प्राणीही काम करत असतात. विशेषकरून श्वान देशसेवेचं कार्य करतात. बॉम्बशोधक पथकात या श्वानांची भर्ती केली जाते. त्यांची हुंगण्याची शक्ती जबरदस्त असते. १९९३ मध्ये जंजीर नावाच्या श्वानाने पोलिसांची बरीच मदत केली होती. या जंजीरमुळे बरीच स्फोटकं जप्त करण्यात आली. असे असंख्य श्वान आपलं काम इमानेइतबारे करत असतात. त्यांनाही आपला जीव गमवावा लागतो. तर अशा या श्वानांसाठीही खास वॉर मेमोरियल तयार केलं जात आहे. उत्तर प्रदेशमधल्या मेरठमध्ये हे वॉर मेमोरियल तयार करण्यात येत आहे. इथे ३०० श्वान, त्यांचे प्रशिक्षक, घोडे आणि खेचरांची नावं लिहिली जाणार आहेत. यानिमित्ताने त्यांच्या आठवणींना उजाळा मिळणार आहे. काही श्वानांनी काश्मीर तसंच इतर ठिकाणी दशहतवाद्यांना पकडण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. कारगिल युद्धातही श्वानांनी आपले प्राण गमावले. या सर्व श्वानांची नाव इथे वाचता येणार आहेत. प्राण्यांच्या स्मृती जपणारं हे देशातलं पहिलंच वॉर मेमोरियल आहे.

# कॅलिडोस्कोप

# शेतकऱ्याचा मुलगा अंबानींचा शेजारी !



मुंबईत असे अनेक उच्चभ्रू परिसर आहेत, जिथे शहरातील बड्या उद्योजकांपासून अगदी सेलिब्रिटी मंडळींपर्यंतचे बरेचजण वास्तव्यास असतात. अशीच एक व्यक्ती देशातील सर्वात श्रीमंत व्यक्ती अर्थात मुकेश अंबानी यांची शेजारी आहे. अंबानी यांच्या शेजारी असणाऱ्या या व्यक्तीचे टाटा उद्योगसमूहाशी एक खास नाते आहे. स्वर्गीय रतन टाटा यांच्या विश्वासूंपैकी एक असणाऱ्या एन. चंद्रशेखर यांच्यावर या समूहाची मोठी धुरा असून तेच अंबानी यांचे शेजारी आहेत.

चंद्रशेखर यांची कहाणी एखाद्या चित्रपटाच्या कथानकापेक्षा कमी नाही. तामिळनाडूतील एक लहानसं खेडं असणाऱ्या मोहनूरमध्ये एका शेतकरी कुटुंबात त्यांचा जन्म झाला. रतन टाटा यांच्या इतक्या जवळच्या व्यक्तीमध्ये आपल्या कुटुंबातील लेकाचा सहाभाग असेल याची त्यांच्या कुटुंबीयांना पुसटशी कल्पनाही नव्हती. कोईमतूरच्या 'इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी' इथून त्यांनी 'अप्लाईड सायन्स'मधून शिक्षण घेतले. 'एनआयटी' मधून त्यांनी 'एमसीए'चे शिक्षण पूर्ण केले. १९८७ पासून ते टाटा समूहात कार्यरत झाले. इंटर्न म्हणून सुरू झालेला त्यांचा हा प्रवास आता संचालक आणि नंतर चेअरमनपदापर्यंत आला आहे. २००९ मध्ये त्यांना 'टीसीएस'च्या 'सीईओ'पदी नियुक्त करण्यात आले. २०१७ पासून ते या समूहाचे चेअरमन आहेत.

एन. चंद्रशेखर मुंबईत वास्तव्यास असून त्यांचे घर मुकेश अंबानी यांच्या अँटिलिया या निवासस्थानाशेजारीच आहे. २०२२ मध्ये त्यांनी मुंबईतील साऊथ टॉवर या इमारतीमध्ये एक आलिशान ड्युप्लेक्स घर खरेदी केलं. त्याची कमत आहे ९८ कोटी रुपये आहे. दक्षिण मुंबईमध्ये असणाऱ्या चंद्रशेखर यांच्या या निवासस्थानी अनेक सोयीसुविधा असून, सुरुवातीला त्यांनी हे घर पाच वर्षाच्या भाडेतत्त्वावर घेतलं होतं. त्यानंतर एक मोठी रक्कम मोजत त्यांनी हेच घर खरेदी केलं. दक्षिण मुंबईत बहुतांश बड्या उद्योजकांची निवासस्थानं आहेत. त्याच उच्चभ्रू भागात चंद्रशेखर यांचं निवासस्थान असून त्यांच्या घरामध्ये प्रायवेट लिफ्ट, उच्चस्तरिय सुरक्षाव्यवस्था, सी व्यू, क्लब हाऊस, वेलनेस सेंटर आणि लक्झरी कार पार्किंग अशा एक ना अनेक सुविधा आहेत.

**चंद्रशेखर यांचा पगार?**

टाटा उद्योग समूहात चेअरमनपदी असणाऱ्या एन चंद्रशेखर यांचा पगार दरवर्षी वाढत असतो. २०२१-२२ मध्ये त्यांचा पगार १०९ कोटी इतका होता. २०२३–२४ मध्ये तो १३५.३ कोटी रुपये झाला. या आर्थिक वर्षात त्यांचा पगार १५५ कोटी ८१ लाख रुपये इतका असल्याचं सांगण्यात येतं. भारतात सर्वाधिक पगार मिळणाऱ्या कॉर्पोरेट एक्झिक्युटीव्हमध्ये चंद्रशेखर यांच्या नावाचा समावेश होतो. त्यांच्या एकूण संपत्तीचा आकडासुद्धा मोठा असून हा आकडा ८५५ कोटी रुपयांच्या घरात असल्याचं म्हटलं जातं.



# आपोआप चालतात वाहनं!

जगात अनेक रहस्यमयी ठिकाणे आहेत. भारतातदेखील असेत एक रहस्यमयी ठिकाण आहे. हे ठिकाण चमत्कारापेक्षा कमी नाही. जगभरातून हे ठिकाण पाहण्यासाठी लोक येथे येतात. येथे सुरु न करता आपोआप वाहने चालतात. या ठिकाणी विज्ञानही थबकते.

भारतातील हे रहस्यमयी ठिकाण सर्वात लोकप्रिय 'टुरिस्ट डेस्टिनेशन' आहे. या ठिकाणाचे नाव आहे लडाख. भारताच्या उत्तरेला असलेल्या लडाखमध्ये मॅग्नेटिक हिल नावाचे हे ठिकाण आहे. हे ठिकाण जगातील सर्वात विचित्र ठिकाणांपैकी एक आहे. एखादे वाहन न्यूट्रल गियरमध्ये असते, तेव्हा उतारावर खाली जाऊ लागते; परंतु या ठिकाणी असे होत नाही. येथे वाहने वरच्या दिशेने जाऊ लागतात, याला मिस्ट्री हिल कवा ग्रॅव्हिटी हिल असेही म्हणतात.

टेकडीमध्ये असलेल्या चुंबकीय गुरुत्वाकर्षणामुळे येथे वाहने आपोआप चालतात. या टेकडीवर एक विशेष चुंबकीय शक्ती आढळते. त्यामुळे वाहने वरच्या दिशेने खेचली जातात. यामुळेच जगभरातील शास्त्रज्ञ येथे संशोधन करण्यासाठी येतात. लडाखच्या स्थानिक लोकांच्या म हणण्यानुसार येथे एके काळी एक रस्ता होता जो थेट स्वर्गात जात असे. यामुळेच याला स्वर्गात जाणारा रस्ता असेही म्हणतात. या अद्भूत ठिकाणी भेट द्यायची असेल, तर लेह–कारगिल महामार्गावरून जाता येते. हे ठिकाण लेह शहरापासून सुमारे तीस किलोमीटर अंतरावर आहे. सधू नदीदेखील मॅग्नेटिक हिलजवळून वाहते. या परिसरात फिरताना अप्रतिम निसर्ग सौंदर्य पहायला मि ळते. येथे पिवळ्या रंगाच्या बोर्डवर लिहिलेले असते, की वाहन न्यूट्रलमध्ये ठेवा. वाहन न्यूट्रलमध्ये ठेवताच इंजिन सुरु न करता हळूहळू वरच्या दिशेने जाऊ लागतात.

# फक्त देशाच्या मातीसाठी



प्रत्येकालाच आपल्या देशाचा अभिमान असतो. आपल्या देशातली माती, या मातीचा सुगंध हवाहवासा वाटतो. देशापासून लांब राहिलो तरी या मातीची एक ओढ लागलेली असते. आपण कधी एकदा आपल्या देशात जातोय, असं होऊन जातं. सैनिकांना तर आपल्या घराची, देशाची ओढ लागलेली असते. आपल्या मुलांना या मातीचं महत्त्व कळावं, असा त्यांचा प्रयत्न असतो. अमेरिकन सैनिकही याला अपवाद नाहीत. टोनी ट्रेकोनी या अमेरिकन सैनिकाला आपल्या बाळाचा जन्म आपल्या देशात व्हावा असं वाटत होतं. पण पत्नी गरोदर राहिली आणि त्याची बदली इटलीमधल्या पेडोवा इथे झाली. तो आपल्यासोबत पत्नीलाही घेऊन गेला. मधल्या काळात आपली बदली अमेरिकेत होईल, असं त्याला वाटत होतं. पण नऊ महिने पूर्ण होत आले तरी कुठलीही हालचाल दिसेना. मग ट्रेकोनीने एक युक्ती लढवली. त्याने अमेरिकेतून इटलीला माती मागवली. टोनीने बाळाच्या जन्मावेळी ही माती पलंगाखाली लपवून ठेवली. त्याने टेक्सासला राहणाऱ्या आपल्या पालकांना माती पाठवायला सांगितली. त्यांनीही डब्यात भरून माती पाठवली. ही माती बोटीतून टोनीकडे पोहोचली. यासाठी २०० डॉलर्स इतका खर्च आला. आपल्या बाळाचा जन्म टेक्सासच्या मातीत व्हावा, ही इच्छा पूर्ण करण्यासाठी टोनीने अनोखी कल्पना लढवली. आपण देशात नसलो म्हणून काय झालं, देशाची माती तर इथे नक्कीच येऊ शकते, असा विचार त्याने केला. टोनीला मुलगा झाला. मुलगा थोडा मोठा झाल्यावर टोनीने त्याचे पाय या मातीत उमटवले. ही माती मिळवण्यासाठी आपण कोणतंही दिव्य केलं असतं, असं टोनी सांगतो.



# सगळ्यात छोटं सोन्याचं नाणं

स्वीत्झरलँड या देशाने जगातलं सर्वात लहान आकाराचं सोन्याचं नाणं तयार केलं आहे. या नाण्याचा व्यास २.९६ मिलीमीटर आणि वजन ०.०६३ ग्रॅम इतकं आहे. या नाण्याचा आकार खूपच लहान आहे. त्यामुळे ते भगातूनच बघावं लागतं. या नाण्यावर जगप्रसिद्ध शास्त्रज्ञ अल्बर्ट आईनस्टाईनची छबी आहे. १९५१ मध्ये आपला ७२ वा वाढदिवस साजऱ्या करणाऱ्या आईनस्टाईनचा जीभ बाहेर काढलेला एक फोटोट आहे. हा फोटो या नाण्यावर कोरण्यात आला आहे. स्वीत्झरलँडच्या राष्ट्रीय टाकसाळीत हे नाणं तयार करण्यात आलं आहे. हे नाणं ऑनलाईन मागवता येतं. हे नाणं खरेदी करण्यासाठी तब्बल १९९ फ्रँक खरेदी करावे लागतात. मात्र अशाप्रकारची फक्त ९९९ नाणीच तयार करण्यात आली आहेत. ग्राहकांना या नाण्यासोबत भगही दिलं जाईल. या भगातून हे नाणं नीट न्याहाळता येईल. यानिमित्ताने एक विश्वविक्रमच करण्यात आला आहे. आईनस्टाईनचा जन्म तत्कालीन दक्षिण जर्मनीमधल्या उल्म या शहरात झाला होता. पण त्यांनी आपल्या आयुष्यातला काही काळ स्वीत्झरलँडमध्येही घालवला होता. या देशाचं नागरिकत्वही स्वीकारलं होते. याच कारणामुळे स्वीझ सरकारने त्यांचा गौरव केला आहे.

# नंबर प्लेटसाठी ४७ लाख रुपये!

भारतात आलिशान गाड्यांसह 'व्हीआयपी' नंबर प्लेटची ही क्रेज असलेला एक वर्ग आहे. देशातील सेलिब्रिटींसह अनेक बिझनेसमन आणि काही सामान्य व्यक्तीदेखील कार खरेदी केल्यावर त्याच्यासाठी 'व्हीआयपी' नंबर घेतात. महेंद्र सह धोनी, शाहरुख खान आणि मुकेश अंबानी सारख्या लोकप्रिय व्यक्तीच्या गाड्यांवर खास 'व्हीआयपी' नंबर प्लेट आहेत. लिटमस ७ कंपनीचे 'सीईओ' वेणु गोपालकृष्णन यांनी नुकताच आपल्या कार कलेक्शनमध्ये एका लक्झरी एसयूव्हीचा समावेश केला आहे. त्यांनी जवळपास चार कोटी वीस लाख रुपये कमतीची मर्सिडीज बेंज जी ६३ एएमजी ही कार खरेदी केली आहे. ही कार जेवढी खास आहे, त्यापेक्षा जास्त खास असलेल्या त्याच्या नंबर प्लेटची चर्चा होत आहे. त्याच्या गाडीचा रजिस्ट्रेशन नंबर केएल ०७ डीजी ०००७ असा आहे. या खास नंबरसाठी वेणु यांनी ४७ लाख रुपये खर्च केले आहेत. त्यामुळे वेणु गोपालकृष्णन यांनी खरेदी केलेली ही नंबर प्लेट देशातील सर्वात महागडी नंबर प्लेट ठरली आहे.




# युट्युबरची कोट्यवधींची कमाई!

युट्यूबर आणि सोशल मीडिया इन्फ्लुएंसर पूरव झा अनेकदा चर्चेत असतो. मजबूत फॅन फॉलोइंग असलेला हा इन्फ्लुएंसर दरमहा करोडो रुपये कमवतो. आज लोक त्याच्या कंटेंटमुळे त्याला खूप पसंत करत आहेत.

पूरव झा यांचा जन्म ११ ऑगस्ट २००२ रोजी बिहारमधील मधुबनी येथे झाला. वयाच्या तिसऱ्या वर्षी तो त्याच्या पालकांसह दिल्लीला आला. त्याने दिल्लीतूनच त्याचे शालेय शिक्षण पूर्ण केले. २०२० मध्ये त्याने पदवी मिळवली. त्यानंतर, त्याने कॉम`डी व्हिडीओद्वारे लोकांचे मनोरंजन करून लोकांच्या हृदयात स्थान निर्माण केले. आज २३ वर्षीय पूरव हा युट्यूबर आणि 'सोशल मीडिया' इन्फ्लुएंसर म्हणून लोकांमध्ये लोकप्रिय बनला आहे. त्याची प्रतिभा पाहून चाहत्यांनी त्याला 'सोशल मीडिया'वर 'ह्युमन एआय' हे नाव दिले आहे.

पूरव 'सोशल मीडिया'वर ट्रेंड होणाऱ्या लोकांच्या व्यक्तिमत्त्वाची खूप चांगली कॉपी करतो. त्यामुळे लोकांनी त्याला 'ह्युमन एआय'चा टॅग दिला आहे. पूरवचे इंस्टाग्राम आणि युट्यूबवर प्रचंड फॅन फॉलोइंग आहे. त्याला इंस्टाग्रामवर ७० लाख लोक फॉलो करतात आणि त्याच्या रील्सवरही प्रेम ाचा वर्षाव करतात. यासोबतच त्याचे युट्यूबवर ५० लाख सबस्क्राइबर्स आहेत. ते इंस्टाग्राम हँडलवर स्वतःचे चॅनल चालवतात. त्यांच्या चॅनलशी संबंधित सदस्यांची संख्या एक लाखांहून अधिक आहे. सबस्क्रायबरची संख्या लक्षात घेतल्यास त्याचे मासिक उत्पन्न २.६ कोटींहून अधिक आहे.

काही काळापूर्वी तो करण जोहरच्या 'शो द ट्रेटर्स'मध्ये दिसला होता. चाहत्यांना त्यांचा गेम प्लॅन आणि ऑन–स्क्रीन प्रेझेन्स खूप आवडला हातो. तथापि, तो या शोचा विजेता बनू शकला नाही. लवकरच तो सलमान खानच्या वादग्रस्त शो 'बिग बॉस १९' मध्ये देखील दिसू शकतो. तथापि, निर्मात्यांनी कवा स्वतः युट्यूबरने याची पुष्टी केलेली नाही. याशिवाय तो 'इश्क नेक्स्ट डोअर' आणि 'कॅम्पस डायरीज'सह अनेक वेब सिरीजमध्ये दिसला आहे.



# सायबर गुन्हेगारीचं जमताडा कनेक्शन

फक्त एक फोन कॉल... आणि तुमचे सगळे पैसे गायब होऊ शकतात. देशभरात अनेक ठिकाणी सायबर गुन्हे घडतात. ग्राहकांच्या बँक खात्यातले पैसे काही क्षणात गायब होतात. हे पैसे कुठे गेले याचा अजिबात थांग लागत नाही. सायबर गुन्हेगार अगदी शिताफीने सगळी रक्कम हातोहात गायब करतात. झारखंडम धला जमताडा नावाचा जिल्हा या सायबर गुन्हेगारीचं केंद्र मानला जातो. जमताडा म्हणजे सापांचं निवास्थान. इथे बॉक्साइटच्या खाणीही आहेत. एके काळी इथल्या लोकांची दोन वेळच्या जेवणाचीही पंचाईत होती. लोकांकडे सायकली कवा मोटारसायकली असायच्या, पण आता परिस्थिती बदलली आहे. इथल्या लोकांची मोठाली घरं आहेत. अनेकांच्या दारांपुढे गाड्या उभ्या आहेत. सायबर गुन्हेगारीमुळे हे शक्य झाल्याचं लोकांचं म्हणणं आहे. सायबर गुन्ह्याच्या तक्रारी आल्या की सर्वात आधी जमताडाचं नाव समोर येतं. पोलीस अधिकारीही जमताडामध्ये चौकशीसाठी येतात. पण सायबर गुन्ह्यांमध्ये फारसं काहीच हाती लागत नाही. बँकेच्या खात्यांमधून गायब करण्यात आलेला हा पैसा नेमका कुठे जातो हे कोणालाच कळत नाही. जमताडाम धले सायबर गुन्हेगार पोहोचलेले आहेत. त्यांनी सेलिब्रिटी, उद्योगपतींनाही सोडलेलं नाही. त्यामुळे सायबर गुन्हेगारीचं हे जमताडा कनेक्शन जबरदस्तच म्हणावं लागेल.




# 'इथे' लग्नासाठी मुलींच्या उड्या!

'गाव' हा शब्द कानावर पडताच आपल्या डोळ्यांसमोर कच्ची घरे, विहिरी, हिरवीगार शेतं, मेहनती शेतकरी, विहिरीवर पाणी भरणाऱ्या महिला, नदीवर कपडे धुण्यासाठी गेलेल्या महिला आणि कच्च्या रस्त्यांची चित्रे येतात. आजही अनेक गावांमध्ये वीज, पाणी, पक्के रस्ते, चांगली शाळा कवा मोठे रुग्णालय यासारख्या मूलभूत सुविधांचा अभाव आहे; पण भारतात एक असे गाव आहे, जे मोठमोठ्या शहरांनाही लाजवेल. हे भारतातील सर्वात श्रीमंत गाव आहे, जिथे जागतिक दर्जाच्या सुविधा उपलब्ध आहेत.

हे गाव गुजरातमधील माधापार आहे. ते केवळ भारतातच नव्हे, तर जगातील सर्वात श्रीमंत गाव म्हणून ओळखले जाते. या गावाची एकूण लोकसंख्या सुमारे ९२ हजार म्हणजेच जवळपास एक लाख आहे. येथे सात हजार सहाशे घरे आहेत. विशेष म्हणजे या गावात एक–दोन नव्हे, तर बँकांच्या १७ शाखा आहेत. माधापार गावाची आर्थिक स्थिती अत्यंत मजबूत आहे. गावकऱ्यांनी या बँकांमध्ये पाच हजार कोटी रुपयांहून अधिक रक्कम जमा केली आहे. एवढी मोठी रक्कम मोठमोठ्या शहरांमधील बँकांमध्येही क्वचितच जमा होते. या गावात राहणारी प्रत्येक व्यक्ती करोडपती आहे. या गावातील मुलांशी लग्न करण्यासाठी इतर गावातील मुली अक्षरशः उतावळ्या असतात असे म्हटले जाते.



माधापारमधील अनेक कुटुंबे व्यवसाय आणि रोजगारासाठी परदेशात स्थायिक झाली आहेत. अमेरिका, ब्रिटन, कॅनडा, आफ्रिका आणि आखाती देशांमध्ये त्यांचे व्यवसाय यशस्वीपणे चालतात; पण हे प्रवासी भारतीय आपले गाव विसरलेले नाही. ते दरमहा आपल्या कुटुंबांना मोठ्या रकमा पाठवतात आणि गावाच्या विकासातही महत्त्वपूर्ण योगदान देतात. शिक्षण, आरोग्य, पायाभूत सुविधा आणि सामाजिक कार्यांसाठी ते मोठ्या प्रमाणात मदत करतात. गावाला आधुनिक बनवण्यात या लोकांचा मोठा वाटा आहे. माधापार गाव बाराव्या शतकात स्थापन झाले. म्हणजेच या गावाला आठशे वर्षांहून अधिक काळ लोटला आहे. कच्छच्या मिस्त्री समुदायाने या गावाची पायाभरणी केली. या समुदायाने केवळ गुजरातमध्येच नव्हे, तर संपूर्ण भारतात अनेक नक्षीकाम असलेली मंदिरे आणि ऐतिहासिक इमारती बांधल्या. कालांतराने या गावात पंजाबी, गुजराती, बंगाली, तमिळ, मराठी, काश्मिरी अशा विविध सम ुदायांचे लोक एकत्र आले. आज हे गाव वैविध्यपूर्ण संस्कृतीचे प्रतीक आहे.

माधापारमध्ये शाळा, महाविद्यालये, बँका, आरोग्य केंद्रे, उद्याने, रस्ते आणि अशा सुविधा आहेत, ज्या कोणत्याही मोठ्या शहराला लाजवतील. या गावातील रहिवाशांचे जीवनशैली आणि सुविधा शहरांपेक्षाही बऱ्याच बाबतीत उत्कृष्ट आहेत. यामुळे भारताची खरी ताकद गावांमध्ये आहे, हा संदेश ते देत आहेत.

# सरकारसोबत जोडून कुठलेही काम करू नका

## केंद्रीय मंत्री नितीन गडकरींनी पुन्हा बजावले



■ महासागर प्रतिनिधी

नागपूर, दि. ८ : केंद्रीय मंत्री नितीन गडकरी हे आपल्या स्पष्ट विचारांसाठी प्रसिद्ध आहेत मोदी सरकारमध्ये मागील अकरा वर्षांपासून ते मंत्री असतानाही सरकारच्या अनेक धोरणावर त्यांनी स्पष्ट मत मांडले आहे. नागपूरमध्ये झालेल्या एका कार्यक्रमात त्यांनी एक महत्त्वपूर्ण विधान केले. गडकरी म्हणाले, मी सरकारमध्ये असलो तरी सरकारसोबत जोडून कुठलेही काम करू नका.

कै. लक्ष्मणराव मानकर स्मृती संस्थेच्या चार दिवसांपासून सुरू असलेल्या एकलव्य एकल विद्यालय शिक्षक-पर्यवेक्षक प्रशिक्षण वर्गाचा समारोप झाला. त्यावेळी मार्गदर्शन करताना गडकरी बोलत होते.

लक्ष्मणराव मानकर स्मृती संस्थेचे अध्यक्ष अतुल शिरोडकर, उपाध्यक्ष राजीव हडप आदींनी आदिवासी विद्यापीठ स्थापन करणे संबंधात गडकरींकडे मागणी केली आहे.

यावर गडकरी म्हणाले की, आमच्या संस्थेतील लोक खूप छान काम करतात. नवीन उपक्रमा संदर्भात ते फार आशावादी आहेत. मात्र मी सरकारमध्ये काम करत असलो तरी सरकार सोबत जोडून आपण हे काम करायला नको अशी स्पष्ट भूमिका गडकरींनी घेतली.

पुढे ते म्हणाले की, अतिदुर्गम आदिवासी भागातील गुणवंत विद्यार्थ्यांना पुढील शिक्षण घेण्यासाठी वेगवेगळ्या ठिकाणी वसतीगृह तयार करण्याची योजना असल्याची माहिती नितीन गडकरी यांनी दिली. याठिकाणी नाममात्र दरामध्ये राहण्याची, जेवणाची सुविधा उपलब्ध करून देण्यात येईल. आदिवासी विद्यार्थ्यांमधून भविष्यातील डॉक्टर, अभियंते आणि अन्य क्षेत्रातले दिग्गज तयार होतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

गडचिरोली जिल्ह्यात ड्रायव्हिंग ट्रेनिंग स्कूल सुद्धा आपण मंजूर करणार आहोत. जेणेकरून, तिथे रोजगार निर्मिती होऊ शकेल, अशी माहिती देखील त्यांनी दिली.

या कार्यक्रमाला नोबेल पारितोषिक विजेते कैलास सत्यार्थी उपस्थित होते. भारताला विश्वगुरू बनायचे असेल तर केवळ सोन्याची चिडीयाह्बनून हे शक्य नाही. तर त्याला गुरूत्व दाखवावे लागेल. जे लोक अंधारामध्ये आहेत त्यांना प्रकाशात नेण्याचे काम करावे लागेल. तेव्हाच भारताला विश्वगुरू बनवण्यापासून कुणीही रोखू शकणार नाही, असा विश्वास सत्यार्थी यांनी व्यक्त केला.

आपल्या सारख्या निस्वार्थ आणि ध्येयवेड्या लोकांच्या माध्यमाने दुर्गम आदीवासी भागातील विद्यार्थ्यांसाठी जे कार्य सुरु आहे, त्यात आपण एका प्रकाशमय दिव्याचे कार्य करत आहात. या दिव्याने स्वतः जळत राहून अनेक आयुष्य उजळण्याचा ध्यास घेतला आहे आणि या सातत्यपूर्ण कार्याने आपणच भारताला जगतगुरू बनवणार असल्याचा विश्वास व्यक्त करीत त्यांनी गडकरी यांचे कौतुक केले.

# ऐतिहासिक एम्प्रेस मिलची भिंत कोसळली

## मलब्याखाली दबल्याने ४ चारचाकी वाहने क्षतिग्रस्त : मालकाला बजावली नोटीस





■ महासागर प्रतिनिधी

नागपूर, दि. ८ : मध्य नागपुरात असलेल्या सर्वात जुन्या एम्प्रेस मिल परिसरातील मारवाडी चाळला लागून असलेली ऐतिहासिक शिकस्त भिंत रविवार ७ सप्टेंबरच्या रात्री ११.३० वाजताच्या सुमारास अचानक कोसळली. या घटनेत सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही, मात्र भिंतीच्या मलब्याखाली ४ चारचाकी वाहने दाबल्या गेल्याने वाहन क्षतिग्रस्त झाले.

मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांनी सोमवारी सकाळी यांनी घटनास्थळाची पाहणी करून विद्यमान मालकाला नोटीस बजावण्याचे निर्देश दिले. यावेळी माजी महापौर दयाशंकर तिवारी, मुख्य अभियंता मनोज तालेवार, उपायुक्त गणेश राठोड आणि माजी नगरसेवक संजय बालपांडे उपस्थित होते.

सन १८८९ मध्ये टाटा समूहाने स्थापन केलेल्या एम्प्रेस मिलचा हा परिसर आहे. रविवारी रात्रीच्या सुमारास अचानक या परिसरातील मारवाडी चाळला लागून असलेली भिंत कोसळली, कोसळलेली भिंत जवळपास १३६ वर्षे जुनी असल्याचे सांगितल्या जाते. सहा मीटर उंच आणि पन्नास फूट लांबीची ही भिंत चुना व विटांनी बांधण्यात आली होती.

या भिंतीच्या शेजारील नाल्यावर टाकलेल्या स्लॅबवर चारचाकी वाहने पार्क करण्यात आली होती. भिंत कोसळल्याने या वाहनांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. भिंतीसह नाल्यावरची स्लॅबही कोसळला, सुदैवाने त्यावेळी वाहनांमध्ये कोणीही नव्हते.

मनपा आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी यांनी धोकादायक स्लॅबचे काम त्वरित करण्याचे आणि जुनी भिंत पडण्याचे निर्देश संबधित विभागाला दिले. त्यांच्या सूचनांनुसार, मनपाच्या गांधीबाग झोनच्या पथकाने जेसीबीच्या सहाय्याने परिसरातील शिकस्त भिंत पाडली. या वेळी उपअभियंता संजय इंगळे, कनिष्ठ अभियंता बी. के. तायडे आणि दिलीप वंजारी उपस्थित होते.

### ...आणि ते बचावले

भिंत कोसळण्याचा एक सीसीटीव्ही व्हिडिओही समोर आला आहे. त्यानुसार, दोन दुचाकी वाहने त्या रस्त्याने जाताना दिसतात. पहिली दुचाकी सुखरूप पुढे गेली, तर दुसरी दुचाकी निघत असतानाच आकस्मिकरित्या भिंत कोसळल्याचे चित्र स्पष्ट दिसते. विशेष म्हणजे, दोन्ही वाहनचालक आणि त्यांच्यासोबत मागे बसलेले प्रवासी यांची थरकाप उडवणारी ही घटना थोडक्यात टळली आणि सर्वजण सुखरूप बचावले आहेत.

# शासन निर्णयास छगन भुजबळ यांचा विरोध योग्यच : अनिल देशमुख



■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ८ : हैदराबाद गॅजेट लागू केल्याचा शासन निर्णय काढल्याने कुणबी दाखले देऊन त्यांना ओबीसीमधून आरक्षण देण्यासाठी छगन भुजबळ यांनी विरोध केला आहे. भुजबळ यांचा आरक्षणासंदर्भात अभ्यास आहे. ओबीसी समाजाच्या हितासाठी ते गेल्या अनेक वर्षापासून कार्य करीत आहेत. यामुळे राज्य सरकारने काढलेल्या मराठा आरक्षणाच्या संदर्भातील शासन निर्णयास छगन भुजबळ जो विरोध करत आहे, तो योग्यच असल्याचे मत अनिल देशमुख यांनी व्यक्त केले.

मराठा समाजाला आरक्षण मिळण्याबाबत आमचा विरोध नाही. ओबीसी समाजाला मुळातच आरक्षण २७ टक्के आहे. त्यात १३ टक्के भटके विमुक्त व इतर साठी राखीव आहे. उरलेल्या १९ टक्यात जर मराठा समाजाला सरकारने शासन निर्णय काढल्याप्रमाणे आरक्षण दिले तर ओबीसीच्या आरक्षणामध्ये वाटेकरी वाढणार आहे. त्यामुळे ओबीसी समाजाचे प्रचंड नुकसान होणार आहे, असेही अनिल देशमुख म्हणाले.

मराठा समाजातील पात्र व्यक्तींनाच कुणबी दाखले दिले जातील असा उल्लेख शासन निर्णयात आधी होता. पण या पात्र शब्दाला मनोज जरांगे यांनी विरोध केला आणि तो शब्द काढून टाकण्यात आला. त्यामुळे मराठा समाजाला कुणबी दाखले मिळणे सोपे होणार आहे. हैदराबाद गॅझेटचा दाखला देऊन मराठा समाजाला ओबीसी आरक्षण मिळवून देण्याचा शासनाचा प्रयत्न हा ओबीसी समाजाच्या अधिकारावर गदा आणणारा आहे.

इतिहासातील काही कागदपत्रांवरुन नवा समाज ओबीसीमध्ये आणण्याचा निर्णय हा अन्यायकारक ठरणार आहे. त्यामुळे मराठा समाजाच्या बाबतीत शासनाने घेतलेल्या निर्णयाला आमचा विरोध असल्याचेही अनिल देशमुख म्हणाले.

# सरकारचा जीआर सरसकट मराठा आरक्षणाचाच..

## वडेट्टीवार यांचा दावा : 'पात्र' शब्दाने गोंधळ



■ महासागर प्रतिनिधी

मुंबई, दि. ८ : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील महायुती सरकारने काढलेला मराठा आरक्षणाचा जीआर हा त्या समाजाला सरसकट आरक्षण देणारा असल्याचा दावा काँग्रेसचे ज्येष्ठ नेते विजय वडेट्टीवार यांनी केला आहे. या प्रकरणी त्यांनी सरकारने जीआरमधील 'पात्र' हा शब्द वगळण्याकडे लक्ष वेधले आहे. वडेट्टीवार यांच्या या भूमिकेमुळे सरकारच्या जीआर भोवतालची संभ्रमावस्था अधिकच गडद झाली आहे.

मनोज जरांगे यांनी मराठा आरक्षणाच्या मुद्यावर मुंबईती आझाद मैदानावर बेमुदत उपोषण केले होते. त्यानंतर सरकारने यासंबंधी एक जीआर लागू केला होता. या जीआरनंतर जरांगे यांनी आपले उपोषण मागे घेतले होते. आता या मुद्यावर मोठे राजकारण रंगले आहे. सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसचे बडे नेते छगन भुजबळ यांनी या प्रकरणी कोर्टात दाद मागण्याचा इशारा दिल्यानंतर आता वडेट्टीवार यांनी या प्रकरणी दंड थोपटले आहे. त्यांनी सोमवारी सकाळी पत्रकारांशी संवाद साधताना सरकारच्या जीआरमुळे मराठा समाजाला सरसकट ओबीसी आरक्षण मिळणार असल्याचा दावा केला.

वडेट्टीवार म्हणाले, हैदराबाद गॅझेटमध्ये कोणतेही नाव किंवा आडनावाचा उल्लेख नाही. त्यात केवळ कुणबी 9 लाख व 22 लाखांपर्यंत मराठे असल्याचा उल्लेख आहे. आता हे मराठे व कुणबी शोधायचे कसे? त्यामुळे त्यातून काही निष्पन्न होईल असे मला वाटत नाही. या प्रकरणी मी तज्ज्ञांशीही चर्चा केली. त्यांनीही या गॅझेटमध्ये कुठेही नावाचा उल्लेख नसल्याचे म्हटले आहे. त्यामुळे सरकारने काढलेला जीआर हा सरसकटचा आहे. त्यातून पात्र हा शब्द वगळण्यात आला आहे. पात्र शब्द काढल्यामुळे मराठा समाजाला सरसकटच आरक्षण मिळेल अशी शंका आहे.

आमचे म्हणणे आहे की, मराठा समाजातील गरबी व उपेक्षिति लोकांना आरक्षण दिले पाहिजे. त्यासाठी सरकारने ईडब्ल्यूएसची तरतूद केली. आरक्षणाची मर्याही 10 टक्क्यांनी वाढवली. पुन्हा त्यांनी ओबीसीतूनही आरक्षण दिले. काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी जातनिहाय जनगणना करून ज्यांच्या वाट्याला जे येईल त्यांना ते देण्याची स्पष्ट भूमिका घेतली आहे. पण सरकार त्याकडे अजिबात लक्ष देत नाही. त्याऐवजी ते एका जातीला दुस?या जातीत वर्ग करत आहे. यामुळे हे सरकार ओबीसीच्या मुळावर उठल्याचे आता स्पष्ट झाले आहे, असे वडेट्टीवार म्हणाले.

# आयुर्वेद आणि पंचकर्म चिकित्सा

: हॅलो डॉक्टरः



लोकारोग्य

आपला भारत आयुर्वेदामध्ये अग्रेसर आहे. ऋषीमुनींनी हजारो वर्षा पूर्वी वृक्ष, जडीबुटी, फळ, फुल अशा रानावनातील नैर्सगिक पाल्यापासून आणि फळांपासून प्रभावी अशी उपचार पद्धती विकसित केली. याच आयुर्वेदाने शारीरिक आणि मानसिक विकारांवर उत्तम अशी रामबाण उपचार पद्धती शोधून काढली ज्या उपचार पद्धतीला आज जगाने स्वीकारलेले आहे. याच आयुर्वेदिक उपचार पद्धतीचा महत्वाचा भाग म्हणजे पंचकर्म चिकित्सा. अनेक प्रकारच्या शारीरिक व्याधींवर अशा प्रकारची पंचकर्म चिकित्सा हि एक प्रभावशाली उपचार पद्धती मानली गेली आहे. हि पंचकर्म उपचार पद्धती म्हणजे नेमकी कोणती उपचार पद्धती? याच विषयाच्या अनुषंगाने वैद्य चेतन गुल्हाने यांच्याशी केलेली बातचीत.

**पंचकर्म म्हणजे काय? आणि आयुर्वेदामध्ये पंचकर्माला किती महत्व आहे?**

■ आयुर्वेद हि भारताची एक प्राचीन पारंपरिक उपचार पद्धती आहे. आयुर्वेदाचे सिद्धांत हे आजच्या आधुनिक काळात देखील तितकेच उपयुक्त ठरतात. रुग्णाला बरे करण्यासाठी खनिज स्वरूपात औषधांचा उपचार केला जातो त्याला शमन चिकीत्सा म्हणतात. आपल्या शरीरात जे दोष असतात त्याचे मुळापासून उच्चटन करणे आणि ते शरीराच्या बाहेर काढणे याला शोधन चिकित्सा पद्धती म्हणतात. एखादी व्याधी पुन्हा उद्भवू नये म्हणून जे उपचार केले जातात ते म्हणजे आयुर्वेद उपचार. त्यालाच पंचकर्म म्हणतात. पंचकर्मामध्ये ५ कर्म असतात, विरेचन, बस्त, रक्त मोशन, वमन आणि नात्स्य चिकित्सा असे पाच प्रकार आहेत .

**एखादी आजारी व्यक्ती आणि निरोगी व्यक्ती अशा दोघांनाही पंचकर्म उपचार पद्धती उपयुक्त ठरते का?**

■ आयुर्वेदाचे प्रयोजन हे भिन्न प्रकृतीच्या सर्वांसाठीच आहे. संस्कृतमध्ये एक श्लोक आहे स्वस्थस्य स्वस्थ रक्षणम, आतुरस्य विकार प्रथमाम. निरोगी व्यक्तीचे स्वास्थ्य हे ठीक असलं तरी त्याच्या शरीराचे संरक्षण करण्यासाठी आणि आजारी व्यक्तीच्या शरीरातील दोषच निराकरण करण्याचं काम पंचकर्म करत. पंचकर्मामुळे निरोगी व्यक्तीची रोगप्रतिकारक शक्ती वाढविण्याच आणि त्याला शारीरिक आणि मानसिक बळ देण्याचं काम पंचकर्म करते.

आपले शरीर हे रस, रक्त, मांस, मेद, अस्मि, शुक्र अशा सात धातूंनी भरलेलं असत. त्यामुळेच शरीर शुद्ध करण्याचं महत्वाचं काम पंचकर्म चिकित्से द्वारे केले जाते. शरीरातील व्याधी ब्रेकडाऊन करण्याचं कार्य पंचकर्म करते.

**पंचकर्म चिकित्सा हि उपचार पद्धती कुणी करावी आणि कुणी करू नये असा काही नियम आहे का?**

■ एखादी व्यक्ती निरोगी असेल किंवा कुणी एखाद्या दुर्धर आजाराने पीडित असेल अशी कुणीही व्यक्ती पंचकर्म चिकित्सा करू शकते. बहुदोष म्हणजेच आपल्या शरीरात जे टॉक्सिन असते ते प्रमाणापेक्षा जास्त वाढते तेंव्हा बहुदोष उत्पन्न होतो आणि तो जेंव्हा अनेक ॲलोपॅथिक औषधांनी नियंत्रणात येत नाही तेंव्हा त्याला पंचकर्म चिकित्सा उपयुक्त ठरते. मधुमेह, उच्च रक्त दाब, किडनीचे विकार, केस गळणे, निद्रानाश अशा दुर्धर आजारांमध्ये पंचकर्म चिकित्सा खूपच उपयुक्त ठरते.

**पंचकर्मातील महत्वाच्या वमन, विरेचन आणि बस्ती या उपचार पद्धती बद्दल थोडक्यात काय सांगाल?**

■ पंचकर्मातील एक महत्वाचे कर्म म्हणजेच वमन. यामध्ये थिरयोटिक ओमेटिंग अर्थात उलट्या करून शरीरातील दोष बाहेर टाकले जातात. मदनकट, सैंधव आणि मधाच्या गोळ्या खायला देऊन शरीरातील दोष बाहेर काढले जातात. याला १ ते १२ तासांचा कालावधी तर कधी १० दिवस देखील लागतात. विरेचन या कर्मात विविध औषधी देऊन शरीरातील दोष पक्वाशयात आणले जातात आणि गुदवाराद्वारे बाहेर काढले जातात. पिंपळ, त्रिफळा अशा गोळ्यांचा यामध्ये औषध म्हणून वापर करतात. पित्ताशयाच्या विकारावर हे कर्म उपयोगी आहे. बस्ती या कर्म प्रकारात मेडिकेअर ऑइल किंवा औषध गुद्वाराद्वारे देतात. आयुवेर्दातील हि एक उत्तम उपचार पद्धती आहे .स्पायनल कॉर्ड,पक्षाघाताचा आजारावर बस्ती उपचार पद्धती एक रामबाण इलाज आहे.

**पंचकर्म उपचार पद्धतीचे फायदे काय आहेत?**

■ पंचकर्म उपचार पद्धतीचा मुख्य फायदा म्हणजे शारीरिक आणि मानसिक बळ प्राप्त होते. आपला त्वचेचा रंग उजळतो. आपली श्रवनशक्ती, ध्यान, दृष्टी वाढते आणि आपल्या शरीरात जे सात धातू आहेत ते उत्तम पद्धतीने तयार होतात. शरीरामध्ये सूक्ष्म चॅनेल्स तयार होतात ज्यामुळे शरीर प्रक्रिया सुरळीत चालते असे अनेक फायदे आहेत. ■

# अजित पवारांच्या वरदहस्ताने २०० कोटींचा भ्रष्टाचार

## आमदार रोहित पवार यांचा थेट आरोप : कारवाई करण्याची मागणी



■ वृत्तसंस्था, पुणे, दि. ८ : पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये दोनशे कोटी रुपयांचा भ्रष्टाचार झाला असल्याचा आरोप आमदार रोहित पवार यांनी केला आहे. इतकेच नाही तर हा भ्रष्टाचार उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या वरदहस्ताने झाला असल्याचा दावा देखील त्यांनी केला आहे. यामुळे अजित पवार यांच्या अडचणी वाढण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

या संदर्भात आमदार रोहित पवार यांनी एका पोस्टच्या माध्यमातूनही अजित पवार यांच्यावर निशाणा साधला आहे. या गैरव्यवहारावर पांघरून घातलं जावं म्हणून अधिकारी आणि मंत्र्यांपर्यंत हप्ते जातात अशी चर्चा, असल्याचा दावा देखील त्यांनी केला आहे. यावर कारवाई करण्यासाठी त्यांनी सरकारला 15 दिवसांची मुदत देखील दिली आहे. अन्यथा शेतकऱ्यांसोबत मोठं आंदोलन केलं जाईल, असा इशारा देखील रोहित पवार यांनी दिला आहे.

शेतकऱ्यांना न्याय देण्यासाठी स्थापन झालेली पुणे कृषी उत्पन्न बाजार समिती ही गुंड आणि भ्रष्टाचारी यांच्या विळख्यात अडकली असून अधिकारी आणि सदस्य यांच्या संगनमताने इथं सुमारे २०० कोटी रुपयांचा भ्रष्टाचार झाला. विशेष म्हणजे या भ्रष्टाचाऱ्यांना अजितदादा यांचा वरदहस्त असल्याचं तेच सांगत असल्याने अजितदादांनीही याबाबत खुलासा करण्याची गरज आहे. याबाबत सविस्तर पत्रकार परिषद घेऊन माहिती दिली. यावेळी प्रवक्ते विकास लवांडे हे उपस्थित होते.

विकास लवांडे हे गेल्या अनेक दिवसांपासून या भ्रष्टाचारावर आवाज उठवत आहेत. बेकायदा भाडे वसुली (जी ५६ गैरव्यवहार), ४ हजार लोकांना अनधिकृत परवाना, अनधिकृतपणे बाजार समितीच्या जागा भाड्याने देणे, रोजंदारी सेवकांच्या कायम नियुक्तीत भ्रष्टाचार, गाळ्यांचे अनधिकृत वाटप, शेतकऱ्यांसाठी असलेली स्वच्छतागृहे बंद करुन त्या जागा अनधिकृतपणे सलून किंवा गुटखा विक्रीसाठी देणं, संचालकांकडूनच पार्कीगच्या नावाखाली केली जाणारी लूट, सुरक्षारक्षकांच्या नियुक्तीत भ्रष्टाचार, गुंडांचा सर्रास वापर, यातून व्यापाऱ्यांना होणारा त्रास, स्वच्छता कंत्राटात गैरव्यवहार असे अनेक प्रकारचे गैरव्यवहार या बाजार समितीत सर्रासपणे सुरु आहेत.

या प्रकरणाच्या चौकशीसाठी डीडीआर जगताप यांची नेमणूक केली असली तरी तेच गैरव्यवहारात अडकले आहेत. गैरव्यवहाराच्या या प्रकरणाची चौकशी करण्याचा मुद्दा विधानसभेत उपस्थित केला असतानाही पणन संचालकांकडून पारदर्शकपणे चौकशी होत नाही. गैरव्यवहारावर पांघरून घातलं जावं म्हणून अधिकारी आणि मंत्र्यांपर्यंत हप्ते जातात अशी चर्चा असून याविरोधात कारवाई करण्याची मागणीही रोहित पवार यांनी केली.

## भारतीय शोध फॉर्म्युलेशनला यशस्वी केस प्रत्यारोपण थेरपी म्हणून मान्यता



केस पुनर्संचयित विज्ञानासाठी एक महत्त्वपूर्ण झेप घेत, QR678 Neo®, पुढील पिढीतील, पेटंट केलेले, भारतीय- विकसित बायोमिमेटिक पेप्टाइड फॉर्म्युलेशन, जर्नल ऑफ कॉस्मेटिक अँड लेसर थेरपीमध्ये प्रकाशित झालेल्या केस प्रत्यारोपण शस्त्रक्रियेवरील जागतिक अभ्यासाद्वारे वैद्यकीयदृष्ट्या प्रमाणित केले गेले आहे. प्रगत केस गळती असलेल्या ११२ पुरुषांचा समावेश असलेल्या या आंतरराष्ट्रीय चाचणीचे नेतृत्व भारत, अमेरिका आणि मलेशियातील तज्ञांनी केले होते.

QR678 Neo® ही भारतात विकसित आणि वैद्यकीयदृष्ट्या चाचणी केलेली पेटंट केलेली पेप्टाइड थेरपी आहे आणि आता युनायटेड स्टेट्समध्ये देखील पेटंट केलेली आहे. ५० वर्षांच्या वयापर्यंत ८५% पुरुष आणि ६० वर्षांच्या वयापर्यंत ५०% महिलांमध्ये अँड्रोजेनेटिक अलोपेसियाचा परिणाम होत असल्याने, विश्वासार्ह आणि प्रभावी प्रत्यारोपणाच्या निकालांची गरज कधीही इतकी वाढली नाही. कोल्ड सलाईनसारखे काढलेले केसांचे कूप साठवण्याचे पारंपारिक माध्यम केवळ तात्पुरते जतन करतात आणि जैविक क्रियाकलापांचा अभाव ठेवतात, ज्यामुळे बहुतेकदा ग्राफ्ट्सना नुकसान होण्याची शक्यता असते. अशा सहाय्यक पदार्थांप्रमाणे सलाईन किंवा पीआरपीसह जे केसांच्या कूपांना फक्त तात्पुरता आधार देतात, QR678 Neo® प्रत्यारोपणाच्या संपूर्ण प्रक्रियेत सक्रिय जैविक भूमिका बजावते.

शस्त्रक्रियेपूर्वी, दरम्यान आणि नंतर तीन टप्प्यात दिले जाणारे हे उपचार टाळूचे पोषण करते, ग्राफ्टचे संरक्षण करते आणि शस्त्रक्रियेनंतरच्या पुनर्प्राप्तीस समर्थन देते. शरीराच्या नैसर्गिक वाढीच्या घटकांचे अनुकरण करून, ते एक पुनरुत्पादक वातावरण तयार करते जे फॉलिकल जगण्याची प्रक्रिया सुधारते, बरे होण्यास गती देते आणि पुन्हा वाढलेल्या केसांची घनता आणि गुणवत्ता वाढवते.

■ ■ ■

## मोहरीचे औषधी महत्व



मोहरी हे प्रत्येक भारतीय घरात आढळणारे मुख्य अन्न आहे, जे अनेक पदार्थांची चव वाढवण्यासाठी किंवा विविध प्रकारचे पदार्थ तयार करण्यासाठी वापरले जाते. मोहरी काळ्या, पांढऱ्या आणि हलक्या तपकिरी रंगात येतात. प्रत्येकाची चव वेगळी असते. मोहरीच्या दाण्यामध्ये अनेक पोषक घटक असतात.

या लहान बियांमध्ये भरपूर जीवनसत्त्वे असतात. ते कॅल्शियम, सेलेनियम, लोह, फॉस्फरस, मॅग्नेशियम आणि मॅंगनीज सारख्या खनिजांनी समृद्ध आहेत. याव्यतिरिक्त, त्यात बी जीवनसत्त्वे तसेच प्रथिने आणि फायबर असतात.मोहरीचे अनेक फायदे आहेत. त्यामध्ये फायटोन्यूट्रिएंट्स आणि अँटिऑक्सिडंट्स असतात जे तुमच्या शरीराला कर्करोगापासून वाचवतात. ते त्यांच्या आरोग्य फायद्यांसाठी ओळखले जातात कारण ते कमी कॅलरी आणि भरपूर पोषण आहेत. त्यात अनेक बॅक्टेरियाच्या वाढीस प्रतिबंध करणारा पदार्थ आणि जंतुनाशक गुणधर्म आहेत. मोहरीच्या दाण्यांमध्ये ग्लुकोसिनोलेट्स आणि मायरोसिनेज सारखे संयुगे असतात. जे शरीरात कर्करोगास कारणीभूत असलेल्या पेशींच्या वाढीस प्रतिबंध करतात.

ह्युमन अँड एक्सपेरिमेंटल टॉक्सिकोलॉजी जर्नलमध्ये प्रकाशित केलेल्या अभ्यासानुसार, या लहान बियांमध्ये केमोप्रिव्हेंटिव्ह क्षमता असू शकते आणि ते कार्सिनोजेनच्या प्रभावापासून संरक्षण करतात.जर तुम्हाला डोकेदुखी किंवा मायग्रेनची समस्या असेल तर त्याच्या उपचारासाठी मोहरीचे दाणे देखील प्रभावी आहेत. या बियांमध्ये मॅग्नेशियम भरपूर प्रमाणात असते जे आपल्या मज्जासंस्थेला आराम देते आणि आपल्या शरीराच्या कोणत्याही भागामध्ये वेदना किंवा तणावापासून आराम देते. मोहरी ही तुमच्या पचनसंस्थेसाठी उत्तम अन्न आहे. जर तुम्ही अपचनाच्या समस्येने त्रस्त असाल तर मोहरीच्या दाण्याने त्यापासून सुटका मिळू शकते. या बियांमध्ये भरपूर प्रमाणात फायबर असते. ज्यामुळे आतड्यांची हालचाल सुधारण्यास मदत होते आणि शरीराची पचनशक्ती वाढते. त्यामुळे बद्धकोष्ठता, गॅस आणि अपचनाचा त्रास होत नाही. ■ ■

संकलन - संयोजन
सुबोध रणशेवरे
९८३३१४६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com

# स्कॉटलंडमध्येही गणेशोत्सवाची धूम



■ महासागर प्रतिनिधी, अकोला, दि. ८ : महाराष्ट्रात गणेशोत्सवाची मोठी परंपरा लाभली आहे. यावर्षी राज्य महोत्सव म्हणून गणेशोत्सव साजरा करण्यात आला. महाराष्ट्र व संपूर्ण भारत देशासह आता सातासमुद्रापार देखील गणपती बाप्पा मोरयाचा जयघोष करण्यात आला.

स्कॉटलंड देशातील अबर्डीन शहरात मराठी मंडळ अबर्डीन, नादब्रह्म ढोल समूह आणि अबर्डीन हिंदू मंदिर ट्रस्टच्या संयुक्त विद्यमाने पाच दिवसांचा रंगतदार गणेशोत्सव सोहळा साजरा करण्यात आला. या उत्सवामुळे शहरात उत्साह आणि एकोप्याचे वातावरण निर्माण झाले. हा खरोखरच सर्वांसाठी आनंदाचा उत्सव होता, असे मूळचे अकोलेकर राजेश वानखडे यांनी सांगितले.

अकोल्यातील रेणुका नगर रहिवासी राजेश वानखडे हे स्कॉटलंड देशातील अबर्डीन शहरात स्थायिक झाले आहेत. अबर्डीन येथे गणेशोत्सवाची सुरुवात पर्यावरणपूरक मातीच्या गणेशमूर्ती बनविण्याच्या कार्यशाळेने करण्यात आली. यामध्ये येथील भारतीय कुटुंबांसह लहान मुलांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला.

त्यानंतर गणरायाची स्थापना करून दररोज मनोभावे पूजा व आरती करण्यात आली. त्यामुळे अबर्डीन शहरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले. गणेशोत्सवानिमित्त सांस्कृतिक कार्यक्रमांची ही मेजवानी लाभली. त्यामध्ये भारतीयांसह स्थानिक कलाकारांनी नृत्य, संगीत आणि विविध कलाप्रकार सादर केले. त्यामुळे रसिक मंत्रमुग्ध झाले होते.

स्कॉटलंडच्या अबर्डीन शहरात ऐतिहासिक पहिलीच भव्य गणपतीची मिरवणूक या गणेशोत्सवात काढण्यात आली. यासाठी खास पुणे येथून ढोल, ताशे व इतर मिरवणूक साहित्य मागविण्यात आले होते. ढोल, ताशा, झांजच्या गजरात तेजस्वी ध्वजांसह शेकडो स्थानिक नागरिकांसह भारतीय सहभागी झाले होते. गणरायाच्या भव्य-दिव्य मिरवणुकीमुळे संपूर्ण परिसर दुमदुमला होता. गणपती अथर्वशीर्ष आवर्तन आणि पारंपरिक विसर्जन सोहळ्यानंतर स्कॉटलंडमधील गणेशोत्सवाचा समारोप झाला. या गणेशोत्सव सोहळ्याला अबर्डीन शहर महापालिका आणि स्कॉटलंड पोलिसांचे विशेष सहकार्य लाभल्याचे आयोजकांनी सांगितले. स्कॉटलंडमध्ये भारतीयांनी महाराष्ट्राची संस्कृती व परंपरा जोपासत गणेशोत्सव श्रद्धेने साजरा केला.

विविध पार्श्वभूमीचे लोक एकत्र येऊन गणेशोत्सवाचा आनंद अनुभवला. सातासमुद्रपलीकडे आपली गणेशोत्सवाची परंपरा जोपासतांना सर्वांना खूप आनंद व समाधान वाटले. यासाठी अबर्डीनमधील नागरिकांनी दाखवलेल्या प्रेम, आपुलकी आणि जिव्हाळा हा कौतुकास्पद होता, असे राजेश वानखडे म्हणाले.

नागपूर
महासागर
वृत्तसागर
■ मंगळवार, दि. ९, सप्टेंबर २०२५ ■


# दुकानातून दीड लाखाची रोकड चोरी

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ८ :

अज्ञात आरोपीने ग्रीलच्या खिडकीतून दुकानात प्रवेश करीत रोख दीड लाखासह एकूण १ लाख ५२ हजार ५०० रुपये किंमतीचा मुद्देमाल चोरून नेला. ही घटना तहसील पोलिस ठाण्यांतर्गत घडली. या प्रकरणी पोलिसांनी विजयकुमार श्याममनोहर गुप्ता (५४) रा. स्वामी नारायण अपार्टमेंट, नंदनवनच्या तक्रारीवरून गुन्हा नोंदविला आहे. या घटनेने परिसरातील व्यवसायिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. गुप्ता यांचे सीए मार्गावर गांधी पुतळा चौकात गुप्ताजी कृष्णाजी नावाने हार्डवेअर व प्लायवूड विक्रीचे दुकान आहे. गत शनिवारी रात्री ८ वाजताच्या सुमारास गुप्ता दुकान बंद करून घरी गेले होते. तत्पूर्वी त्यांनी व्यवसायाची दीड लाखाची रोकड दुकानाच्या ड्राव्हरमध्ये ठेवली होती. दुकानात पूजा असल्याने त्यांनी ती रोकड बँकेत जमा केली नव्हती. मध्यरात्रीला अज्ञात आरोपीने दुकानामागील ग्रीलच्या खिडकीतून आत प्रवेश केला. ड्राव्हरमध्ये ठेवलेली रोकड आणि मोबाईल फोन असा एकूण १,५२,५०० रुपये किंमतीचा मुद्देमाल चोरून नेला. दुसऱ्या दिवशी सकाळी ९.३० वाजताच्या सुमारास गुप्ता यांनी दुकान उघडले असता चोरी झाल्याचे उघडकीस आले. त्यांनी घटनेची तक्रार पोलिसात केली. पोलिसांनी अज्ञात आरोपीवर गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे. पोलिस परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची फुटेज तपासून आरोपीचा शोध लावण्याचा प्रयत्न करीत आहेत.

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत नवीन नागपूरच्या विकासासाठी

# एनएमआरडीए, एनबीसीसी आणि हुडको यांच्यात करार

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ८ :

महाराष्ट्रातील भावी आंतरराष्ट्रीय व्यवसाय आणि वित्तीय केंद्र म्हणून "नवीन नागपूर" या भव्य प्रकल्पाला गती मिळाली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत आज नागपूर महानगर क्षेत्र विकास प्राधिकरण आणि केंद्र सरकारच्या नवरत्न दर्जाच्या दोन सार्वजनिक कंपन्या - एनबीसीसी (इंडिया) लि. आणि हु डको यांच्यात दोन महत्त्वपूर्ण सामंजस्य करार करण्यात आले. या करारांमुळे नवीन नागपूरच्या जागतिक दर्जाच्या विकासाला चालना मिळणार असून, नागपूरचा आर्थिक व व्यावसायिक चेहरा बदलण्याची मोठी संधी उपलब्ध झाली आहे.



एनएमआरडीए आणि एनबीसीसी (इंडिया) लि. यांच्यात झालेल्या करारानुसार नवीन नागपूर प्रकल्पातील १,७१० एकरांपैकी १,००० एकरांवर विकासाचे काम हाती घेतले जाणार आहे. उर्वरित ७१० एकर भावी विस्तारासाठी राखीव ठेवण्यात आले आहेत.

यात समाविष्ट होणाऱ्या सुविधा - समाकलित भूमिगत उपयुक्तता टनेल्स, डिस्ट्रिक्ट कूलिंग सिस्टम, स्वयंचलित कचरा संकलन व वर्गीकरण प्रकल्प, स्टार्ट-अप्स, MSME, आयटी कंपन्या, व्यावसायिक केंद्रे, तसेच निवासी व मिश्र वापर प्रकल्प एनबीसीसीला या प्रकल्पासाठी प्रकल्प व्यवस्थापन व सल्लागार संस्था म्हणून नेमण्यात आले आहे. पुढील १५ वर्षांत तीन टप्प्यांत हा प्रकल्प राबवला जाणार आहे. यासाठी एक सक्षम समिती स्थापन करण्यात येईल, ज्याचे अध्यक्ष एनएमआरडीएचे आयुक्त असतील.

दुसरा महत्त्वाचा करार एनएमआरडीए आणि हडको यांच्यात करण्यात आला. या कराराअंतर्गत हडको ११,३०० कोटी रुपये इतका निधी उपलब्ध करून देणार आहे. यामध्ये ६,५०० कोटी रुपये नवीन नागपूरसाठी भूसंपादन, व्यावसायिक विकास आणि पायाभूत सुविधा, ४,८०० कोटी रुपये नागपूर बाह्य वळण रस्त्यासाठी भूसंपादन या निधीमुळे "नवीन नागपूर" प्रकल्पाची संकल्पना आणि "नागपूर बाह्य वळण रस्ता" यांसारखे पायाभूत प्रकल्प वेगाने आकार घेतील. या भागीदारीत कार्यशाळा, प्रशिक्षण व क्षमतावृद्धी कार्यक्रमांचाही समावेश असेल.

या वेळी एनबीसीसी (इंडिया) लि. चे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक के. पी. महादेवस्वामी, हडकोचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक संजय कुलश्रेष्ठ, तसेच एनएमआरडीएचे आयुक्त संजय मीणा (आयएएस) आणि इतर मान्यवर उपस्थित होते. या प्रकल्पांना महाराष्ट्र मंत्रिमंडळाने ३ सप्टेंबर २०२५ रोजी मान्यता दिली आहे. त्यामुळे आता प्रत्यक्ष अंमलबजावणीस गती मिळणार आहे. या दोन्ही सामंजस्य करारांमुळे "नवीन नागपूर" हा देशातील एक अत्याधुनिक आणि जागतिक पातळीवरील वित्तीय व व्यवसायिक केंद्र बनण्याच्या दिशेने निर्णायक पाऊल टाकले गेले आहे. नागपूरच्या आर्थिक नकाशावर हे प्रकल्प "गेम चेंजर" ठरणार आहे.

# ऑटोमोटिव्ह चौकातील एटीएम फोडण्याचा प्रयत्न

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ८ :

एटीएममध्ये चोरी करण्याच्या उद्देशाने तो आत शिरला. एटीएम फोडून नोटा काढण्याचा प्रयत्न करीत असतानाच मोठ्याने सायरन वाजला. हाकेच्या अंतरावर वाहतूक पोलिसांची नाकाबंदी सुरू होती. सायरनचा आवाज ऐकून पोलिस धावले अन् त्याला पकडून कपीलनगर पोलिसांच्या ताब्यात दिले. चेतन उईके (२५) असे अटकेतील आरोपीचे नाव आहे. ही घटना मध्यरात्री १ ते १.३० वाजताच्या सुमारास ऑटोमोटीव्ह चौकात घडली.

चेतन हा मुळचा समुद्रपूर, वर्धा येथील रहिवासी आहे. त्याची बहीण हिंगणा परिसरात राहते. काही महिन्यांपूर्वी तो बहिणीच्या घरी आला. तो एका कंपनीत कामाला आहे. रविवारच्या रात्री तो ऑटोरीक्षाने ऑटोमोटीव्ह चौकात आला. त्याच परिसरात एसबीआयचे एक एटीएम आहे. तो एटीएममध्ये शिरला. मशीनशी छेडछाड करून नोटा काढण्याच्या प्रयत्नात असतानाच एटीएमच्या सुरक्षेसाठी लावलेले सायरण वाजले. मोठ्याने आवाज होऊ लागला. आवाज बंद होत नसल्याने चेतन घाबरला. काय करावे त्याला सूचेनासे झाले. त्यामुळे तो एटीएमध्येच उभा होता. दरम्यान हाकेच्या अंतरावर वाहतूक पोलिसांची नाकाबंदी सुरू होती. पोलिस हवालदार मुस्तफा शेख यांनी एटीएमकडे धाव घेतली. आरोपी चेतनला ताब्यात घेऊन विचारपूस केली. कपिलनगर पोलिसांना माहिती देण्यात आली. उपनिरीक्षक दीपक पाटील घटनास्थळी पोहोचले. चेतनला ठाण्यात आणले. त्याची सखोल चौकशी करून गुन्हा दाखल केला. एटीएम फोडण्यासाठी जे साहित्य लागते, ते चेतन जवळ नव्हते. त्यामुळे तो खरच एटीएम फोडण्यासाठी आला होता की दारूच्या नशेत त्याने हा प्रयत्न केला. त्याच्यासोबत आणखी कोणी होता काय? तो कामठी मार्गाकडे कशासाठी आला. या सर्व प्रश्नांची उत्तरे पोलिस कोठडी दरम्यान मिळतील. ही कारवाई वरिष्ट पोलिस निरीक्षक सतीश आडे यांच्या मार्गदर्शनात करण्यात आली.

## वॉटर पार्कवरील जीएसटी दर १८% वरून ५% करण्यांत यावे : चंद्रपाल चौकसे



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ८ :

महाराष्ट्र राज्यातील पर्यटन क्षेत्र हा रोजगार निर्मिती, ग्रामीण विकास व आर्थिक वृध्दी यांचा महत्वाचा स्त्रोत आहे. त्यातही वॉटर पार्क, मनोरंजन केंद्रे व कौटुंबिक पर्यटन स्थळे यांना विशेष महत्व प्राप्त झाले आहे. परंतु सध्या वॉटर पार्क व तत्सम मनोरंजन उपक्रमांवर जीएसटी दर १८% आकारला जात आहे. या उच्च दरामुळे सामान्य नागरिकांना हे उपक्रम परवडत नाहीत तसेच वॉटर पार्क चालवणाऱ्या उद्योजकांनाही तोटा सहन करावा लागत आहे. परिणामी रोजगार निर्मिती व पर्यटन वाढीला अडथळे येत आहेत.

वॉटर पार्क व तत्सम पर्यटन उपक्रमांवरील जीएसटी दर १८% वरून ५% करण्यांत यावा. या निर्णयामुळे कुटुंबासाठी पर्यटन सुलभ होईल, पर्यटन व्यवसायाला चालना मिळेल व मोठ्या प्रमाणांवर रोजगार निर्मिती होईल. ग्रामीण व शहरी भागातील पर्यटन स्थळांना नवे बळ मिळेल.

आपण या महत्वाच्या विषयाच्या गांभीर्याने विचार करून वॉटर पार्कवरील जीएसटी दर कमी करण्यांसाठी केंद्र सरकारकडे विशेष पाठपुरावा करावा असे आवाहन पत्रकार परिषदेत अध्यक्ष चंद्रपाल चौकसे यांनी त्यावेळी उपस्थित उपाध्यक्ष धर्माजी रमानी, सचिव डॉ. राजेंद्र पडोळे, कोषाध्यक्ष नरेंद्र वाघ, दिवेश भारती, अनिल यांनी सांगितले आहे.

## अट्टल घरफोड्या गुन्हे शाखेच्या जाळयात

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ८ :

पोलिस लाईन टाकळीच्या समाधाननगरात दिवसाढवळ्या झालेल्या घरफोडीचा गुन्हे शाखा युनिट २ च्या पथकाने छडा लावून आरोपीला अटक केली. चौकशीत त्याच्याकडून सदर ठाण्यांतर्गत दोन दिवसांपूर्वी झालेला घरफोडीचा गुन्हाही उघडकीस आला. पोलिसांनी आरोपीकडून ७ लाख ०४ हजार ८८२ रुपये किंमतीचा चोरीचा माल जप्त केला. मोहम्मद ओसामा रफीक पाटका (३३) रा. स्वागतनगर, गिट्टीखदान असे अटकेतील आरोपीचे नाव आहे. गिट्टीखदान पोलिसांनी संध्या जितेंद्र ठाकूर (४०) रा. समाधाननगरच्या तक्रारीवरून गुन्हा नोंदविला होता.
समाधाननगरात ठाकूर कुटुंबाची तीनमजली इमारत आहे. संध्या व त्यांचे कुटुंब पहिल्या माळ्यावर राहतात, तर त्यांचे सासू-सासरे तळमजल्यावर राहतात. शुक्रवारी सायंकाळी ४.३० वाजताच्या सुमारास संध्या दाराचा कडीकोंडा लावून सासू-सासऱ्याशी बोलण्यासाठी तळमजल्यावर गेल्या होत्या.

या दरम्यान अज्ञात आरोपीने दाराचा कडीकोंडा उघडून त्यांच्या घरात प्रवेश केला. बेडरूमच्या कपाटाचे लॉकर उघडून त्यातील ५० हजारांची रोकड आणि १४२ ग्रॅम सोन्याचे दागिने असा अंदाजे ६ लाख १८ हजार रुपये किंमतीचा माल चोरी केला.

काही तासानंतर संध्या घरी परतल्या असता चोरी झाल्याचे समजले. त्यांच्या तक्रारीवरून गिट्टीखदान पोलिसांनी अज्ञात आरोपीवर गुन्हा नोंदविला होता.
या गुन्ह्याचा समांतर तपास गुन्हे शाखा युनिट २ चे पथकही करीत होते. परिसर आणि आसपासच्या भागातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची फुटेज तपासली असता आरोपीचा सुगावा लागला. पोलिसांनी ओसामाला ताब्यात घेऊन विचारपूस केली असता त्याने गुन्ह्याची कबुली दिली. पोलिसांनी त्याला अटक करून सखोल चौकशी केली असता ओसामाने सदर ठाण्यांतर्गत आझाद चौकातही एका घराचे कुलूप तोडल्याचे माहिती दिली.

## अपघातात पती ठार, पत्नी जखमी

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. ८ :

रस्ता ओलांडत असताना भरधाव आलेल्या मोटारसायकलस्वाराने पती-पत्नीला जबर धडक दिली. यात दोघेही गंभीर जखमी झाले. त्यांना उपचारार्थ रुग्णालयात नेले असता डॉक्टरांनी पतीला मृत घोषित केले. अपघाताची ही घटना कोराडी ठाण्यांतर्गत घडली. माणिक छोटेलाल मुछावड (६५) रा. चनकापूर, खापरखेडा असे मृताचे नाव आहे. त्यांची पत्नी लक्ष्मी मुछावड (५५) यांच्यावर मेयो रुग्णालयात उपचार सुरू आहेत.
गत २९ ऑगस्टच्या दुपारी माणिक हे पत्नी लक्ष्मी यांच्यासोबत खरेदी करण्यासाठी सराफाच्या दुकानात जात होते. सावनेर मार्गावर शाहू रेस्टॉरेंटसमोरून रस्ता ओलांडत असताना भरधाव असलेल्या मोटारसायकल क्र. एमएच-१६/बीएस-७९१३ च्या चालकाने दोघांनाही जबर धडक दिली.
माणिक आणि लक्ष्मी दोघेही गंभीर जखमी झाले. स्थानिक नागरिक मदतीला धावले. घटनेची माहिती पोलिसांना देण्यात आली. माणिक आणि लक्ष्मी यांना उपचारार्थ मेयो रुग्णालयात रवाना करण्यात आले. डॉक्टरांनी तपासून माणिक यांना मृत घोषित केले. लक्ष्मी यांच्यावर उपचार सुरू आहेत. पोलिसांनी माणिक यांचा मुलगा राहुलच्या तक्रारीवरून आरोपी मोटारसायकलस्वार राकेश तुकाराम मल्लेवार (२७) रा. गोंदियाविरुद्ध गुन्हा नोंदविला आहे.

# राज्यभरात गणरायाला निरोप

## नागपुरात मस्कऱ्या गणपतीचे आगमन

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ८ :

नागपूर, मुंबईसह राज्यभरात श्री गणेशोत्सव उत्साहात साजरा केला गेला. राज्यातील बहुतांश भागात घरगुती गणपतींच्या मुर्तीचे विसर्जन करून भाविकांनी आपल्या लाडक्या बाप्पांना निरोप दिला आहे. तर अनेत सार्वजनिक गणेशोस्तव मंडळाकडूनही बाप्पांचे विसर्जन करण्यात आले. हा उत्सव संपन्न झाला असतांनाच नागपुरात आता मस्कऱ्या (हडपक्या) गणपतींचे आगमन ९ सप्टेंबरला होणार आहे. या गणपती उत्सवाचा इतिहास आपण जाणून घेऊ या.

नागपुरात ऐतिहासीक मस्कऱ्या (हडपक्या) पारंपारिक गणपतीचे आगमन ९ सप्टेंबर २०२५ रोजी होणार असून या मूतीर्ची स्थापना १० सप्टेंबरला होणार आहे. इ. स. १७८७ मध्ये श्रीमंत राजे खंडोजी महाराज भोंसले (उर्फ चिमणाबापू) यांनी मस्कऱ्या (हडपक्या) या उत्सवाचे आयोजन केले होते. हा उत्सव सुरू करण्यामागे एक इतिहास आहे. त्यानुसार शुर लढवय्ये सरदार समशेर बहादूर श्रीमंत राजे खंडोजी महाराज भोंसले (उर्फ चिमणाबापू) हे बंगालच्या स्वारीवर होते. बंगालवर विजय मिळवून परत येत असतांना कुळाचारी गणपतीचे विसर्जण झाले होते.

दरम्यान बंगालवर विजय मिळविण्याचा आनंद साजरा करण्याकरीता मसकऱ्या (हडपक्या) गणपतीची स्थापना करून त्यात विविध नकला लावण्या, खडी गम्मत या सारख्या कार्यक्रमाचे आयोजन करुण हा आनंदोत्सव सार्वजनिक स्वरूपात साजरा करण्यात आला. कालांतराने लोकमान्य टिळकांनी कुळाचारी गणपतीला सार्वजनिक उत्सवाचे रूप दिले. श्रीमंत राजे खंडोजी महाराजांनी पितृपक्षात मस्काऱ्या (हडपक्या) गणपतीची चालू केलेली ही परंपरा आजपर्यंत कायम आहे. मस्कऱ्या (हडपक्या) उत्सवास



यावर्षी २०२५ मध्ये २३८ वर्ष पूर्ण होत आहे.

श्रीमंत राजे खंडोजी महाराजांच्या काळात या गणपतीची १८ हाताची, २१ फुटाची मुर्ती स्थापन केली जात होती. त्या अनुषंगाने तसी च मुर्ती १८ हाताची ७ फुटाची गणेशाची मूर्ती स्थापीत केली जाणार आहे. या गणपतीचे विशेष महत्व म्हणजे हा नवसाला पावणारा गणपती आहे.

यंदा भोसले घराण्यातील या गणपतीची आगमन मिरवणूक ९ सप्टेंबरला सायंकाळी ६ वाजता सी. पी. ॲन्ड बेरार महाविद्यालय, तुळशीबाग येथून सुरू होईल. ही मिरवणूक जूनियर भोसला पॅलेस, राजे प्रतापसिंह भोसले चौक (सुतिका गृह) कोतवाली पोलीस स्टेशन चौक, नरसिंग टॉकिज चौक, सिनीयर भोसला पॅलेस अशी मार्गक्रमन करेल.

# २ ऑक्टोबर रोजी धम्मचक्र प्रवर्तन दिन होणार साजरा

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ८ :

दीक्षाभूमीवर दरवर्षी होणारा धम्मचक्र प्रवर्तन दिन सोहळा अवघ्या काही दिवसांवर असताना प्रशासन व दीक्षाभूमी स्मारक समितीद्वारा आवश्यक तयारी होत नसल्यामुळे आंबेडकरी अनुयायांनी रविवारी आंदोलन केले.

यंदा धम्मचक्र प्रवर्तन दिन २ ऑक्टोबर रोजी साजरा केला जाणार आहे. मात्र, दीक्षाभूमी परिसरात सोहळ्याची तयारी सुरू झालेली नाही. यामुळे आंबेडकरी अनुयायांनी जिल्हा प्रशासनाला निवेदन देत तयारी सुरू करण्याची मागणी केली होती. जिल्हा प्रशासनाकडून प्रतिसाद न मिळाल्याने रविवारी दुपारी आंदोलनासाठी मोठ्या संख्येत अनुयायी एकत्रित झाले. संवेदनशील विषय असल्याने तसेच मागील अनुभव लक्षात घेता वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांसह मोठ्या संख्येत पोलिसांचा ताफाही तैनात करण्यात आला होता. दुपारी दोनच्या सुमारास अनुयायांची संख्या वाढत असताना स्मारक समितीच्यावतीने सचिव सुधीर फुलझेले स्वतः चर्चेसाठी पुढे आले. त्यांनी अनुयायांचे प्रश्न ऐकून घेतले आणि त्यांचे निराकरण करण्याचा प्रयत्न केला.

अनुयायांची चिंता स्वाभाविक आहे, मात्र समिती आणि प्रशासन सोहळ्याची जय्यत तयारी करत आहे, असे फुलझेले म्हणाले. समाज माध्यमांमध्ये समितीबाबत काहीही चर्चा सुरू असली तरी धम्मदीक्षा सोहळ्यासाठी समितीतील सर्व सदस्य एकत्रित आहे, असे फुलझेलेंनी उपस्थितांना सांगितले. दीक्षाभूमी स्मारक समितीच्यावतीने सुधीर फुलझेले यांनी सोहळा दरवर्षीप्रमाणे थाटातच होईल, अशी हमी दिल्यावर आंदोलन शांततेत समाप्त करण्यात आले. फुलझेले यांनी चर्चेच्या माध्यमातून उपस्थित अनुयायांच्या सर्व शंकाना दूर केले आणि धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त येणाऱ्या अनुयायांना कुठलाही त्रास होणार नाही, असे आश्वासन दिले. फुलझेले यांच्या सकारात्मक आश्वासनानंतर अनुयायांनी शांततेत आंदोलन समाप्त केले.

दीक्षाभूमीच्या सर्वांगीण विकासाकरिता स्मारक समिती प्रतिबद्ध आहे. भदंत आर्य नागार्जुन सुरई ससाई यांनी मागील अनेक वर्षे रस्त्यावर उतरून आंदोलनाचा मार्ग स्वीकारला. मात्र, आता न्यायालयाच्या मार्फत दीक्षाभूमीचा विकास प्रयत्न केला जात आहे. शासनाकडून समितीकडे कुठलाही थेट निधी येत नाही. नागपूर सुधार प्रन्यासमार्फत विकासकार्य केले जातात. आता न्यायालयीन लढ्याला गती मिळाल्याने लवकरच हा प्रश्न मार्गी लागेल, असे फुलझेले यांनी सांगितले. चर्चेदरम्यान दीक्षाभूमीच्या विकासासाठी शेजारील जागेचा मुद्दाही उपस्थित करण्यात आला. शासन जर शेजारील जागा देत नसेल तर सांगा सर्व अनुयायी जाऊन भिंत तोडून येतील, असा इशारा काही अनुयायांनी दिला. आमचा विरोध केवळ अंडरग्राउंड पार्किंगला होता, दीक्षाभूमीच्या सौंदर्यीकरणाला नाही. त्यामुळे आंबेडकरी अनुयायांच्या विरोधामुळे दीक्षाभूमीचा विकास रखडला हा अपप्रचार केला जात असल्याचा आरोप उपस्थितांनी केला. सध्या प्रकरण न्यायप्रविष्ट असल्यामुळे संयम बाळगण्याची विनंती स्मारक समितीने अनुयायांना केली.

# जिल्ह्यातील ५० गावे आणि शंभर अंगणवाड्या स्मार्ट इंटेजिलंट व्हाव्यात : पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे

### मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान कार्यशाळा आणि विविध पुरस्कारांचे वितरण

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ८ :

ग्रामीण भागाच्या विकासासाठी विविध योजनेतून अनेक बदल सुरू आहेत. स्मार्ट इंटेलिजंट व्हिलेज तयार होत आहेत. आपल्या जिल्ह्यात सातनवरी हे पहिले स्मार्ट इंटेलिजंट गाव म्हणून नावारुपास येत आहे. या धर्तीवर सर्वच गावांनी बदलासाठी सिद्ध झाले पाहिजे. पहिल्या टप्प्यात जिल्ह्यातील किमान 50 ग्रामपंचायती सातनवरी सारख्या व्हायला पाहिजेत. यासाठी विविध योजना, जिल्हा वार्षिक योजनेतून निधी उपलब्ध करून देण्यात येईल. यासोबतच अंगणवाड्या अधिक दर्जेदार झाल्या पाहिजे. वडधामना येथील अंगणवाडी आदर्शवत आहे. किमान शंभर अंगणवाड्या वडधामनासारख्या करण्याचे आवाहन पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज येथे केले.

रेशीमबाग येथील कविवर्य सुरेश भट सभागृहात जिल्हा




परिषदेमार्फत मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान जिल्हास्तरीय कार्यशाळा आणि आदर्श ग्रामपंचायत अधिकारी व आर. आर. आबा पाटील सुंदर गाव पुरस्काराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ते बोलत होते. पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते पावनगाव आणि खुसार्पार या ग्रामपंचायतींचा गौरव यावेळी करण्यात आला.

वित्त व नियोजन राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल, आ. आशिष देशमुख, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी, माजी आमदार टेकचंद सावरकर, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. कमलकिशोर फुटाणे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी विपुल जाधव, उपमुख्य कार्यकारी अधिकारी ( पंचायत) कपिलनाथ कलोडे यांच्यासह ग्रामसेवक, सरपंच, बचत गट प्रतिनिधी आदी यावेळी उपस्थित होते.

पुढील पाच वर्षांत अधिकाधिक खर्च हा शिक्षणावर खर्च होईल. जलजीवन सहित इतर पाणीपुरवठा योजना सुरळीत करायच्या आहे. प्रत्येकाला व प्रत्येक ग्राम पंचायतीमध्ये शुद्ध पिण्याचे पाणी मिळाले पाहिजे. जिल्ह्यात कोल्हापुरी बंधारे नादुरुस्त असून जलसंधारण वर करण्याची गरज आहे. नवीन बंधारे निर्मितीचा प्रस्ताव न पाठविता जुने बंधारे दुरुस्त करण्यात यावेत. पुढचा पंधरा वर्षाचां जल पुर्नभरणाचा विचार होण्याची गरज असल्याचे बावनकुळे यावेळी म्हणाले.

प्रत्येक गावाला दर्जेदार आरोग्य सेवा मिळाव्यात यासाठी जास्तीत जास्त निधी आरोग्यासाठी देऊ. आरोग्य केंद्र, उपकेंद्र, औषधी साठी निधी देण्यात येणार आहे. प्राथमिक आरोग्य केंद्र, उपकेंद्र यावरील विश्वास पुन्हा मिळवू, असा विश्वास पालकमंत्री तथा महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी व्यक्त केला.

वित्त व नियोजन राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल म्हणाले की, ग्राम स्तरावरील ग्रामपंचायत हा महत्त्वाचा घटक आहे. आता गावच्या विकासासाठी मोठा निधी उपलब्ध होत आहे. जिल्ह्याला आता उत्पादक करायचे असून गावातले बचत गट उत्पादक झाले पाहिजे. गाव जेवढा उत्पादक होईल तेवढी अर्थव्यवस्था सुधारेल. ग्रामीण भागातील नागरिकांनी ग्राहक न होता उत्पादक होण्याची गरज आहे. सर्वांनी मिळून मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानात सहभाग घ्यावा, असे आवाहन वित्त राज्यमंत्री श्री. जयस्वाल यांनी यावेळी केले.

आमदार आशिष देशमुख यांनीही यावेळी आपले विचार व्यक्त केले. प्रास्ताविक जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी यांनी केले.

# जैन सीनियर सिटीझन्सच्या गीतांच्या वारीने रसिक मंत्रमुग्ध



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ८ :

जैन समाजाच्या पर्युषण पर्व महोत्सवाच्या निमित्ताने जैन सिनिअर सिटीझन्स ग्रुपने काल श्री सैतवाळ जैन संघटन मंडळाच्या सभागृहात "गीतांची वारी.. देवाचिये द्वारी.." हा भक्ती संगीताचा बहारदार कार्यक्रम सादर करून रसिकांना मंत्रमुग्ध केले.

डॉ. रवींद्र भुसारी यांची संकल्पना असलेल्या या कार्यक्रमाची सुरुवात श्रेयांस मारवडकर यांनी सादर केलेल्या नमोकार महामंत्राने झाली. प्रकाश वाकेकर आणि संजय चवडे यांनी त्यांची साथ सांगत केली.

संघटन मंडळाच्या युवा शाखेने ३५ वर्षांपूर्वी महावीर वाणी या कार्यक्रमाची सुरुवात केली. त्यातील गायक कलावंतांनी तब्बल साडेतीन दशकानंतर एकत्र येत हा कार्यक्रम सादर केला. त्यात डॉ अंजुषा पांडवकर, डॉ. सुचित्रा भुसारी, मंजुषा फुलंबरकर, आरती महात्मे, शुभांगी वासे, स्नेहल नखाते, प्रा. प्रशांत पांडवकर, संजय नखाते, प्रवीण पांडवकर, नरेंद्र महात्मे यांनी जैन तत्वज्ञान आणि अध्यात्मावर आधारित गीते सादर केलीत.

यावेळी सैतवाळ समाजातील उत्कृष्ट नट आणि मराठी मालिकांमधील अभिनेता अविनाश वेखंडे यांचा सत्कार सैतवाळ जैन संघटन मंडळातर्फे करण्यात आला. मंडळाचे अध्यक्ष चंद्रकांत वेखंडे, कार्याध्यक्ष सुभाष मचाले आणि कार्यवाह प्रकाश मारवडकर यांच्या हस्ते शाल, श्रीफळ आणि भेटवस्तू देऊन हा सत्कार करण्यात आला. डॉ रवींद्र भुसारी यांनी संपूर्ण कार्यक्रमाचे बहारदार संचालन आणि आभार प्रदर्शन केले. जैन समाजातील रसिक श्रोते या कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आदिजीन युवक चॅरिटेबल ट्रस्टतर्फे अमृत गोरक्षणला चाराशेड देणगी

■ महासागर प्रतिनिधी
नरखेड, दि. ८ :

आदिजीन युवक चॅरिटेबल ट्रस्ट मुंबईतर्फे अमृत गोरक्षण चॅरिटेबल ट्रस्ट नरखेडला चारा शेडचा भव्य उद्घाटन सोहळा संपन्न झाला. आदिजीन युवक चॅरिटेबल ट्रस्ट मुंबईचे पदाधिकारी जयेशभाई शहा (जरीवाला), मुकेश भाई शहा, नेमचंद भाई अप्सरा, दिनेश भाई जैन तसेच डॉ.सुनील सूर्यवंशी सदस्य गोसेवा आयोग महाराष्ट्र राज्य, तसेच कश्यपजी गोरक्षक नागपूर, चंदू कडू गोरक्षक वरुड, यांनी अमृत गोरक्षण नरखेड येथे गाई साठी नेहमी करीता चारा मिळावा या उद्देशाने चार लक्ष रुपयाची देणगी देऊन चारा शेडचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी चारा शेडचे झालेले बांधकाम पाहून त्यांनी समाधान व्यक्त केले. व चारा




शेडमध्ये कॉंक्रीटचे फ्लोरिंग करण्यासाठी पुन्हा एक लाख अकरा हजार रुपयाची देणगी जाहीर करण्यात आली. जनावरांच्या पिण्याच्या पाण्याची नियमित व नेहमीसाठी पाणी व्यवस्था करण्यासाठी बोरचे काम करून देण्याचे आश्वासन दिले.

याप्रसंगी सर्व देणगीदारांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन मंडळातर्फे सत्कार करण्यात आला. गोरक्षण कार्यास दिलेली देणगी ही गोमातेसाठी असलेले प्रेम आहे. असे जयेश भाई शहा (जरीवाला) मुंबई यांनी आपल्या प्रतिक्रिया व्यक्त केल्या.

या उद्घाटन सोहळ्याला राजेश राय, सुरेश शेंद्रे, विनोद क्षीरसागर, संजय कामडे, धनराज खोडे, मोरेश्वर चरडे, सारंग दळवी, दिवाकर भांदिरगे,, ओमप्रकाश कुर्वे, वासुदेव जिचकार, प्रा.पांढरकर, विनायक रेवतकर, नंदू काळकर, चंद्रशेखर कहाते, सरला कहाते, अनिल चरडे, प्रफुल वघाळे, लीलाधर कळंबे, प्रमोद शेंद्रे, अजय नारनवरे यांची उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक सचिव पुरुषोत्तम थोटे, संचालन दीपक ढोमणे तसेच मार्गदर्शन भगवान गिरडकर, आभार रामेश्वर शेंद्रे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीते साठी मंडळाचे अध्यक्ष हरीश खंडेलवाल, कोषाध्यक्ष मुन्ना शर्मा, संजय गुरव, गुणवंत गिरडकर, योगेश टेकाडे,मनीष दुर्गे, योगेश मांडवेकर, प्रमोद नेटकर, पंकज कुरेकर, यांनी अथक परीक्षा घेतली.

# आम आदमी पक्षातर्फे ईद मिलाद उन नबी



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ८ :

आम आदमी पक्षाने गोळीबार चौकात ईद मिलाद उन नबी निमित्त मुस्लिम समुदायासाठी एक विशेष कार्यक्रम आयोजित केला होता, ज्यामध्ये मुस्लिम बांधवांच्या रॅलीचे फुलांनी स्वागत करण्यात आले. बिस्किटे, आईस्क्रीम आणि छोला पुरी वाटण्यात आली.

हा कार्यक्रम पक्षाच्या वतीने समुदायाशी एकता आणि सौहादार्चे प्रतीक आहे. आम आदमी पक्षाचे हे पाऊल सामाजिक सौहार्द आणि समुदायाप्रती त्यांची वचनबद्धता म्हणून पाहिले जात आहे. आम आदमी पक्ष महाराष्ट्राचे संघटन सचिव भूषण ढाकुलकर, नागपूर शहर महासचीव इक्बाल रिझवी, डॉ. अमेय नारनवरे, नागपूर शहर संघटन मंत्री प्रदीप पौनीकर, तेजराम मदन, विजय धकाते संजय बारापात्रे अल्का पोपटकर, जवाद अहमद, अब्दुल समद पोटियावाला, महेश बुचड हे या कार्यक्रमात विशेष उपस्थित होते.

## एटीएम फोडून ८.१२ लाखांची रोकड उडविली

**नागपूर :** चोरट्यांनी गॅस कटरच्या मदतीने एटीएम मशीन फोडून ८.१२ लाख रुपयांची रोकड उडविली. ही घटना पाटणकर चौकातील स्टेट बँक ऑफ इंडियाच्या एटीएममध्ये घडली. या घटनेने परिसरात एकच खळबळ उडाली. या प्रकरणी जरीपटका पोलिसांनी एसबीआय बँकेच्या जरीपटका शाखेचे व्यवस्थापक आसिम अख्तर खलिक अंसारी (४३) च्या तक्रारीवरून गुन्हा नोंदविला आहे. पाटणकर चौकातच एसबीआयचे एटीएम आहे. चॅनल सुपरवायझर प्रशांत पांडे यांच्याकडे या एटीएमच्या देखभालीची जबाबदारी आहे. गुरूवारी सकाळी स्थानिक नागरिक एटीएममध्ये पैसे काढण्यासाठी गेले असता मशीन तूट-फुट झालेल्या अवस्थेत दिसली. घटनेची माहिती पोलिसांना देण्यात आली. पांडेही घटनास्थळी पोहोचले. त्यांनी तपासणी केली असता मशीनमधील ८.१२ लाखांची रोकड गायब होती. एटीएममधील सीसीटीव्हीची फुटेज तपासली असता रात्री २.२६ वाजताच्या सुमारास अज्ञात चोर एटीएममध्ये घुसताना दिसले.

# दामोदर कुठे व विवेक बोरकर यांना आदर्श शिक्षक पुरस्कार

■ महासागर प्रतिनिधी
काटोल, दि. ८ :

आदर्श शिक्षक पुरस्कार शिक्षकांच्या क्षेत्रातील सर्वांचे एक मानला जातो हा आदर्श शिक्षक पुरस्कार किंवा एक पारितोषिक नसून तो समाजातील एक शैक्षणिक रत्नाच्या कठोर परिश्रमाच्या आणि त्याच्या मान्यता प्राप्त गौरव आहे. शिक्षक दिनाचे अवचित्य साधून जिल्हा परिषद नागपूर तर्फे उत्कृष्ट कार्य करणारे जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कोहळा येथील कार्यरत असलेले दामोदर कुठे व विवेक बोरकर



यांना 5 सप्टेंबर रोजी आदर्श शिक्षक पुरस्काराने गौरविण्यात आले. त्याचप्रमाणे याज्ञवल्क्य जिचकार यांनी दोन्ही शिक्षकांच्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल कौतुक करून त्यांचे अभिनंदन केले. अॅड तेजस किने, अजय ठाकरे, राजू धवड, घनश्याम भडांगे, प्रवीण राऊत, रवींद्र काकडे, इतर उपस्थित होते.

# साई इंटरनॅशनल स्कूल रामटेक येथे पोषण सप्ताह साजरा



■ महासागर प्रतिनिधी
रामटेक, दि. ८ :

साई इंटरनॅशनल स्कूल, परसोडा, रामटेक येथील विद्यार्थी आणि कर्मचाऱ्यांनी यूएसओ क्लबच्या बॅनरखाली पोषण सप्ताहाच्या विविध उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेतला. त्यांनी चार्ट आणि पोस्टर्स तयार केले आणि निरोगी जीवनशैलीसाठी चांगल्या अन्न सवयींचे महत्त्व अधोरेखित केले. सॅलड बनवणे आणि सॅलड सजावट हे पोषण सप्ताहाचे मुख्य आकर्षण होते. पोषण सप्ताहाच्या भव्य यशासाठी विद्यार्थी आणि त्यांच्या पालकांच्या प्रयत्नांचे प्राचार्य राजेंद्र मिश्रा यांनी कौतुक केले.

# घरखर्च भागविण्यासाठी तिने उचलले शस्त्र

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ८ :

तोंडाला फडके बांधून आलेल्या २८ वर्षीय महिलेने एका वृद्ध महिलेच्या गळ्याला चाकू लावला. मारण्याची धमकी देऊन त्यांचे मंगळसूत्र हिसकावले आणि पसार झाली. मात्र, बेलतरोडी पोलिसांनी केवळ १२ तासांत गुन्ह्याचा छडा लावून लुटपाट करणाऱ्या महिलेला ताब्यात घेतले. चौकशीत घरखर्च भागविण्यासाठी शस्त्र उचलल्याचे तिने पोलिसांना सांगितले. न्यायालयाने तिची कारागृहात रवानगी केली.

शिवणगाव पुनर्वसन, बेलतरोडी येथील रहिवासी फिर्यादी सुमन जरोंडे (६५) ह्या शनिवारी ४.३० वाजताच्या सुमारास घरासमोर फेरफटका मारत होत्या. दरम्यान चेहऱ्यावर फडके बांधून असलेली महिला त्यांच्या जवळ थांबली. पत्ता विचारण्याचा बहाना त्यांच्याशी बोलत होती. अचानक जवळील चाकू काढून तिने सुमन यांच्या गळ्याला लावला. जिवे मारण्याची भीती दाखविली. चाकू पाहताच वृद्ध महिलेच्या बोबडी वळली. आरोपी महिलेनी मंगळसूत्र मागितले. परंतु गळ्यातून मंगळसूत्र निघत नसल्याने आरोपी महिलेने मंगळसूत्र जबरदस्तीने हिसकावून घेतले आणि घटनास्थळावरून पसार झाली. सुमन यांनी आरडाओरड केली असता जवळपासच्या महिला गोळा झाल्या. त्यानंतर त्यांनी पोलिस स्टेशन गाठून तक्रार दिली. घटनेची गंभीरता लक्षात घेता वरिष्ठ पोलिस निरीक्षक मुकुंद कवाडे यांनी गुन्हा दाखल करण्याचे निर्देश दिले. तसेच एका पथकाला सीसीटीव्ही फुटेज तपासण्यास सांगितले. मात्र, महिलेचा चेहरा फडक्याने झाकलेला असल्याने फुटेजमध्ये महिला दिसूनही तिची ओळख पटत नव्हती. पोलिसांनी कॅमेरे झूम करुन मिळत्या जुळत्या महिलेचा शोध घेतला आणि १२ तासांच्या आत तिला शोधून काढले. मात्र, हिच आरोपी असेल, याची खात्री नव्हती. पोलिस पथक संशयाच्या आधारावर तिच्या घरपर्यंत गेले. मात्र, आरोपी महिलेने स्पष्ट नकार दिला. पोलिसांनी शक्कल लढवताच तिने गुन्ह्याची कबुली दिली. पोलिसांनी तिच्याकडून मंगळसूत्र आणि चाकूही जप्त केला. ही कारवाई वपोनि मुकुंद कवाडे यांच्या मार्गदर्शनात एपीआय रामेश्वर खांडूरे, उपनिरीक्षक किशोर माधवकर, रविकांत भदाने, पोहवा सुहास शगणे, सुमेंद्र बोपचे, विवेक श्रीपाद, योगेश कदम, प्रमोद सरपटे, एएसआय राजेंद्र महाजन यांनी केली.

आरोपी महिला मुळची बालाघाटची तर तिचा पती भंडाऱ्याचा आहे. एका मिस कॉलवरून त्यांची ओळख झाली.

ओळखीचे रुपांतर प्रेमात व्हायला वेळ लागला नाही. दहा वर्षापूर्वी त्यांचा प्रेम विवाह झाला. त्यांना ९ वर्षांची एक मुलगी आहे. ते नागपुरात राहायला आले. पती खाजगी कारवर चालक आहे. त्याला १२ ते १५ हजार रुपये मिळतात. ७ हजार रुपये घरभाड्यात जातात. उर्वरित पैशांत घरखर्च, औषधोपचार, मुलीचे शिक्षण शक्य नाही. आर्थिक विवंचना वाढतच होती. मार्ग निघत नसल्यामुळे तिने शस्त्र उचलले, परंतू पहिल्याच प्रयत्नात पोलिसांच्या जाळ्यात अडकली.

# प्रभाग २८ च्या रचनेवर माजी नगरसेवकाचा आक्षेप

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ८ :

नुकतीच नागपूर महानगरपालिकेच्या प्रभागाची रचना जाहीर करण्यात आली व त्यावर आक्षेप सुद्धा मागविण्यात येत आहे. त्यानुसार प्रभाग क्रमांक 28 चे माजी नगरसेवक व नागपूर महानगरपालिकेचे माजी स्थायी समिती अध्यक्ष पिंटू झलके यांनी प्रभागाच्या रचनेवर आक्षेप नोंदविलेला आहे.

त्यांचा पहिला आक्षेप मौजा दिघोरी व मौजा वाठोडा या दोन्ही गावांची हद्द वेगळी करण्यात आली असून मौजा वाठोडा हा पूर्व नागपूर विधानसभा क्षेत्रातील भाग आहे. दुसऱ्या आक्षेपानुसार मौजा वाठोडा येथील ऑरेंज नगर येथील ५० घरांचा भाग म्हणजेच साधारणत २०० मतदार प्रभाग २८ मध्ये टाकण्यात आलेले आहे व तिसऱ्या आक्षेपानुसार मौजा बहादुरा या ग्रामीण भागातील काही भाग म. न. पा. हद्दीत मौजा दिघोरी अंतर्गत प्रभाग क्र.२८ मध्ये समाविष्ट करण्यात आला आहे.

त्यांच्या अनुसार मौजा वाठोडा येथील ऑरेंज नगर येथील ५० घरांचा व मौजा बहादुरा या ग्रामीण भागातील जोडलेला काही भाग प्रभाग क्र. २८ च्या प्रभाग रचनेनुसार मधून कमी करावा अशी विनंती त्यांनी निवेदनाद्वारे केलेली आहे. आता निवडणूक अधिकारी यावर काय निर्णय घेतात यावर सर्व नागरिकांचे लक्ष लागलेले आहेत. प्रभाग क्रमांक 28 मध्ये रमना मारोती परिसर, दिघोरी परिसर, प्रगती कॉलनी, डायमंड नगर, सहकार नगर, खरबी रोड कडील काही भाग, पवनसुत नगर, चिटणीस नगर व इतर वस्त्यांचा समावेश होतो.

# भरपूर उत्साहात साजरा झाला गणेशोत्सव

■ महासागर प्रतिनिधी
हिंगणा, दि. ८ :

रॉयल गायत्री पार्क-2 येथे निवासरत असलेले पत्रकार प्रफुल्ल पाटणकर यांच्या निवासस्थानी गणपती बाप्पाची स्थापना करून अनंत चतुर्दशी पर्यंत 10 दिवस भक्ति भावाने व उत्साहात उत्सव साजरा करण्यात आला.

दररोज सकाळी व संध्याकाळी सामूहिक आरती होत होती. या आरतीसाठी सोसायटीतील रहिवासी मोठ्या संख्येने उपस्थित राहात होते. 5 सप्टेंबर, शुक्रवार रोजी विशेष हवन-पूजन तसेच संध्याकाळी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी सोसायटीतील रहिवाशांसह परिसरातील



नागरिकांनीही मोठ्या संख्येने उपस्थित राहून प्रसादाचा लाभ घेतला.

उत्सवाच्या यशस्वी आयोजनात प्रफुल्ल जयसिंगपुरे, प्रीती जयसिंगपुरे, पंकज गौरदिपे, स्नेहा गौरदिपे, ज्ञानेश्वर गौतम, प्रणाली गौतम, प्रिया शाह, मोना, रोशन पाटणकर, प्रीती पाटणकर, ज्योती पाटणकर यांच्यासह लहानग्या दित्या, परी, शौर्य, इनाया, राम आणि नायरा यांचा विशेष सहभाग होता.

## महिलेचा बँकेला ५.१० लाखांचा चुना

**नागपूर :** प्राथमिक आरोग्य केंद्रात काम करीत असल्याचे बनावट कागदपत्र देऊन एका महिलेने बँकेतून ५ लाख १० हजार रुपयांचे कर्ज घेतले आणि परतफेड न करता बँकेला चुना लावला. या प्रकरणी पोलिसांनी कोटक महिंद्रा बँकेच्या शंकरनगर शाखेचे कलेक्शन मॅनेजर विवेक मुळे (३३) यांच्या तक्रारीवरून गुन्हा नोंदविला आहे. मयूरी सुधीर ठाकरे (४२) रा. एकतानगर, बुटीबोरी असे आरोपी महिलेचे नाव आहे.

मयूरीने जुलै २०२४ मध्ये कोटक महिंद्रा बँकेच्या सोमलवाडा शाखेतून ६.५० लाख रुपयांचे कर्ज घेतले होते. ही रक्कम ५ वर्षात व्याजासह परत करायची होती. मयूरीने काही महिने नियमित कर्जाचे हफ्ते भरले, मात्र नंतर बँकेचे हफ्ते थकले. बँकेने आपली कार्यवाही सुरू केली.

मयूरीने दिलेल्या कागदपत्रांच्या आधारावर वसूली पथक घरी पोहोचली असता मयूरी तेथे राहातच नसल्याचे समजले. तिने बँकेतून कर्ज घेण्यासाठी हिंगणाच्या टाकळघाट येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात कनिष्ठ लिपिक असल्याचे कागदपत्र दिले होते. बँक कर्मचारी पीएचसीमध्ये पोहोचले असता या नावाची कोणतीच बाई तेथे काम करीत नसल्याचे समजले. पोलिसांनी फसवणुकीच्या विविध कलमान्वये गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.

# डॉ.अनिता टेकाडे यांना लालबहादूर शास्त्री राष्ट्रीय स्त्री शक्ती पुरस्कार

■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. ८ :

महालक्ष्मी जगदंबा महाविद्यालयाच्या प्राचार्या व बहुविध सामाजिक, शैक्षणिक कार्यकर्त्या डॉ. अनिता उदय टेकाडे यांना लालबहादूर शास्त्री राष्ट्रीय स्त्री शक्ती पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. २५ व्या राष्ट्रीय स्त्री शक्ती अवॉर्ड कार्यक्रमासाठी देशभरातून तब्बल १०३९ अर्ज प्राप्त झाले होते. त्यातील विविध क्षेत्रांतील उल्लेखनीय कामगिरी करणाना ४१ महिलांची निवड करण्यात आली. त्यामध्ये द्रुगधामना उदय फिजिओथेरीपी मेडीकल कॉलेजच्या संचालिका डॉ. अनिता टेकाडे यांचा सन्मान झाला.



हा पुरस्कार दिनांक ३० ऑगस्ट २०२५ रोजी कॉन्स्टिट्यूशन क्लब ऑफ इंडिया, नवी दिल्ली येथे झालेल्या भव्य सोहळ्यात भारताचे माजी पंतप्रधान स्व. लालबहादूर शास्त्री यांचे पुत्र सुनील शास्त्री यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

कार्यक्रमाला खासदार अजेंद लोधी, खासदार ममता महंता, दिल्ली विधानसभा अध्यक्ष विजेंद्र गुप्ता, माजी मंत्री मंगतराम सिंघल, आमदार राजकुमार भाटिया, पोलीस कमिशनर संजय पटजोशी उपस्थित होते.डॉ. अनिता टेकाडे या महालक्ष्मी जगदंबा महाविद्यालय, भगिनी मंडळ सिताबर्डी, नागपूर तसेच श्री साई ताज पॉलिटेक्निक हगधामना, उदय फिजिओथेरपी मेडिकल कॉलेज वाडी, पार्श्वनाथ पब्लिक स्कूल वाडी यांच्या संचालिका आहेत. शिक्षण, समाजसेवा, कला-संस्कृती, वृक्षारोपण आणि महिला सबलीकरण अशा विविध क्षेत्रांत त्यांनी केलेल्या उल्लेखनीय योगदानामुळे त्यांना हा राष्ट्रीय सन्मान मिळाला.या प्रसंगी बोलताना सुनील शास्त्री यांनी जय जवान, जय किसान, जय इंसान या नवीन घोषवाक्याची आवश्यकता अधोरेखित केली. तसेच स्त्री अर्धांगिनी नसून पूर्णांगिनी आहे असे सांगत आई ललिता शास्त्री यांच्या योगदानाची आठवण करून दिली. पुरस्कार स्वीकारताना डॉ. अनिता टेकाडे यांनी सांगितले की, हा सन्मान मिळाल्याने शिक्षण व समाजसेवा क्षेत्रात काम करण्याचा उत्साह दुणावला आहे. नागपूरच्या डॉ. राजश्री पुरण मेश्राम (शिक्षण), प्रणिता प्रदीप ढोबळे (लेखन), प्रा. प्रीती मनोज जाधव (क्रीडा - सायकलिंग), साधना योगेश पापडकर (समाजसेवा) यांनाही या सोहळ्यात राष्ट्रीय स्त्री शक्ती पुरस्काराने गौरविण्यात आले.

# गणेशनगरात गुणवंत बाबाच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा



■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. ८ :

आठवा मैल गणेशनगर येथे गुणवंत बाबाच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठापना मोठ्या श्रद्धा आणि भक्तीभावाने पार पडली. या प्रसंगी लाखणवाडी (कविठा) येथील गुणवंत शिल भजन मंडळातर्फे भावस्पर्शी भजन सादर करण्यात आले. कार्यक्रमाला बाबाराव वानखडे, दादाराव वानखडे, महादेव वानखडे, समाधान चौरपगार, श्रीकृष्ण तंतरपाळे, राजेंद्र इंगळे, मुकेश मानवटकर, प्रविण कोल्हे, दयावंत पळसपगार, प्रविण बावणे, जोशी काकू, शालिनी चौरपगार, माला वानखडे, यमुना कोल्हे, अंन्जु कोल्हे, सुनिता वानखडे, उषा सिरसाट आदी मान्यवर उपस्थित होते.

# आश्रमशाळा शिक्षकांचा सत्कार

■ महासागर प्रतिनिधी
हिंगणा, दि. ८ :

शिक्षक दिनाचे औचित्य साधून प्रकल्प कार्यालय नागपूर यांचे मार्फत आदिवासी शासकीय व अनुदानित आश्रमशाळेतील उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या शिक्षकांचा गौरव करण्यात आला.

यावेळी शासकीय आश्रमशाळा कोलीतमारा येथील मुख्याध्यापक नरेंद्र भाकरे, माध्यमिक शिक्षक राजेंद्र बोचर, प्राथमिक शिक्षिका ज्योती खंते, अनुदानित आदिवासी आश्रमशाळा देवळी पेंढरी येथील मुख्याध्यापक महेश चौधरी ,सुप्रिया तुपेकर माध्यमिक शिक्षिका ज्योती फाये, अनुदानित आदिवासी आश्रमशाळा खापरी येथील माध्यमिक शिक्षक हेमंत कोचे, एकलव्य निवासी शाळा रामटेक येथील मुख्याध्यापिका रूपा बोरकर, माध्यमिक शिक्षिका चारुलता सहारे या सर्वांचा उत्कृष्ट कार्याबद्दल प्रकल्प अधिकारी नितीन इसोकर



यांचे हस्ते सत्कार करण्यात आला.

प्रकल्प अधिकारी नितीन इसोकर यांनी शासकीय व अनुदानित आदिवासी आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांची सर्वोतोपरी काळजी घेऊन भविष्यात देशाचे सुजान नागरिक घडावे याकरिता सर्वांनी सदैव कार्यतत्पर राहणेविषयी मार्गदर्शन केले. यावेळी कार्यक्रमाला सहायक प्रकल्प अधिकारी राहुल काकडे, कार्यालय अधीक्षक अतुल गजापुरे, मिलिंद भगत ,शिक्षण विस्तार अधिकारी कृष्णा जंगले, शासकीय व अनुदानित आदिवासी आश्रमशाळेतील मुख्याध्यापक व शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन विस्तार अधिकारी कृष्णा जंगले तर आभार चारुलता सहारे यांनी मानले.

# वळणामार्गाच्या सर्व्हिस रोडवर साचले तलाव



■ महासागर प्रतिनिधी
हिंगणा, दि. ८ :

अमरावती रोड ते समृद्धी महामार्ग एन्ट्री पॉईंटला जोडणाऱ्या हिंगण्याच्या बाह्यवळण मार्गाच्या कवडस मार्गावरून या चारपदरी मार्गावर चढण्यासाठी वाहनचालक या सर्व्हिस मार्गाचा वापर करतात. या सर्व्हिस रस्त्यावर मात्र पावसाळ्यात दोन-तीन फूट खोलीचे दहा बारा ठिकाणी मोठमोठे तलावंच साचले आहे. छोट्या कार, आटो, रिक्षा या मार्गाने जाऊच शकत नाही अशी परिस्थिती असताना याकडे कुणाचेही लक्ष नाही. या ठिकाणापासून तीन किमी अंतरावर टोल नाका सुरु आहे. वाहन चालकांकडून टोल घेऊनही सर्व्हिस रस्ते दुरुस्ती कडे दुर्लक्ष होत असल्याने नागरिक आश्चर्य व्यक्त करीत आहेत.

# म्हाडा पिटेसूरात २० वर्षानंतर एसटी बस सेवा सुरू

■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. ८ :

नागपूर तालुक्यातील म्हाडा पिटेसूर गावाला तब्बल वीस वर्षांच्या प्रतीक्षेनंतर अखेर एसटी बससेवेचा लाभ मिळाला आहे. बर्डी-गोधणी ते म्हाडा पिटेसूर अशी एसटी बससेवा २० वर्षानंतर सुरू करण्यात आली असून, यामुळे स्थानिक ग्रामस्थांच्या दैनंदिन प्रवासाला मोठा दिलासा मिळाला आहे.

या बससेवेचे उद्घाटन माजी जिल्हा परिषद उपाध्यक्ष कुंदाताई राऊत यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून करण्यात आले. यावेळी पंचायत समितीच्या माजी सभापती रुपाली मनोहर, अरुण राऊत, राहुल मनोहर, राजेश महाजन, अरुण भागवत, सुरेंद्र शिवारे, बुरडे यांच्यासह म्हाडा आणि पिटेसूर परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. दीर्घकाळापासून एसटी बससेवेअभावी स्थानिकांना नागपूरसह इतर भागात जाण्यासाठी खासगी वाहनांवर किंवा महागड्या प्रवास साधनांवर अवलंबून राहावे लागत होते.

त्यामुळे विद्यार्थ्यांना शाळा-कॉलेज गाठणे, महिलांना नोकरी व कामकाजासाठी प्रवास करणे तसेच जेष्ठ नागरिकांना शहरात जाणे हे मोठे आव्हान बनले होते. आता या नव्याने सुरू झालेल्या बससेवेने ग्रामीण भागातील शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थी, महिला व ज्येष्ठ नागरिक यांना स्वस्त, सोयीस्कर आणि सुरक्षित प्रवासाची सुविधा उपलब्ध झाली आहे. ग्रामस्थांनी एसटी प्रशासनाचे आभार मानले.



# लाव्हा येथे विश्व आदिवासी दिनानिमीत्त रॅलीचे आयोजन

■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. ८ :

लाव्हा येथील जय बिरसा आदिवासी विकास सोसायटी यांच्या वतीने विश्व आदिवासी दिवसानिमित्त भव्य रॅलीचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात आंबेडकर नगर येथे बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून झाली. त्यानंतर बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेला माल्यार्पण व ध्वजवंदन पार पडले. सोनबा नगर येथे कुवारा भिवसन पेन पूजन करून बिरसा मुंडा प्रतिमेला माल्यार्पण करण्यात आले. तसेच टेकडी वाडी येथे बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेचे अनावरण करण्यात आले. या कार्यक्रमाला सुखलाल भलावी, दिनेश उईके, सचिन सलामे, विनोद करनाके, महेश धुर्वे, श्रावण कुळमते, बुधाराम कोवाचे, वाढवे, भोजराज पुसाम, रमेश सलामे, कपील पुसाम, सौरभ वरठी, राजकुमार बोरकर, बोरकर, शिला पुसाम, शोभा सलामे यांसह आदिवासी बांधव-भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# दमयंतीताई देशमुख महाविद्यालयात शिक्षक दिन उत्साहात साजरा

■ महासागर प्रतिनिधी
रामटेक, दि. ८ :

स्थानिक दमयंतीताई देशमुख बी.एड व डी.एड कॉलेज, रामटेक येथे संस्थाध्यक्ष रविकांत रागीट यांच्या मार्गदर्शनाखाली व प्राचार्या जयश्री देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ८ सप्टेंबर २०२५ रोज शुक्रवार शिक्षक दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

यांप्रसंगी महाविद्यालयातील प्राचार्या जयश्री देशमुख यांच्या शुभहस्ते व प्रा. तिमांडे यांच्या उपस्थितीत कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी शिक्षकांना पुष्पगुच्छ व शुभेच्छा देत शिक्षकांच्या योगदानाचा गौरव केला. या निमित्ताने विद्यार्थ्यांनी भाषणे, शिक्षकांविषयी कविता सादरीकरण करून कार्यक्रमाला रंगत आणली.



कार्यक्रमात बी.एड व डी.एड विभागातील प्रा. उर्मिला नाईक,प्रा. किरण शेंद्रे, प्रा. निकिता अंबादे, प्रा. सविता तायवाडे, प्रा. पारुल झाडे, प्रा. राजश्री माहुले, प्रा. विलास मडावी, प्रा. कला मेश्राम, प्रा. देवानंद नागदेवे, प्रा. अंकित तडस, प्रा. धम्मदीप खोब्रागडे, प्रा.अनिल मिरासे, अतुल बुरडकर, गीता समर्थ, सुरेश कारेमोरे, स्नेहा गाथे, सतीश कळंबे, अनिल बोरकर, वर्षा माहुरकर, वनिता आकरे तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कु. प्रिया भोले यांनी केले तर आभार प्रदर्शन कु. पार्थ हटवार यांनी मानले.

# पोलीस उपनिरीक्षक शर्मा यांचे अपघाती निधन

■ महासागर प्रतिनिधी
नरखेड, दि. ८ :

नरखेड पोलीस ठाण्यात कार्यरत सहाय्यक उपनिरीक्षक संतोष शर्मा वय 45 यांचा अपघाती निधन झाले. 28 ऑगस्ट रोजी नरखेड वरून काटोल जात असताना मोहदी धोत्रा गावाजवळ यांच्या दुचाकीला विरुद्ध दिशेने येणाऱ्या वाहनाची धडक बसली. या अपघातात गंभीर जखमी झालेल्या शर्मा यांच्यावर नागपूर येथील ऑरेंज सिटी रुग्णालयात उपचार सुरू होते. मात्र 3 सप्टेंबर च्या मध्यरात्री त्यांची प्राणज्योत मालवली. 4 सप्टेंबर रोजी काटोल मोक्षदामीन येथे त्यांच्यावर अत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी पोलीस अधीक्षक बापूसाहेब रोहन, ठाणेदार अजित कदम मान्यवर आणि कुटुंबीय उपस्थित होते. पोलीस दलाच्या 9 जवानांनी 27 राऊंड हवाई फायर करून त्यांना मानवंदना दिली.

# पूजा, दिवाळी व छठ पर्वच्या पार्श्वभूमीवर अतिरिक्त साप्ताहिक सुपरफास्ट विशेष गाडी

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ८ :

सणासुदीच्या काळात प्रवाशांची वाढती गर्दी लक्षात घेता मध्य रेल्वेने अतिरिक्त विशेष गाड्या चालविण्याचा निर्णय घेतला आहे.

त्यानुसार लोकमान्य टिळक टर्मिनस (एलटीटी) - नागपुर - लोकमान्य टिळक टर्मिनस दरम्यान साप्ताहिक सुपरफास्ट अतिरिक्त विशेष गाडी चालविण्यात येणार आहे. या गाड्या विशेष भाड्यात (१.३ पट) उपलब्ध असतील. गाडी क्रमांक 02139 एलटीटी-नागपूर साप्ताहिक सुपरफास्ट अतिरिक्त विशेष (१० फेऱ्या) प्रत्येक गुरुवारी एलटीटी वरून रात्री 00.25 वाजता सुटेल आणि दुपारी 15.30 वाजता नागपूरला पोहोचेल. ही गाडी २५ सप्टेंबर ते २७ नोव्हेंबर २०२५ पर्यंत धावेल. गाडी क्रमांक 02140 नागपूर-एलटीटी साप्ताहिक सुपरफास्ट अतिरिक्त विशेष (१० फेऱ्या) प्रत्येक शुक्रवारी दुपारी 13.30 वाजता नागपूरहून सुटेल आणि दुसऱ्या दिवशी (शनिवारी) सकाळी 04.10 वाजता एलटीटीला पोहोचेल. ही गाडी २६ सप्टेंबर ते २८ नोव्हेंबर २०२५ पर्यंत धावेल. कोच संरचना १० जनरल सेकंड क्लास, ५ स्लीपर, ३ एसी थर्ड क्लास, २ गार्ड-कम-लगेज व्हॅन - एकूण २० कोच. मध्य रेल्वे, नागपूर विभाग प्रवाशांना आवाहन करतो की त्यांनी आगाऊ आरक्षण करून सणासुदीच्या काळातील प्रवास अधिक सुखकर व सुरक्षित करावा.

# भाजपा रामटेक मंडळाची सेवा पंधरवाडा कार्यक्रमाची नियोजन बैठक संपन्न



■ महासागर प्रतिनिधी
रामटेक, दि. ८ :

भाजपा कार्यालय रामटेक येथे भारतीय जनता पार्टी महाराष्ट्र तर्फे संपूर्ण राज्यात पंतप्रधान नरेंद्र मोदींचा वाढदिवस १७ सप्टेंबरपासून ते राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची जयंतीपर्यंत म्हणजेच ०२ऑक्टोंबर पर्यंत सेवा पंधरवडा कार्यक्रम आयोजित केले आहेत.त्या कार्यक्रमात संपूर्ण रामटेक मंडळात विविध कार्यक्रमाचे आयोजन केले गेले आहेत. प्रत्येक कार्यक्रमाचे नियोजन करण्याकरिता व संघटनेची नियोजन बैठक रामटेक येथे माजी आमदार मल्लिकार्जुन रेड्डी यांचा अध्यक्षेत आयोजित करण्यात आली होती. यावेळी प्रामुख्याने जील्हामहामंत्री अनिल निधान, जिल्हामहामंत्री रींकेश चवरे, जिल्हा उपाध्यक्ष संजय मुलमुले,भाजपा युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष चेतन खडसे, ओबीसी आघाडी जिल्हा अध्यक्ष सुनील जूवार, किसान आघाडी जिल्हाध्यक्ष डॉ.राजेश ठाकरे,पंचायत समितीचे माजी सभापती नरेंद्र बंधाटे, माजी नगराध्यक्ष दिलीप देशमुख, बाजार समितीचे उपसभापती किशोर रहांगडाले, भाजपा नेते विवेक तोतडे, मंडळ अध्यक्ष योगेश मात्रे, शहर अध्यक्ष रजत गजभिये, नंदकिशोर कोहळे,आलोक मानकर, उमेश पटले, नंदकिशोर चंदनखेडे, बैजू खरे, उज्वला धमगाये, स्नेहा गावंडे, सागर लोंढे, विनोद दुरूबुळे, मनोज मेश्राम, महेश धूर्वे, सत्यप्रकाश हटवार, सैलेष पालांदुरकर, मन्साराम अहिरकर, मीनल भारंबे सह मोठया संख्येने भाजपा पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

# पक्षपात की निष्काळजीपणा?

■ महासागर प्रतिनिधी
कामठी, दि. ८ :

नवीन कामठी परिसरातील ड्रैगन पेलेस पासुन मुस्लीम कब्रस्तान पर्यंत आवागमनाचा रस्ता आहेत. हा रस्ता कामठी नगरी परिषद मधील प्रभाग १६ च्या अतंर्गत आहे. तसेच ड्रैगन पासुन मुस्लीम कब्रस्तानच्या मागील गेट कडे हा मार्ग जातो. या रस्त्याचे सिमेंटी करण अथवा कोणतेच बांधकाम झाले नाही. त्या कारणाने पादचाऱ्याना अडचणीचा सामना करावा लागतो. या भागात कामठी नगर परिषदच्या आययुडी पी योजने अतंर्गत एबीसी विभागाचे मकान धारक मागील ४०-४५ वर्षा पासुन निवास करतात. अशा रहिवाशांनी या प्लाटवर मकाने बनविले आहेत. परंतु आवश्यक सुविधांपासुन वंचीत आहेत. त्यांना आवागमना करता हा मार्ग खडतर आहे. इतक्या वर्षापासुन या परिसरातील रस्त्यांवर सिमेंटीकरण, नाल्यां झाल्या नाहीत. ज्या भागात सिमेंटचे रस्ते व नाल्यां बनविल्या आहेत. त्या परिसरातील घरे नझुलच्या जागेवर असल्याची तेथील नागरिकांचे म्हणणे आहे. त्याच प्रमाणे मदरसा, लुम्बिनि नगर रजा मिस्त्रीच्या घरापासून हैदर पेटीवाले च्या घरा पर्यंत ६० घरे आहेत. अशी भागातील समस्यांचे निवारन्याकरिता माजी नगरी सेवक, जागरूक नागरिक व माहिती अधिकार कार्यकर्ते सुलेमान अब्बास सहित अनेक नागरिकांनी तक्रारी केल्या.

# गुल्लू सरदार टोळीवर लावला मोक्का

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ८ :

चोरीच्या ट्रकांची पासिंग करून घेत त्यांची बाजारात विक्री करण्यासाठी कुख्यात गुरूविंदरसिंग बलविंदरसिंग ढिल्लन उर्फ गुल्लू सरदार उर्फ गुल्लू सरपंच (४२) आणि त्याच्या टोळीविरुद्ध शहर पोलिसांनी मोक्का लावला आहे. आश्चर्य म्हणजे, गत ६ महिन्यांपासून गुल्लू आणि त्याचे साथीदार फरार आहेत आणि पोलिसांकडे त्यांचा कोणताही सुगावा नाही. एप्रिल महिन्यात कपिलनगर ठाण्यात खुनाचा प्रयत्न, मारहाण आणि दंगा घातल्याचे प्रकरण नोंद झाल्यानंतर पोलिसांनी गुल्लूची लगाम कसण्यासाठी मोक्का लावला आहे. आरोपींमध्ये गुल्लूसह त्याचे भाऊ राजविंदरसिंग (३७), सुखविंदरसिंग (३९), संदीपसिंग (३५) आणि वडील बलविंदरसिंग ढिल्लन (६५) चा समावेश आहे. गुल्लू हा बराच काळ बाबादीपसिंगनगर गुरुद्वाराचा सरपंच होता. त्याच्या कार्यप्रणालीवरून अनेकदा गोंधळ उडाला. अशात रंधावा गटानेही निवडणुकीच्या मैदानात उडी घेतली आणि गुल्लू त्यांचा शत्रू बनला. १ एप्रिल रोजी गुल्लू, त्याचे भाऊ आणि समर्थकांनी रंधावा गटावर तलवार आणि काठीने हल्ला केला. पोलिसांनी गुल्लू टोळीवर खुनाचा प्रयत्नासह विविध कलमान्वये गुन्हा नोंदविला होता. राजविंदर आणि संदीप ढिल्लनला पोलिसांनी अटक केली होती, मात्र तेव्हापासून गुल्लू आणि त्याचे इतर साथीदार फरार आहेत. पोलिस त्याचा कसून शोध घेत होते मात्र यादरम्यान अल्पसंख्यक आयोगाने पोलिसांना एक पत्र लिहिले. ज्यात सराईत गुन्हेगार गुल्लू याला सद्गुणी असल्याचे सांगून अटक न करण्याबाबत लिहिले होते. या पत्रावरूनही चांगलाच गोंधळ उडाला होता. फरार असतानाही गुल्लूने कुटुंबातील सदस्य आणि कर्मचाऱ्यांच्या मदतीने रंधावा गटाला बदनाम करणे आणि खोट्या गुन्ह्यात अडकविण्यासाठी मोठा कट रचला.

# भोयर कॉलेज ऑफ फॉर्मसीचा गौरव

■ महासागर प्रतिनिधी
कामठी, दि. ८ :

भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालयाच्या एनआय आर एफ रॅंकिंग २०२५ मध्ये किशोरी ताई भोयर कॉलेज ऑफ फॉर्मसी कामठी यांनी सतत आठव्या वर्षी देशातील सर्वोत्तम फार्मसी महाविद्यालयांत ६६ वे स्थान प्राप्त केले. या महाविद्यालयाला एनबीए कडुन पुन्नमान्यता आणि नैक कडुन एप्लस ग्रेड मिळाला आहे. प्राचार्य प्रा.डॉ. मिलिंद उमेकर यानी सर्व प्राध्यापक कर्मचारी तसेच विद्यार्थी आणि व्यवस्थापणाचे आभार व्यक्त केले. त्यांनी सांगितले ग्रामीण भागातून उंच दर्जा राखणे अभिमानास्पद आहे.

# शेतकऱ्यांनी स्वयंरोजगारासाठी कृषी विद्यापीठाच्या तंत्रज्ञानाचा उपयोग करावा : ॲड. निलेश हेलोंडे पाटील

■ महासागर प्रतिनिधी
काटोल, दि. ८ :

विदर्भातील युवा शेतकरी व बेरोजगार युवकांना तसेच महिलांना आर्थिक व सामाजिकदृष्ट्या रोजगारक्षम बनविण्यासाठी कृषी विद्यापीठाने विकसित केलेले तंत्रज्ञान बाजार समित्यांच्या माध्यमातून थेट शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविले पाहिजे, असे आवाहन वसंतराव नाईक स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष(राज्य मंत्री दर्जा) ॲड. निलेश हेलोंडे पाटील यांनी केले.

डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला यांनी शेतकऱ्यांसाठी एकूण ३६ प्रकारचे तंत्रज्ञान व यंत्रसामग्री विकसित केली आहे. यात कचरा शुष्कक,मिनी दाल मिल संयंत्र, मिरची बीज निष्कासन यंत्र,बाष्पीय शीतक साठवण गृह,संत्रा /मोसंबी व फळभाज्या साठवण सुविधा,सीताफळ गरापासून बीज वेगळे करण्याचे यंत्र,गव्हांकुर भुकटी यंत्र, पशुखाद्य निर्मिती यंत्र,फळ प्रतवारी यंत्र, तात्पुरते धान्य झाकण्याचे आवरण, सोयाबीन मधील कचरा-खडे निष्कासन यंत्र, हिरव्या शेंगा सोलणी यंत्र, हिरवा



हरभरा गाठे तोंडणी यंत्र,अशी अनेक यंत्रसामग्री उपलब्ध करून दिली आहे. या तंत्रज्ञानाचा वापर केल्यास शेतकऱ्यांच्या उत्पादनक्षमतेत वाढ होईल, तर बेरोजगार युवकांना व महिला शेतकऱ्यांना स्वावलंबनाची नवी वाट खुली होईल.

बैठकीत उपस्थित शेतकऱ्यांनीही मत मांडताना सांगितले की, बाजार समित्यांनी या यंत्रसामग्री व तंत्रज्ञानाच्या जनजागृतीसाठी शिवार फेरी व प्रत्यक्ष प्रात्यक्षिके आयोजित करावीत. यामुळे महिलांना घरबसल्या फळभाजी प्रक्रिया, धान्य प्रक्रिया, पशुखाद्य निर्मिती यांसारख्या कामांमधून नियमित उत्पन्न मिळू शकेल. परिणामी त्यांचे आर्थिक व सामाजिक सक्षमीकरण होईल.

शेतकऱ्यांचे आत्महत्या संकट, उत्पादनवाढीतील अडथळे यावर कायमस्वरूपी उपाय म्हणजे कृषी विद्यापीठाचे संशोधन थेट शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविणे आणि त्यांनी ते प्रत्यक्ष अंगीकारणे, असा ठाम संदेश या बैठकीतून देण्यात आला. ॲड. निलेश हेलोंडे पाटील यांनी या प्रसंगी उपस्थित पकृविचे कुलगुरू डॉ. शरद गडाख व येथील सर्व कृषी शास्त्रज्ञ, कृषी वैज्ञानिकांना आग्रह पुर्ण आवाहन केले की शेतकरी वाचला तरच देश वाचेल! या करिता आपण आपल्या स्तरावर योगदान करावे असे आवाहन केले. प.कृ.वि. शेतकऱ्यांचे माहिती व मार्गदर्शनासाठी सदैव खुले. शेतकऱ्यांची शेती व शेतकरी समृद्ध व्हावा, या करिता प.कृ.वि. चे मार्फत सदैव नव नवीन वाण नव नवीन तंत्रज्ञान विकसित केले जाते. पण.कृ.वि. चे शात्रज्ञ, वैज्ञानिकांचे नव नवीन शोध याचा फायदा शेतकऱ्यांना मिळावा या करीता माहिती उपलब्ध करून देण्यासाठी शेतकर्यांना माहिती उपलब्ध करून देण्यासाठी प.कृ.वि. चे दारे सदैव खुले आहेत. असे मत प.कृ.वि.चे कुलगुरू डॉ शरद गडाख यांनी मांडले.


# नागपूरात प्रथमच श्री तिरुपती बालाजी कथा

## ९ सप्टेंबरपासून सुरेश भट सभागृहात भव्य आयोजन

■ महासागर प्रतिनिधी
हिंगणा, दि. ८ :

मारवाडी परिषद, मारवाडी युवा मंच व मिड टाऊन नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने प्रथमच नागपूरात श्री तिरुपती बालाजी कथा या भव्य धार्मिक सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा सोहळा दिनांक ९ ते १३ सप्टेंबर २०२५ दरम्यान रेशीमबाग येथील कविवर्य सुरेश भट सभागृहात होणार आहे.

कथेचे वाचन गौडीय वैष्णवाचार्य परमश्रद्धेय श्री युगलशरणजी महाराज (मिगार, अहिल्यानगर, अहमदनगर) यांच्या वाणीने होणार आहे. कथेत दररोज विविध धार्मिक उत्सवांचे आयोजन करण्यात आले आहे : ९ सप्टेंबर दुपारी १.३० वा. - कलश यात्रा, ग्रंथपूजा व प्राकट्य उत्सव. १० सप्टेंबर सायं. ३.३० वा. - कल्याण उत्सव (भगवान श्री तिरुपती बालाजी विवाह सोहळा) ११ सप्टेंबर सायं. ३.३० वा. - दीपोत्सव (भगवान बालाजी पूजन व दीपप्रज्वलन) १२ सप्टेंबर सायं.



३.३० वा. - खीरान उत्सव (भगवान व भक्त यांचा स्नेहप्रसंग) १३ सप्टेंबर सकाळी ९ वा. - रासलीला उत्सव (भगवान श्री तिरुपती बालाजीच्या लीलांचे सांस्कृतिक दर्शन) या पाच दिवसीय धार्मिक महोत्सवात भगवान श्री तिरुपती बालाजींच्या कृपा, महिमा व भक्तांशी असलेले आध्यात्मिक नाते यांचा अनुभव भक्तांना मिळणार आहे.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व तयारी पूर्ण झाली असून आयोजक मंडळाकडून सर्व नागरिक व भक्तजनांना कथा महोत्सवात सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

कार्यक्रमाचे मार्गदर्शन पूर्व अध्यक्ष अजय मल, निशांत गांधी, राजेश अग्रवाल तसेच मार्गदर्शक अतुल कोटेजा, सीए सुधीर बाहेती, संजय पालीवाल, अधिवक्ता काकाणी, गिरीश नत्थानी व सोमप्रकाश मंत्री यांनी केले आहे.

कार्यक्रमाच्या आयोजनासाठी महेश बंग (विदर्भ प्रमुख), कन्हैया मंत्री (अध्यक्ष-एम.एस.), हेमंत शर्मा (सचिव-एम.एस.), दीपक अग्रवाल (कोषाध्यक्ष-एम.एस.), हिमांशु चांडक (अध्यक्ष-एम.वाई.एम.), अभिषेक जोशी (सचिव-एम.वाई.एम.), अरिहंत बैद (कोषाध्यक्ष-एम.वाई.एम.), अंजली मंत्री (अध्यक्ष-एम.टी.), डॉ. प्राची अग्रवाल (सचिव-एम.टी.), रश्मी शर्मा (कोषाध्यक्ष-एम.टी.), हरीश राठी, योगेश राठी, प्रविण सारडा, संस्कृती खंडेलवाल तसेच संयोजक मंडळ व समस्त मारवाडी परिषद, युवा मंच व मिड टाऊन नागपूर टीम सक्रिय आहे.

# पुष्पा टू पुष्पराजला तुफान गर्दी



■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. ८ :

दवलामेटी येथील गणेशनगरमधील श्री छत्रपती शिवाजी महाराज सार्वजनिक गणेशोत्सव मंडळातर्फे पुष्पा टू पुष्पराज यांचा कार्यक्रम आमदार समीर मेघे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. कार्यक्रमाचे मुख्य मार्गदर्शक, आयोजक खडगावचे सरपंच देवराव कडू, दवलामेटीचे सरपंच गजानन रामेकर यांनी केले. आयोजनासाठी गणेशोत्सव मंडळाचे धनराज दिघोरे, अक्षय मोहिते आणि गणेश उत्सव मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी केले. यावेळी उपसरपंच अर्चना चौधरी, युवासेना राष्ट्रीय कार्यकारी सदस्य हर्षल काकडे, भाजपा प्रदेश कार्यकारीणी सदस्य नरेश चरडे, माजी उपसरपंच आनंदबाबू कदम , माजी नगरसेवक दिनेश कोचे, फाहरुख भाई,सतीश खोब्रागडे, संजय कपनीचोर, नितीन अडसड, प्रशांत श्रीवास्तव, विनोद चाफेकर, सचिन खिल्लारे,अजय जयस्वाल, शितल वानखेडे, रमेश गोमासे, विजय पिसोडे, रोशन मेश्राम रोशन बडवाईक, सुनील दुबे, सुशील बावणे, आणि इतर सर्व भाजपाचे पदाधिकारी उपस्थित होते.

# नागपूर मंडळकडुन तडाली-घुघुस दरम्यान कॉम्पोजिट स्टील गर्डर्सचे यशस्वी प्रक्षेपण

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ८ :

मध्य रेल्वेच्या नागपूर मंडळाने तडाली-घुघुस सेक्शनवरील रेल्वे कि.मी. 875/2-3 येथे समपार फाटक क्र. 39ऋ वर कॉम्पोजिट स्टील गर्डर्सचे प्रक्षेपण यशस्वीरित्या पूर्ण केले. हा काम 4 व 6 सप्टेंबर 2025 रोजी अचूकता व कार्यक्षमता यांसह पूर्ण करण्यात आला.

दिनांक 04.09.2025 रोजी दुपारी 13:55 वाजता ते सायं. 18:05 वाजेपर्यंत 4 तासांचा पहिला ट्रॅफिक व पॉवर ब्लॉक घेण्यात आला. त्यानंतर 06.09.2025 रोजी दुपारी 12:40 वाजता ते सायं. 19:00 वाजेपर्यंत 6 तास 20 मिनिटांचा दुसरा ब्लॉक घेण्यात आला. या ब्लॉक दरम्यान 36.0 मीटर लांबीचे व सुमारे 147 मेट्रिक टन वजनाचे दोन कॉम्पोजिट स्टील गर्डर्स यशस्वीरित्या प्रक्षेपित करण्यात आले.जड गर्डर्सच्या सुलभ व सुरक्षित हाताळणीसाठी उच्च



क्षमतेच्या टेलिस्कोपिक क्रेन्सचा वापर करण्यात आला. अभियंता पथकासह सर्व सहाय्यक विभागांच्या समन्वित प्रयत्नांमुळे व काटेकोर नियोजनामुळे हे काम निर्धारित वेळेत पूर्ण करण्यात आले, ज्यामुळे रेल्वे वाहतुकीवरील परिणाम अत्यल्प राहिला.ही उपलब्धी नागपूर मंडळातील पायाभूत सुविधा मजबूत करण्यासाठी व सुरक्षितता वाढविण्यासाठी एक महत्त्वपूर्ण टप्पा आहे.

नव्याने बसविण्यात आलेले स्टील गर्डर्स या सेक्शनची टिकाऊपणा व भार वाहून नेण्याची क्षमता वाढवतील, ज्यामुळे रेल्वे वाहतूक अधिक सुरक्षित व कार्यक्षम बनेल. नागपूर मंडळ भारतीय रेल्वेच्या आधुनिकीकरण व प्रवासी सुरक्षा या दृष्टीने उच्च गुणवत्तेची पायाभूत कामे वेळेत व अचूकतेने करण्यासाठी कटिबद्ध आहे.

# कृत्रिम वाळू निर्मितीला शासनाचे सहकार्य : पालकमंत्री बावनकुळे

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ८ :

नदीतील अमाप वाळू उपश्यावर मर्यादा यात्व्यात या दृष्टीने राज्य शासनाने कृत्रिम वाळू अर्थात एम सॅन्ड धोरण स्वीकारले आहे. या धोरणानुसार जिल्ह्यात विविध ठिकाणी एम सँड युनिट स्थापन करण्यासाठी स्वामित्वधनाच्या रकमेत प्रति ब्रास ४०० रुपयांची सवलत देण्यात येणार आहे. पर्यावरण रक्षणाच्या दृष्टीने जिल्ह्यातील अधिकाधिक क्रशर उद्योजकांनी नियमानुसार कृत्रिम वाळू (एम सँड) धोरणाचा लाभ घेऊन एम सँड प्रकल्प उभारावेत व गुणवत्तापूर्ण सॅन्ड निर्मिती करावी, असे आवाहन राज्याचे महसूल मंत्री तथा नागपूरचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी




आज येथे केले.

सदर येथील जिल्हा नियोजन भवन येथे आज कृत्रिम वाळू निर्मितीवर आधारित कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ते बोलत होते. जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर, जिल्हा खनिकर्म अधिकारी डॉ. अतुल दोड, भूविज्ञान व खनिकर्म संचालनालयाचे उपसंचालक डॉ. श्रीराम कडू, जिल्ह्यातील सर्व उपविभागीय अधिकारी, तहसीलदार आदी यावेळी उपस्थित होते.

नैसर्गिक वाळू ऐवजी कृत्रिम वाळूचा वापर करण्यासाठी दगडापासून वाळू बनवण्याचे धोरण राज्य शासनाच्या वतीने राबवण्यात येत आहे. जिल्ह्यात शासकीय व खाजगी बांधकामांचे मोठे प्रकल्प निर्माण होत असून सर्व शासकीय बांधकाम प्रकल्पांमध्ये एम-सँड वापरणे टप्पा टप्प्याने बंधनकारक होणार असल्याने या प्रकल्पांसाठी मोठ्या प्रमाणात वाळूची आवश्यकता आहे. पर्यावरण रक्षणासाठी कृत्रिम वाळू एम सँड धोरणाचा अवलंब करावा तसेच यातील कायदेशीर बाबींची व या धोरणाची माहिती घेऊन प्रभावीपणे काम करा, असे निर्देश त्यांनी दिले.

शहरांचा विस्तार होत आहे. महानगरे वाढत आहेत. येत्या काळात नवीन नागपूरची निर्मिती करण्यात येणार आहे. यासाठीच्या बांधकामासाठी मोठ्या प्रमाणात वाळू लागणार आहे. विकसित नागपूर घडविण्यासाठी कृत्रिम वाळू निर्मिती महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचे श्री. बावनकुळे यांनी सांगितले.

यावेळी उपस्थित क्रशर उद्योजकांनी पालकमंत्री बावनकुळे यांच्याशी संवाद साधला. जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर यांनी जिल्ह्यात एम-सँडची सद्यस्थिती तसेच सुरू असलेल्या प्रकल्पाची प्रास्ताविकाद्वारे माहिती दिली. नद्यांचे पर्यावरणीय संतुलन राखण्यासाठी वाळूचा योग्य वापर होण्यासाठी उपाय म्हणून एम-सँड धोरण तयार केले आहे.

# ट्रकच्या चाकात येऊन तरुणाचा चेंदामेंदा

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ८ :

बाप्पाचे विसर्जन करण्यासाठी जात असलेल्या तरुणाने ट्रकला ओव्हरटेक करण्याचा प्रयत्न केला. या दरम्यान ट्रकचा कट लागल्याने तो खाली पडला आणि मागच्या चाकाखाली येऊन त्याचा घटनास्थळीच करुण अंत झाला. ही दुर्दैवी घटना कोराडी मार्गावर घडली. अजय लक्ष्मण यादव (२५) असे मृताचे नाव आहे. या घटनेने धरमपेठच्या गवळीपुरा परिसरात शोक पसरला आहे.

दरवर्षीप्रमाणे यंदाही गवळीपुऱ्यातील ओम बाल गणेश उत्सव मंडळाच्या युवकांनी गणेशाची स्थापना केली. उत्सवानिमित्त १० दिवस आनंदाचे वातावरण होते. गणेश विसर्जनाची वेळ आली आणि मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी वाजत गाजत बाप्पाला निरोप देण्याची तयारी केली. अजय हा गवळीपुऱ्यातील ओम गाल गणेश उत्सव मंडळाचा सक्रीय कार्यकर्ता होता. रविवारच्या रात्री १२.३० वाजताच्या सुमारास वस्तीतील युवक ढोल ताशांच्या गजरात गणेश विसर्जनासाठी निघाले. एका ट्रॅक्टरवर मूर्ती ठेवून वाजत गाजत कोराडी तलावाकडे जात होते. काही तरुण दुचाकीने ट्रॅक्टरच्या मागे होते. अजय सुद्धा त्याच्या एमएच-३१/एफजे-३५८२ क्रमांकाच्या मोटारसायकलने होता. कोराडी ठाण्याच्या हद्दीत रेमेडिया रुग्णालयासमोरील पुलावर अचानक ट्रेलर ट्रक क्र. आरजे-४७/जीए-४३२६ च्या चालकाने अजयच्या दुचाकीला धडक दिली. तो खाली पडला आणि ट्रकच्या मागच्या चाकाखाली येऊन त्याचा चेंदामेंदा झाला. एका क्षणात आनंदाचे वातावरण दुःखात मावळले. जवळपासचे लोक धावले. माहिती मिळताच कोराडी पोलिसांनी घटनास्थळ गाठले. पंचनामा करून मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी मेयो रुग्णालयात रवाना केला.

### पार्थिव पाहताच आईने फोडला टाहो

अजय रंगरंगोटीचे काम करीत होता आणि एका दुध विक्रेत्याकडेही कामाला होता. सोमवारी अजय नाहीतर त्याचे पार्थिव घरी परतले. अजयला निपचित पाहून आईने हंबरला फोडला. आईचा टाहो पाहून परिसरातील लोकांचे डोळेही पानावले. धरमपेठच्या गवळीपुरा परिसरात शोककळा पसरली. एकुलता एक मुलगा गेल्याने यादव कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. परिसरातही हळहळ व्यक्त केली जात आहे. अजयचे वडील लक्ष्मण यादव यांनी दिलेल्या तक्रारीवरून कोराडी पोलिसांनी ट्रक चालक राजेश चौधरी रा. अजमेर, राजस्थान याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला.

# सोलार एक्सप्लोसिव्ह कंपनी तात्काळ बंद करा

■ महासागर प्रतिनिधी, काटोल, दि. ८ :

बाजारगाव येथील सोलर एक्सप्लोसिव्ह इंडस्ट्रीज लिमिटेड मध्ये गुरुवारी मध्यरात्री सुमारे १२.३० वाजता झालेल्या भीषण स्फोटाने संपूर्ण परिसर हादरला. कंपनीच्या एचएमएक्स-आरडीएक्स विभागात हा स्फोट झाला. यात एका कर्मचाऱ्याचा मृत्यू झाला असून २४ जण जखमी झाले आहेत. त्यापैकी चौघांची प्रकृती गंभीर आहे. सोलार एक्सप्लोसिव्ह कंपनी ही स्थानिक जनतेच्या जीवाशी खेळ करणारी मृत्यूची फॅक्टरी बनली आहे. मागील काही वर्षांपासून या कंपनीत वारंवार भीषण स्फोट होत असून आतापर्यंत जवळपास शेकडो निरपराध कामगार व नागरिकांचा बळी गेला आहे, तर शेकडो कामगार गंभीर जखमी झाले आहेत.



## शिवसेनेचे उपविभागीय अधिकारी यांना निवेदन

अवघ्या १२,००० पगारासाठी आपला जीव धोक्यात घालणाऱ्या कामगारांचे प्राण इतक्या बेदरकारपणे घेतले जात आहेत, ही अत्यंत लज्जास्पद आणि अमानुष बाब आहे. नुकत्याच झालेल्या स्फोटामध्ये कंपनीच्या इमारतीचे पिलर थेट नागपूर-अमरावती हायवेवरपर्यंत उडाले. या दुर्घटनेमुळे आजूबाजूच्या गावांना गंभीर धोका निर्माण झाला असून भविष्यात मोठा स्फोट झाल्यास संपूर्ण गावे उद्ध्वस्त होऊ शकतात. यामुळे ही कंपनी फक्त कामगारांसाठीच नव्हे तर पूर्ण परिसरासाठी स्फोटक संकट ठरत आहे.

शिवसेना पक्षाच्या ठाम मागण्या : सोलार एक्सप्लोसिव्ह कंपनी ताबडतोब बंद करण्यात यावी. कंपनीचे मालक, संचालक व जबाबदार अधिकारी यांच्यावर कढ़ड कलम 304 व इतर कठोर कलमान्वये फौजदारी गुन्हे दाखल करण्यात यावेत.

प्रत्येक मृत कामगाराच्या कुटुंबियांना किमान १ कोटी भरपाई व प्रत्येक जखमी कामगाराला किमान ५० लाख भरपाई तातडीने द्यावी. शासनाने तात्काळ अंतरिम मदत जाहीर करून ती रक्कम नंतर कंपनीकडून वसूल करावी. भविष्यात धोकादायक उद्योगांना परवाना देताना स्थानिक जनता, कामगार संघटना व ग्रामपंचायत यांची संमती घेणे अनिवार्य करण्यात यावे.

शिवसेना पक्षाने स्पष्ट इशारा दिला आहे की, जर शासनाने या प्रकरणी तातडीने कठोर कारवाई केली नाही, तर जनतेचा संताप उसळेल आणि शिवसेना रस्त्यावर उतरून तीव्र जनआंदोलन छेडेल. निवेदन देणारे शिवसैनिक : अरविंद बेले,नमाजी अली,दिलीप गायकवाड, प्रशांत बारई, अनिल नेहारे, अशिष जैस्वाल, , विपुल देवपुजारी, मंगेश वाडबुधे, अरुण कोल्हे, जितेंद्र वंजारी,विक्रम सावळकर, रिझवान सय्यद व इतर शिवसैनिक उपस्थित होते.

## गुंडाला शस्त्रासह अटक

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ८ :

सीताबर्डी पोलिसांनी गस्तीदरम्यान एका गुंडाला शस्त्रासह अटक केली. सरगम उर्फ गब्बर रमेश उर्फ तोता तुरकेल (४२) रा. मरीयमनगर, सीताबर्डी असे अटकेतील गुंडाचे नाव आहे. तोता हा सराईत गुन्हेगार असून त्याच्याविरुद्ध गंभीर गुन्ह्यांची नोंद आहे. रविवारी सायंकाळी ७ वाजताच्या सुमारास सीताबर्डी पोलिसांचे पथक ठाण्यांतर्गत गस्त घालत होते. या दरम्यान बीएसएनएल कार्यालयाजवळ तोता शस्त्र घेऊन फिरत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. या माहितीच्या आधारावर पोलिस परिसरात पोहोचताच तोताने पळ काढला. पोलिसांनी पाठलाग करून त्याला पकडले. झडतीमध्ये त्याच्याजवळ गुप्ती मिळाली. पोलिसांनी गुप्ती जप्त करून तोताला अटक केली. तो काहीतरी मोठा गुन्हा करण्याच्या उद्देशाने परिसरात शस्त्रासह फिरत असल्याचा संशय पोलिसांना आहे. त्याच्याविरुद्ध आर्म्स ॲक्ट आणि मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याचा गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

## वाघाचा हल्ल्यात जर्सी गाय ठार

■ महासागर प्रतिनिधी
भिवापूर , दि. ८ :

तालुक्यातील चिखलापार येथील शेतकरी हितेश सपाटे यांच्या शेतात आज दुपारी सुमारास १२ वाजताच्या दरम्यान वाघाने हल्ला करून जर्सी जातिची गाय ठार मारली. गाईची किंमत अंदाजे ७५ हजार रुपये असून या घटनेमुळे परिसरातील शेतकरी व शेतमजुरांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

या भागात मोठ्या संख्येने वाघांचा संचार असून वारंवार होणाऱ्या हल्ल्यांमुळे शेतकरी हवालदिल झाले आहेत. याबाबत वनविभाग दक्षिण उमरेड यांनी तातडीने लक्ष घालून वाघांचा बंदोबस्त करावा, अशी मागणी ग्रामस्थ व शेतकरी यांनी केली आहे.तसेच पीडित शेतकऱ्याला त्वरित नुकसान भरपाई देण्यात यावी, अशी मागणी भिवापूर तालुका शेतकी सहकारी खरेदी विक्री समितीचे सभापती भास्कर भाऊराव येंगळे यांनी केली आहे.

# यशोधरानगरात चामा टोळीची दहशत

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ८ :

यशोधरानगर ठाण्यांतर्गत सध्या चामा टोळीने दहशत पसरवली आहे. ट्रकमधून डिझेल चोरी करणाऱ्या या टोळीने ट्रांसपोर्टर आणि त्याच्या मुलांवर जीवघेणा हल्ला केला. या घटनेला आठवडा होऊनही पोलिस आरोपींना पकडू शकले नाही. परिसरातील नागरिकांमध्ये चामा टोळीची दहशत आहे. या टोळीवर अनेक गंभीर गुन्ह्यांची नोंद आहे. आरोपींमध्ये शिबू, मोबिन, दानिश आणि मेहफुजचा समावेश आहे.

फिर्यादी सय्यद माजिद सय्यद जाहिद हुसेन (४९) रा. ताजनगर, टेका यांनी त्यांचा एमएच-४०/सीएम-०९२१ क्रमांकाचा ट्रक संघर्षनगरात दुरुस्तीसाठी दिला होता. ३० ऑगस्टच्या रात्री त्यांचा मुलगा शाहिद ट्रकची सुरक्षा करण्यासाठी कॅबिनमध्ये झोपला होता. रात्री दीड वाजताच्या सुमारास शिबूने ट्रकच्या टाकीचे नट उघडले आणि डिझेल चोरी करू लागला. शाहिदने याबाबत वडील माजिद यांना माहिती दिली. माजिद दुसऱ्या मुलासह घटनास्थळी पोहोचले असता शिबू ट्रकपासून काही अंतरावर बसलेला होता. डिझेल चोरीवरून जाब विचारला असता शिबू, दानिश, मेहफुज आणि मोबिनने वाद घातला. आरोपींनी लोखंडी रॉडने माजिद आणि त्यांच्या मुलांवर हल्ला केला. शाहिदला रॉडने जबर मारहाण करण्यात आली. माजिद त्याला सोडण्याची विनवनी करीत होते, मात्र आरोपींच्या अंगात शैतान संचारला होता. ते त्याचा जीव घेण्याच्या बेतात होते. तिन्ही बापलेकांना गंभीर जखमी करून आरोपींनी पळ काढला. माजिद यांनी सांगितले की, मोबिनची टोळी परिसरात चामा गँगच्या नावाने चर्चित आहे. या टोळीवर लुटपाट, चोरी आणि मारहाणीसह अनेक गुन्ह्यांची नोंद आहे. त्यांच्या मुलांना या टोळीने जीवे मारण्याचा प्रयत्न केल्यानंतरही पोलिस त्यांना पकडू शकले नाही. या दरम्यान आरोपींनी जामीनासाठी न्यायालयात धाव घेतली. आरोपींचा गुन्हेगारी रेकॉर्ड पाहता त्यांच्यावर मोक्का लावण्याची गरज आहे. स्थानिक नागरिक या टोळीमुळे त्रस्त आहेत. परिसरात उभ्या ट्रकांमधून आरोपी डिझेल आणि उपकरण चोरी करतात.

# जरीपटका येथील इवेंटमध्ये भारतीय अजगर सापाचे प्रदर्शन

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ८ :

"हेल्प फॉर ॲनिमल वेलफेअर असोशिएशन नागपूर"ला 8 सप्टेंबर रोजी जरीपटका नागपुर येथून एका पशुप्रेमी कडून वॉट्सएप द्वारे एक विडीओ प्राप्त झाला आहे, सदर वीडियो सोशल मिडियावर देखील वायरल झाला आहे, त्यात विशिष्ट वेशभूषा धारण करुन असलेले काही लोक वन्यजीव संरक्षण अधिनियम 1972 अनुसार शेड्यूल 1 अंतर्गत संरक्षण असलेला अंदाजे 6 फूट लांबीचा भारतीय अजगर साप हाताळत दिसत आहे, हया अजगराचे तोंड सेलोटेप ने चिपकवलेले दिसत आहे. संस्थेचे अध्यक्ष आशिष खाड़े, विश्वजीत उके, स्वप्निल बोधाने, सचिन काकडे व सचिन झोडे यांनी या विडीओची सत्यता तपासली असता जरीपटका नागपुर येथील कोमल मोबाइल शॉप यांच्या निवासस्थानी दि. 7 सप्टेंबर रोजी संध्याकाळी गणपती बिसर्जन दिवशीं किंग्स इव्हेंट च्या माध्यमातून इवेंट आयोजित करण्यात आला होता, इवेंट करनाऱ्यांनी भारतीय अजगर सापाचे प्रदर्शन केले होते.

सापाचे प्रदर्शन करूंन पैसे कमावण्याचा प्रकार झाल्याचे दिसले, सापाला बंदिस्त करुन, त्याच्या तोंडावर सेलोटेप लावण्याचा प्रकार पशुक्रूरता श्रेणीत येतो म्हणून "हेल्प फॉर ॲनिमल वेलफेअर असोशिएशन नागपूर" संस्थेचे अध्यक्ष आशिष खाड़े यांनी हया प्रकरणाची सखोल चौकशी करुन कायद्यान्वये उचित कार्यवाही करण्यात यावी म्हणून प्रधान मुख्य वनसंरक्षक महाराष्ट्र, सहाय्यक वनसंरक्षक काळे यांचे हया विषयावर लक्ष केंद्रित केले.



# शांती मशाल धम्मयात्रेचे भव्य समापन

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ८ :

महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलनांतर्गत आयोजित शांती मशाल धम्मयात्रेचा 10 सप्टेंबर रोजी नागपूरमध्ये संविधान चौक येथे भव्य समारोप होणार आहे. ही यात्रा २० ऑगस्ट रोजी पूज्य भंते धम्मशिखर यांच्या नेतृत्वात भीम जन्मभूमी महू येथून प्रारंभ झाली. महाबोधी महाविहार फक्त बौद्धांचा असावा या मुख्य मागणीसह ही धम्मयात्रा मध्यप्रदेश व महाराष्ट्रातील विविध शहरांमधून मार्गक्रमण करत नागपूरमध्ये दाखल होईल. इंदोर, देवास, गुना, सांची, भोपाळ, पांढुर्णा, छिंदवाडा, जबलपूर, बालाघाट, गोंदिया, भंडारा अशा अनेक शहरांमधून जात हजारोंच्या संख्येने धम्म अनुयायांनी सहभाग घेतला. 10 सप्टेंबर रोजी दुपारी १.३० वाजता कर्मवीर बाबू हरिदास आवळे स्मृती परिसर, इंदोरा येथून यात्रा सुरु होऊन बॅरिस्टर राजाभाऊ खोब्रागडे स्मृती परिसराची परिक्रमा करीत पावन दीक्षाभूमीचे दर्शन घेऊन संविधान चौकात समारोप होईल. या समारंभप्रसंगी आदरणीय भदंत डॉ. आकाश लामा, भदंत डॉ. चंद्रकीर्ती, भदंत बुद्धप्रकाश, भदंत देवानंद, भदंत धम्मतप, भदंत सिद्ध तिलक, भदंत नागसेन, भदंत सुभद्रा, भदंत धम्मसेन, भदंत संघज्योती, भदंत कौडण्य उपस्थित राहतील.



बाल गणेश उत्सव मंडळ हिमालय एन्क्लेव्ह प्लॉट नंबर 1 शिवाजी नगर नागपूर येथील लोकेश माटे यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेली गणेश मूर्ती

# ३८७ ग्रॅम दागिन्यांची कवडीमोल भावात विक्री

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ८ :

ग्रेनाईट व्यापाऱ्याच्या घरून चोरी केलेल्या ३८७ ग्रॅम दागिन्यांची कवडीमोल भावात विक्री केली. मिळालेल्या पैशांवर २ लाखांचे महागडे मोबाईल खरेदी केले. १ लाखाचा टॅब घेतला आणि घोड्यांच्या शर्यंतीवर लाखो रुपये हारला. विशेष म्हणजे फिर्यादीकडे आरोपीबाबत कोणतीही माहिती नव्हती. मोबाईल नंबरही नव्हता, आधारकार्ड होते, पण तेही बोगस. आरोपीने स्वतःची ओळख लपविली होती. आरोपीविषयी कुठलीच माहिती नसताना गुन्हे शाखेच्या पथकाने त्याला पश्चिम बंगालमधून हुडकून काढले. राजा मट्टू चौधरी (३५) असे अटकेतील आरोपीचे नाव आहे.

गीतांजली चौक, सारडा निकेतन येथील रहिवासी फिर्यादी रितू सारडा (५३) यांचा ग्रेनाईटचा व्यवसाय होता. पश्चिम बंगालच्या उत्तरापारा येथील रहिवासी आरोपी राजा चौधरी हा सराईत गुन्हेगार आहे. त्याला पत्नी आणि दोन मुली आहेत. चोरी करण्याची योजना आखल्यानंतरच ३ महिन्यांपूर्वी तो नागपुरात आला. एजंटच्या माध्यमातून तो सारडा यांच्या घरी कामाला लागला. तत्पूर्वी त्याने शहरातील धनाढ्य लोकांकडे घरकाम करण्यासाठी प्रयत्न केले. मात्र, त्याला यश आले नाही. एजंटनेच त्याला बोगस आधारकार्ड बनवून दिले. त्यावर राजा चक्रवर्ती असे नाव होते. ते आधारकार्ड त्याने सारडा यांना दिले. १५ हजार रुपये प्रतिमाह प्रमाणे त्याला कामावर ठेवले. दरम्यान त्याने सुरक्षा रक्षकाच्या कागदपत्रांवर एक मोबाईल खरेदी केला. त्याच मोबाईलचा तो वापर करीत होता. विशेष म्हणजे त्याच्याकडेही मोबाईल आहे.

मात्र त्याबद्दल त्याने कुणालाच माहिती होऊ दिले नाही. त्या मोबाईलने तो पत्नीच्या संपर्कात होता. दरम्यान महिनाभर त्याने संपूर्ण घराची रेकी केली. घटनेच्या दिवशी म्हणजे ९ आणि १० ऑगस्टदरम्यान त्याने फियार्दीच्या घरून ३८७ ग्रॅम हिरेजडित सोन्याचे दागिने आणि रोख १ लाख ७० हजार रुपये चोरले आणि रेल्वेने गावी निघाला. ही चोरी उघडकीस आल्यानंतर गणेशपेठ ठाण्यात नोंद करण्यात आली.

या प्रकरणाचा समांतर तपास गुन्हे शाखा युनिट ३चे पथक करीत होते. सारडाकडून मिळालेला त्याचा आधारकार्ड बोगस निघाला. आरोपीचे कोणतेही छायाचित्र नव्हते. त्याचा मोबाईल सुरक्षा रक्षकाच्या नावावर होता. जाताना त्याने तो मोबाईलही दुसऱ्याला दिला. गुन्हे शाखेच्या पथकाकडे कुठलाच धागा नसताना केवळ रेल्वे तिकिटाच्या आधारे पोलिस आरोपीपर्यंत पोहोचले. आरोपीने दागिण्यांचे हिरे काढून सुरक्षित ठेवले.

## महासागर प्रभाग वार्ता

# भांडेवाडीतील आदिवासी स्मशानभूमीची दयनीय अवस्था

प्रमोद जांभूळकर,
नागपूर दि. ८

प्रभाग क्रमांक २४, भांडेवाडी परिसरातील आदिवासी गोंड समाजासाठी असलेली स्मशानभूमी सध्या अत्यंत दयनीय अवस्थेत आहे. या ठिकाणी अंत्यसंस्कारासाठी कोणत्याही मूलभूत सुविधा उपलब्ध नाहीत, आणि प्रशासनाने याकडे दुर्लक्ष करत असल्याचा आरोप स्थानिक नागरिकांनी केला आहे.

सध्या ही भूमी पूर्णपणे झाडाझुडपांनी व्यापलेली असून, पावसाळ्यात पाण्याच्या निचऱ्याची व्यवस्था नसल्याने मोठ्या प्रमाणात पाणी साचते. त्यामुळे अंत्यसंस्काराच्या वेळेस मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागते. संरक्षण भिंतीचा अभाव, विजेचे दिवे, रस्ते, बैठक व्यवस्था आणि पाण्याची सोय या सगळ्यांचा



प्रकर्षाने अभाव जाणवतो.स्थानिक नागरिकांनी वेळोवेळी तक्रारी करूनही कुठलाही ठोस उपाय करण्यात आलेला नाही. ही केवळ अंत्यसंस्काराची जागा नाही, तर आमच्या संस्कृतीचा, अस्मितेचा आणि सन्मानाचा भाग आहे, असं मत नागरिकांनी व्यक्त केलं.

स्मशानभूमीची तात्काळ साफसफाई आणि योग्य विकास आराखड्याची अंमलबजावणी, संरक्षण भिंतीचे बांधकाम, पावसाचे पाणी न साचण्यासाठी ड्रेनेज यंत्रणा, अंतिम संस्कारासाठी शेड, विजेचे दिवे, पाणी आणि बैठक व्यवस्था या प्रश्नाकडे स्थानिक प्रशासनाने गांभीर्याने लक्ष देऊन, लवकरात लवकर काम सुरू करावे अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

# सतरंजीपुरा झोनच्या दिरंगाईमुळे प्रभाग पाच मध्ये समस्यांचा अंबार

प्रदीप पौनीकर,
नागपूर दि. ८

प्रभाग ५, बिनाकी लेआउट या अंतर्गत कांजी हाऊस चौक या भागातील अतिक्रमणग्रस्त फुटपाथ रोजच्या अपघातांना कारणीभूत ठरत आहे. झोनच्या सहाय्यक आयुक्तांकडे वारंवार तक्रार करूनही ही समस्या जैसे थे आहे. हा मार्केट एरिया असून इथे शौचालय नाही, प्रभागात शिवर समस्या, लाईटची व्यवस्था, रोडवर खड्डे याबाबत वारंवार तक्रार करूनही सतरंजीपुरा झोनचे सहाय्यक आयुक्त लक्ष देत नाही. झोनच्या सहाय्यक आयुक्तांच्या सहमतीने हे अतिक्रमण पणपात आहे असे आरोप आम आदमी पार्टी प्रभाग अध्यक्ष किशन निमजे यांनी लावले आहे.जर एका आठवड्यात या गंभीर समस्यांचे



निवारण न झाल्यास मनपा आयुक्त सिव्हिल लाईन या कार्यालयासमोर हजारोच्या संख्येने त्रस्त नागरिकांसह तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा देण्यात आला आहे. यावेळी प्रदिप पौनिकर, किशन निमजे, विजय नंदनवार, हेमराज कुंभारे, अनिल संभे, नानक धनवानी, आरती दलाल, संदीप साखरे, केतन ठाकूर, दिपक कोदरलीकर, सुनिल गजभिये, मनोज फटींग, क्षितिज वंजारी, निलकंड टाकलीकर, हरिहर पराते, नागसेन सहारे, कृष्णा पाठराबे, अंशु बिरेवार, संजू पटले, राजकुमार किटाळीकर, जयघोष कोटांगले, अनिल चांदेकर व आम आदमी पार्टीचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

# इंदोरा रिपब्लिकन नगरमध्ये कचऱ्याचे साम्राज्य; नागरिक त्रस्त

प्रभू गजभिये,
नागपूर दि.८

प्रभाग २- स्वच्छ भारत अभियानाच्या गजरात आपलं नागपूर स्वच्छ नागपूर म्हणून नावारूपाला येत असतानाच, प्रभाग क्रमांक २ मधील इंदोरा येथील रिपब्लिकन नगर परिसरात मात्र परिस्थिती बेगळीच दिसून येते. येथील रहिवासी प्रचंड कचऱ्यामुळे त्रस्त झाले असून, आरोग्यावर गंभीर परिणाम होत असल्याची तक्रार करत आहेत. अरे देवा! काय हा कचरा! आम्ही ही माणसं आहोत, जनावरं नाही! अशी आर्त हाक स्थानिक नागरिकांनी दिली आहे. परिसरात दुर्गंधी, डास आणि माश्यांचा प्रादुर्भाव वाढत चालला आहे. यामुळे मुलाबाळांपासून वृद्धांपर्यंत सर्वच नागरिक आरोग्याच्या दृष्टीने धोक्यात आहेत.स्थानिक रहिवासी सतीश जांभूळकर, सुरेंद्र भैसारे, अमोल गजभिये, कमल मुंघाटे, राजेश जांभूळकर, आणि प्रशांत मुंघाटे यांनी संयुक्तपणे नगरपालिकेकडे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला आहे.आम्ही



नागपुरात राहत नाही का? असा प्रश्न विचारत त्यांनी स्वच्छतेच्या नावाखाली फक्त पोस्टरबाजी न करता प्रत्यक्ष कृतीची मागणी केली आहे. प्रशासनाने तातडीने लक्ष देऊन कचऱ्याची नियमित साफसफाई, फवारणी आणि आरोग्यदायी वातावरण निर्माण करावे, अशी मागणी होत आहे.